विशेषांक

विकास समर्पित मासिक

ISSN-0971-8397

# योजना

वर्ष ४२ अंक ३ पाने ७४ आक्टोबर २०१४ मूल्य २० रु.

## 'असंघटित क्षेत्र'

ज्ञानाच्या परिप्रेक्ष्यातून असंघटित क्षेत्र
अमित बसोले

भारतीय शहरांमधिल अनौपचारिक क्षेत्र
अरूप मित्रा

भारतातील अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या भूमिका
बार्बरा हॅरीस - व्हाईट

विशेष लेख
आर्थिक समावेशकतेचा आराखडा:प्रधानमंत्री जन धन योजना
प्रवाकर साहू



विशेष
गांधी आणि स्वच्छता
सुदर्शन अय्यंगार

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर, इंडियन पोस्टल ऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# फेसबूक जाहिरात

योजना मासिकाने नुकतेच आपले फेसबूक पान सुरु केले आहे. या ऑनलाईन माध्यमाद्वारे वाचकांना आमच्याकडून तात्काळ सूचना, आमचे कार्यक्रम व आगामी अंकांबद्दल माहिती प्राप्त करता येईल आणि त्यावर प्रतिसादही देता येईल.

दोन महिन्यांच्या कालावधीत आमच्या वाचकांकडून प्राप्त झालेल्या १५,५०० पेक्षा अधिक पसंती दिल्या असून त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आपला पाठिंबा असाच कायम राहील, अशी अपेक्षा बाळगतो.

आमच्या फेसबूक पानावर पोहोचण्यासाठी फेसबूकच्या सर्चवर योजना जर्नल टाईप करा किंवा तुमच्या इंटरनेट अॅड्रेस बार वर खालील लींक टाका:

https://www.facebook.com/pages/Yojana-journal/181785378644304?ref=hl




कृपया आमच्या फेसबूक पानाला भेट द्या आणि आपल्या मौल्यवान सूचना आमच्यापर्यंत पोहोचवा.

**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. G/NMD/137/2013-15


Published Date : 12th Oct., 2014
Date of Posting : 16th Oct., 2014


# शिवतेज बुक डेपो
## स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे माहेरघर

२६ बुधवार पेठ,
आप्पा बळवंत चौक, पुणे २
संपर्क : **9850602149**




मराठी व्याकरणा संबंधीचे
६००० प्रश्न या पुस्तकात
समाविष्ट करण्यात आले आहेत.
प्रकाशक : संतोष प्रकाशन, औरंगाबाद
पृष्ठे ५३० मूल्य १८० रु.
मो. 9860560501





सर्व स्पर्धा परीक्षेसाठी संपूर्ण बुध्दीमत्ता
चाचणी या विषयाचे प्रश्न उत्तर स्वरूपातील
माहिती मांडण्यात आली आहे
प्रकाशक : केशव प्रकाशन, लातूर
पृष्ठे २७२ मूल्य १७० रु.
मो. 8888345149




जिल्हा परीषद नौकर भरतीतील
सर्व पदांसाठी सर्व विषय
समाविष्ट असलेले एकमेव पुस्तक
प्रकाशक : श्रद्धा नोटस्, पुणे
पृष्ठे ३७४ मूल्य २७० रु.
मो. 9822 732751




सर्व स्पर्धा परीक्षेसाठी
चालू घडामोडी
विषयक एकमेव पुस्तक
प्रकाशक : श्रद्धा नोटस्, बुलढाणा
पृष्ठे १९० मूल्य ९० रु.
मो. 9822 732751




महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुख्य परीक्षा
PSI मुख्य परीक्षा पेपर-२ साठी
व इतर स्पर्धा परीक्षांकरिता अत्यंत उपयुक्त
प्रकाशक : गणराज पब्लिकेशन्स, पुणे
पृष्ठे २०८ मूल्य १९० रु.
मो. 9637111280




५वी ते १० वी क्रमिक पुस्तकातील सर्व
परीक्षाभिमुख मुद्दे व १५०० पेक्षा जास्त
वस्तुनिष्ठ प्रश्न या पुस्तकात दिले आहेत
प्रकाशक : गणराज पब्लिकेशन्स, पुणे
पृष्ठे १९५ मूल्य १६० रु.
मो. 9637111280





राज्यसेवा मुख्य परीक्षा, STI /ASST
मुख्य परीक्षा, उपशिक्षणाधिकारी, बँकिंग
व इतर परीक्षांसाठी अत्यंत उपयुक्त
प्रकाशक : व्हिजन ॲकॅडमी, पुणे
पृष्ठे ४०२ मूल्य २२० रु.
मो. 9922893547




MPSC राज्यसेवा मुख्य परीक्षा
सामान्य अध्ययन पेपर-३
सुधारित अभ्यासक्रमानुसार
प्रकाशक : जिज्ञासा प्रकाशन, पुणे
पृष्ठे २६४ मूल्य १८० रु.
मो. 9960890452




सार्वजनिक बांधकाम विभागाच्या
लेखी परीक्षेसाठी सर्व विषय समाविष्ठ
असलेले एकमेव पुस्तक
प्रकाशक : नवदीप प्रकाशन, नागपूर
पृष्ठे ५०० मूल्य ३०० रु.
मो. 9822935395




महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांची संपूर्ण
माहिती समाविष्ठ असलेले एकमेव पुस्तक
प्रकाशक : नवदीप प्रकाशन, नागपूर
पृष्ठे २१६ मूल्य १०० रु.
मो. 9822935395




एन.सी.ई.आर.टी. या शालेय
अभ्यासक्रमावर आधारित स्पर्धापरीक्षांसाठी
अत्यंत उपयुक्त पुस्तक
प्रकाशक : शिवतेज प्रकाशन, पुणे
पृष्ठे ३६१ मूल्य १६० रु.
मो. 9850602149




रेल्वे भरती बोर्ड ग्रुप-डी
लेखी परीक्षेसाठी उपयुक्त पुस्तक
प्रकाशक : शिवतेज प्रकाशन, पुणे
पृष्ठे २४० मूल्य १२० रु.
मो. 9850602149

### वरील पुस्तके महाराष्ट्रातील सर्व प्रमुख बुकस्टॉलवर उपलब्ध


Chief Editior **Rajeshkumar Jha**
Printed and Published by **Dr. (Ms) Sadhana Rout,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division
and Printed at **Onlooker Press**, 16, Sassoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४२ ❖ ❖ अंक ३ ❖ ❖ ऑक्टोबर २०१४ ❖ ❖ मूल्य २० रु. ❖

मुख्य संपादक
**राजेशकुमार झा**

संपादक
**भावना गोखले**

उपसंपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे नियोजन आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | | |
|---|---|---|
| **वार्षिक** | : | रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : | रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : | रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : | रू. ७३० |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **भारतीय शहरांमधिल अनौपचारिक क्षेत्र** | - अरूप मित्रा | ५ |
| **ज्ञानाच्या परिप्रेक्ष्यातून असंघटित क्षेत्र** | - अमित बसोले | १० |
| **गांधी आणि स्वच्छता** | - सुदर्शन अय्यंगार | १७ |
| **भारतातील अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या भूमिका** | - बार्बरा हॅरीस - व्हाईट | २३ |
| **आर्थिक समावेशकतेचा आराखडा: प्रधानमंत्री जन धन योजना (विशेष लेख)** | - प्रवाकर साहू | ३५ |
| **असंघटित क्षेत्रातील धोरणकर्त्यांकरिता महत्त्वाकांक्षी वेध** | - सुप्रिया राऊत | ४१ |
| **अनौपचारिक क्षेत्राची संकल्पना आणि स्वरूपाचे जागतिक सिंहावलोकन** | - अशिमा मुजुमदार | ४६ |
| **असंघटित क्षेत्र आणि असंघटित क्षेत्रातील कामगार एक अध्ययन** | -प्रा. नितिन चौधरी | ५२ |
| **भारतातील असंघटित क्षेत्राचे स्वरुप व उपाय** | - डॉ. उमेश घोडेस्वार | ५७ |
| **असंघटित क्षेत्र-शहरी सामान्यांची भूमिका** | - राजेश भट्टाचार्य | ६० |
| **भारतातील कॉल सेंटर्स - नोकऱ्यांच्या असुरक्षिततेचे माहेर घर** | - बाबू पी रमेश | ६५ |
| **स्वच्छ भारत - आव्हाने आणि पुढील वाटचाल** | - महात्मा गांधी | ७० |


योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, 'सी' विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
email - myojanadpd@gmail.com

# संपादकीय

सकाळी सकाळी दाराची बेल वाजते. पेपरवाला वर्तमान पत्राचा गठ्ठा आपल्या दारात टाकतो आणि घाई घाईत निघून जातो. त्यानंतर लगेच आपण आपली तयारी करतो आणि रिक्षा, टॅक्सी किंवा बस पकडतो, आपापल्या कामाला जातो. कामाच्या ठिकाणी पोहोचल्यावर आपल्याला दृश्य दिसते की, वॉचमन आपलं ऑफिस व्यवस्थित सांभाळतोय, शिपाई देखील त्यांची कामे चोख करीत आहेत. एखाद्या सरकारी कार्यालयात आपण आपल्या सहकार्यांना भेटतो. आपल्याला भेटलेला पेपरवाला, रिक्षावाला, बसवाला, शिपाई, वॉचमन, कॉम्प्युटर ऑपरेटर वैगरे या सर्वांमध्ये एक गोष्ट सारखी आहे, ती म्हणजे हे सर्व लोकं अनौपचारिक गटात मोडतात. खरतर आपलं समाजकारण व अर्थकारण हे अनौपचारिक्तेच्या आधारावर उभे आहे, मग ते रोजगाराशी निगडीत असो किंवा इतर कुठल्याही गोष्टीशी. या क्षेत्राची विविधअंगी रचना असून देखील या गोष्टीकडे आपला दुर्लक्ष होत आहे.

'घाना' येथे शिक्षण घेतलेले ब्रिटनचे मानवशास्त्रज्ञ केथ हार्ट हे अनौपचारिक सेक्टर (informal sector) या व्याखेचे किंवा विचारांचे जनक आहेत. आय एल ओ ने १९७० साली "decent work" ही व्याख्या मांडली. या मध्ये कामाचे अधिकार, कामगार संघटना आणि 'सामाजिक सुरक्षा' यांचा समावेश आहे. काही तज्ञांच्या मते ''अनौपचारिकतेचि कल्पना'' ही आर्थिक कार्यक्षेत्रापुरती मर्यादित राहता कामा नये. हा विचार सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर विस्तृत प्रमाणात अंमलात आणता येईल. याचा आर्थिक दृष्ट्या अर्थबोध घेतल्यास त्याचा परिणाम हा अनौपाचारिक वास्तव्याच्या विश्लेषणाच्या पलीकडला आहे. असा, दावा केला जातो की, अनौपाचारिक श्रेणी ही फक्त एक संकल्पना आहे. सामाजिक दृष्ट्या एकत्र येऊन महत्वपूर्ण काम केले पाहिजे. हे काम औपचारिक देखरेख आणि नियमबद्ध नसेल. उदाहरणार्थ बिनपगारी घरकाम हे आर्थिक श्रेणीत मोडत नाही. याचे अनौपचारिक श्रेणीत वर्गीकरण केले पाहिजे व योग्य ते धोरण मनात ठेऊन कार्यक्रम आखला पाहिजे. ह्या गोष्टी जरी आर्थिकतेशी निगडीत नसल्या तरी त्याचे महत्व कमी होत नाही.

असे असले तरी, विद्वानांनी, धोरणकर्त्यांनी अनौपचारिक क्षेत्राकडे लक्ष द्यायला हवे. कारण आर्थिक पैलूंचा आकार आणि परिणाम खूप मोठा आहे. (एन एस एस ओ) च्या राष्ट्रीय सांख्यिकी संघटनेच्या सांख्यिकी प्रमाणे २००९ -१० मध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त रोजगार हा कृषी क्षेत्रात बघायला मिळाला तर जवळ पास ७० टक्के रोजगार हा बिगर कृषी क्षेत्रात दिसला, जे अनौपचारिक क्षेत्रात मोडते. स्पष्टपणे असे लक्षात आले की, अर्थव्यवस्था ही अनौपचारिक क्षेत्रात येत नाही. खरतर हे प्रबळ क्षेत्र आहे. अलीकडे अनौपचारिक क्षेत्रात रोजगारी वाढीचा दर समाधानकारक आढळला नाही. 'अनौपचारिक क्षेत्र' हे अर्थकारणातले प्रबळ असे क्षेत्र आहे,या पुढे संघटीत क्षेत्र देखील मागे पडले आहे. अनौपचारिक क्षेत्रातील उत्पादकता, भांडवल संचय, वेतन यांच्यात खूप सुधारणा झाल्याचे दिसते. या क्षेत्राला कमी लेखणे हे कदाचित चुकीचे ठरू शकेल. अनौपचारिक क्षेत्राने औपचारिक क्षेत्राच्या तुलनेत आर्थिक मापदंडात चांगली कामगिरी बजावली आहे. यात गुंतवणूक, जमा स्थावर मालमत्ता आदीचा समावेश आहे. लोक विद्या - पारंपारिक आणि स्वदेशी ज्ञान ज्यामध्ये पुरातन आणि स्थापित ज्ञान उत्पादन संस्था आणि स्थलांतर जे मोठ्या तणावाखाली आहे. याचा समावेश आहे हे आपण विसरता कामा नये.

तार्किक दृष्ट्या भारताची अनौपचारिक अर्थ व्यवस्था ही प्रमुख असल्यासारखी वाटते. खरी अर्थव्यवस्था ही नियमबद्ध असायला हवी, ज्यामुळे या क्षेत्रात काम करू इच्छीणाऱ्यांना देशाच्या विकासात योगदान देता येईल. याचं बरोबर प्रतिष्ठीत आयुष्य आणि सुद्दढ पर्यावरण अशा वातावरणाचा अनुभव घेता येईल. अनौपचारिक क्षेत्र हे समाज, राज्य सुरक्षेअंतर्गत येत नसल्याने काळजीची बाब ठरली आहे. असंघटीत/ अनौपचारिक क्षेत्रातील कामगारांच्या उन्नतीसाठी, त्यांच्या संरक्षणासाठी, पुर्नरुत्थापनासाठी सरकारने कायदे बनविले असले तरी कायदयाचे पालन किती प्रमाणात केले जाते ही वैचारिक बाब आहे. या क्षेत्रात काम करणारी लोकं अस्थिर उत्पन्न आणि मुलभूत अधिकार मिळत नसल्याने त्रस्त आहेत. स्वयंरोजगार हे अनौपचारिक क्षेत्राचा भाग आहे. मेकिंग इंडियाचा विचार करता भारताला मोठे उत्पादन राष्ट्र म्हणून बघत असू तरी त्यांच्या खऱ्या कार्यकर्त्यांना दुर्लक्षित करून चालणार नाही.

# भारतीय शहरांमधिल अनौपचारिक क्षेत्र

**- अरूप मित्रा**



**ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागातील अनौपचारिक क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर कामगार काम करत आहेत. शहराचे आकारमान आणि त्यातील आर्थिक घडामोडी यांच्यात होणाऱ्या बदलांबरोबर अनौपचारिक क्षेत्राच्या स्वरूपात बदल होत असल्याचा कल दिसून येतो ही त्याची रूपेरी किनार आहे.**

**कृषी व गैरकृषी क्षेत्रात सामावुन घेतलेल्या मजूरांची संख्या वाढत असतांनाही फार मोठ्या संख्येने त्यातील मजूर एकतर अकुशल तरी आहेत किंवा अर्धकुशल तरी आहेत. तर दुसरीकडे विकासाची प्रक्रिया ही वाढत्या प्रमाणावर भांडवल आणि कौशल्यावर आधारित होत चालली असल्याने अनेकांना अनौपचारिक क्षेत्रातील लहान-सहान कामे स्विकारण्यावाचून पर्याय उरलेला नाही.**

**प्रस्तावना :**

शहरांमधिल अनौपचारिक क्षेत्र, शहरांतील झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या ग्रामीण भागांतून स्थलांतरित झालेल्या आणि अल्प उत्पन्न गटातील अनेक कुटुंबांना उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यात अत्यंत महत्वाची भूमिका बजावतो. या शोधनिबंधामध्ये अशा अनौपचारिक क्षेत्राची तुलनात्मक व्याप्ती व रचना यांची पडताळणी तसेच करारावर काम करणे व पूरक व्यवसायाची निर्मिती यासंदर्भात अलिकडच्या काळात झालेले बदल आणि कार्यपद्धती व कार्यकुशलतेवर झालेला परिणाम यावर चर्चा करण्यात आली आहे.

मागील सुमारे २० ते ३० वर्षात भारताच्या संदर्भात अनौपचारिक क्षेत्राचा अभ्यास अनेक वेळा करण्यात आला असून त्याचा संक्षिप्त आढावा दास (२०११) आणि मित्रा (२०१३) यांच्या अभ्यासात बघता येऊ शकतो. **उदरनिर्वाहासाठी उपयोगी ठरू शकेल अशा साधनांच्या अभावामुळे कृषिक्षेत्रातून बाहेर फेकले गेलेले ग्रामीण मजूर आणि त्याचवेळेला ग्रामीण भागातील शेतीव्यतिरिक्त अन्य क्षेत्रात तसेच शहरी भागातील फार मोठी उत्पादकता असलेल्या क्षेत्रात सामावून घेतल्या न गेलेले ग्रामीण भागातील उरले सुरले मजूर अल्प उत्पादकता असलेल्या शहरी अनौपचारिक क्षेत्रात सामावून घेतले जाण्याची शक्यता असते.** (मित्रा, १९९४). तसेच शहरी भागातील लोकसंख्येत अतिशय वेगाने होणऱ्या नैसर्गिक वाढीमुळे शहरातील मजूरांच्या उपलब्धतेत फार मोठ्या प्रमाणात भर पडते. अशा **मजूरांची संख्या वाढत असतांनाही फार मोठ्या संख्येने त्यातील मजूर एकतर अकुशल तरी आहेत किंवा अर्धकुशल तरी आहेत. तर दुसरीकडे विकासाची प्रक्रिया ही वाढत्या प्रमाणावर भांडवल आणि कौशल्यावर आधारित होत चालली असल्याने अनेकांना अनौपचारिक क्षेत्रातील लहान-सहान कामे स्वीकारण्यावाचून पर्याय उरलेला नाही**. अशाप्रकारे अनौपचारिक क्षेत्रातील रोजगार आणि विविध प्रकारचे दारिद्र्य (उदा. अत्यल्प क्रयशक्ती, सुरक्षित निवाऱ्याचा अभाव, आरोग्याची खालावलेली स्थिती, शिक्षणाचा अभाव आणि अशाप्रकारे अनेक.) यांच्यातील लक्षणीय संबंध दिसून येतो.

**तुलनात्मक विस्तार :**

देशातील कामगारांच्या एकूण संख्येपैकी फार मोठ्या प्रमाणातील संख्या अनौपचारिक क्षेत्रात कार्यरत आहे. प्रामुख्याने अनौपचारिक क्षेत्रात गणना केले जाणारे केवळ शेतीशी निगडित उपक्रमच नव्हेत तर शेतीव्यतिरिक्त अन्य उपक्रमांचीदेखील गणना मोठा विस्तार असलेल्या अनौपचारिक क्षेत्रातच केली जाते. अल्प उत्पादकता असलेले काम, लहान स्वरूपाचे काम, भांडवल-श्रम यांचे व्यस्त प्रमाण असलेले सामान्य दर्जाचे तंत्रज्ञान तसेच असुरक्षित घटक आणि उत्पादन बाजारपेठ अशा स्वरूपात अनौपचारिक क्षेत्राची साधारणपणे व्याख्या

केली जाते. अनौपचारिक क्षेत्राची ही जरी कामकाजानुसार केलेली व्याख्या असली तरी त्यात सर्व वैशिष्ट्यांचा समावेश असेलच असे नाही. कामकाज औपचारिक क्षेत्रात करावे की, अनौपचारिक क्षेत्रात करावे याबाबत संस्थेच्या निर्णयावर अतिक्रमण करणारे घटक हे कौशल्य आणि शैक्षणिक पातळीवर अवलंबून असतात. सामान्य दर्जाच्या मानवी आणि शारिरीक क्षमता निसर्गाने ज्यांना दिल्या आहेत अशा व्यक्ती इतिहासजमा होतात आणि अन्य लहान उपक्रमात विरून जातात. त्यापैकी काही जण आर्थिक उन्नती साधणाऱ्या कोणत्याही गतिशीलतेचा अनुभव घेणे शक्य नसल्याने सातत्याने अनौपचारिक क्षेत्रातच राहतात. शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा झाल्याने बाजारपेठेची माहिती, पतपुरवठ्याच्या सुविधा, तंत्रज्ञानात्मक माहिती आणि एकूणच व्यापक स्तरावरील आर्थिक स्थिती व धोरणात्मक बदल याच्याशी संबंधित इतर माहिती मिळवण्यात वाढ होते आणि त्यामुळे व्यवसायाचा दर्जा वाढतो. या सगळ्याची मदत व्यवसायाची प्रगती अनौपचारिक किंवा असंघटीत क्षेत्रातून औपचारिक/संघटीत क्षेत्रात होते. असे असले तरी प्रगतीच्या प्रक्रियेचा त्यासाठी होणाऱ्या खर्चाच्या दृष्टीने सुद्धा विचार करण्याची गरज असते. उदाहरणार्थ, औपचारिक क्षेत्रातील नोंदणीची प्रक्रिया आणि कामगार कायदे कठोर असतील तर तो व्यवसायिक अनौपचारिक क्षेत्रातच कार्यरत राहणे पसंत करू शकेल - जाणीवपूर्वक आपला विस्तार कमी ठेवण्याचा निर्णय घेईल. (मैती आणि मित्रा, २०१०). याचप्रमाणे अनौपचारिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या कामगार बाजारपेठेतील लवचिकतेचा फायदा घेता यावा यासाठी एखादी संस्था लहानच राहण्याचा निर्णय घेते. अशा परिस्थितीत अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसाय स्वभावत:च अनुत्पादक असतीलच असे नाही तर ते तांत्रिकदृष्ट्या कार्यक्षम आणि अत्यंत स्पर्धात्मक असू शकतील.

औपचारिक क्षेत्रातील रोजगाराची व्याप्ती हेच दाखवते की, एकूण रोजगाराच्या तुलनेत अनौपचारिक क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागात खूपच जास्त आहे. शेती क्षेत्रातील त्याचे प्राबल्य आश्चर्यकारक नाही मात्र शेतीशिवाय अन्य क्षेत्रात देखील नाकारता येणार नाही एवढ्या मोठ्या संख्येने अनौपचारिक क्षेत्रात कामगार काम करत आहे. प्रत्यक्षात या आकड्यांतील ग्रामीण-शहरी असा फरक खूप नाही. स्त्री-पुरूष फरकातील अन्य आश्चर्यकारक बाब अशी की, एकूण महिला कामगारांच्या तुलनेत अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण हे, एखाद्याला जरी ते पुरूष कामगारांपेक्षा जास्त आहे असे वाटत असले तरी, पुरूष कामगारांपेक्षा ते कमी आहे.

स्वयंरोजगार मिळवणारे कामगार (शेवटी केवळ त्यांच्या स्वत:च्या कुटुंबियांकडून वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करणारे) आणि प्रत्यक्षात जे अनौपचारिक क्षेत्रातील रोजगाराचा भाग असू शकतात असे घरेलू कामगार वगळून अनौपचारिक क्षेत्रातील उपक्रमामधील (खासगी मालकी आणि भागीदारी उपक्रम) रोजगाराचा समावेश राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणात (NSS, २००९-१०) उपयोगात आणण्यात आलेल्या व्याख्येत करण्यात आला असल्याने वास्तवाचे प्रतिबिंब अंदाजांमध्ये दिसत नाही. घरेलू क्षेत्रातील रोजगाराची प्रचंड संख्या लक्षात घेता, ती गृहित न धरणे म्हणजे तक्ता क्रमांक १ मध्ये दाखविण्यात आलेल्या अनौपचारिक क्षेत्रातील रोजगाराचे फार मोठे अवमूल्यन ठरू शकेल. याशिवाय घरेलू क्षेत्रातील लवचिकतेमुळे मोठ्या प्रमाणावर महिलांना रोजगार मिळू शकतो (पहा मित्रा, २००५) आणि त्यामुळे या क्षेत्राची दखल न घेतल्याने अनौपचारिक क्षेत्राचा महिला कामगारांवर असलेला प्रभाव स्वाभाविकपणे दडपून टाकला जातो.

यापुढे जाऊन अनौपचारिक क्षेत्रातील उपक्रम आणि घरेलू क्षेत्र यामधील रोजगाराच्या जोडीला अनौपचारिक क्षेत्रातील तात्पुरत्या किंवा अल्प कालावधीसाठीच्या करारबद्ध किंवा अनियमित कामगारांचा समावेश असलेल्या अनौपचारिक रोजगाराची संख्या आश्चर्यकारकरित्या मोठी असल्याचे आपल्या लक्षात येऊ शकते.

**या मर्यादा असल्या तरी तक्ता क्रमांक १ मध्ये नमूद केलेल्या अनौपचारिक क्षेत्राचे अंदाज भारतीय संदर्भात विशेषत: शेतीव्यतिरिक्त कामांमध्ये असाधारणपणे जास्त आहेत.**

तक्ता क्रमांक १ : अनौपचारिक क्षेत्राचे टक्केवारीत तुलनात्मक आकारमान :

संपूर्ण भारत (२००९-१०)

| क्षेत्र | शेती | | | शेतीव्यतिरिक्त | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | महिला | व्यक्ती | पुरूष | महिला | व्यक्ती |
| ग्रामीण | ९०.६ | ९५.० | ९३.४ | ७३.० | ६४.१ | ७१.३ |
| शहरी | ८८.३ | ९७.७ | ९२.५ | ६८.३ | ६०.१ | ६६.९ |

**स्त्रोत** : राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण रोजगार-बेरोजगारी संख्येवर आधारित, २००९-१०.

**नवीन कल :**

**रोजगार आणि उत्पादनातील वाढ हे नि:संशयपणे कार्यक्षमतेचे दोन महत्वाचे निदर्शक आहेत**. संकलित पातळीवर रोजगारातील वाढ आणि असंघटीत किंवा अनौपचारिक उत्पादनातील उद्योगांच्या संख्येतील वाढ नकारात्मक होती. तरी सुद्धा वस्त्रोद्योग आणि चर्मोद्योगासारखे उद्योग, अधातू (non-metallic) खनिज उत्पादने, मूलभूत धातू आणि धातूपासून तयार केलेली उत्पादने यांच्या वाढीने सकारात्मक दर नोंदवला होता.

**तक्ता क्रमांक २ : रोजगारातील वाढ आणि असंघटीत उत्पादनातील सकल मूल्यवर्धन** (GVA): २००५-०६ ते २०१०-११

| उद्योग | स्वमालकी निर्मीती उपक्रम OAME | | आस्थापना | | सर्व | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कामगार | GVA कोटी रू. मध्ये (२००४-०५ मधील किंमती) | कामगार | GVA कोटी रू. मध्ये (२००४-०५ मधील किंमती) | कामगार | GVA कोटी रू. मध्ये (२००४-०५ मधील किंमती) |
| अन्न उत्पादने,पेय आणि तंबाकू | -६.७७ | २.११ | -३.३९ | -१.२९ | -५.९४ | ०.३५ |
| वस्त्रोद्योग व चर्मोद्योग | २.४८ | १५.१४ | ०.४६ | ९.८४ | १.७९ | १२.०७ |
| कागद व उत्पादने रसायने व | -१३.३५ | -४.०४ | १५.५३ | २३.४५ | -०.६४ | १७.२९ |
| रासायनिक उत्पादने | -१७.३६ | -४.७० | -२.०४ | ४.५९ | -१०.९९ | २.९५ |
| अधातू खनिज उत्पादने | -४.९१ | २.०१ | ११.२७ | ९.०३ | ३.९७ | ७.६७ |
| मूलभूत धातू | १३.३४ | १९.०६ | -२.३० | -१२.९२ | २.५२ | -९.१० |
| धातू उत्पादने | -३.६९ | ९.६५ | ४.७७ | १.४७ | १.८२ | २.५४ |
| यंत्रसामुग्री व साधने | -२६.१९ | -१४.४४ | -८.६५ | -५.७० | -१२.६४ | -६.६० |
| वाहतूक साधने लाकडासह | -५.६४ | १५.६३ | -७.७० | ४.२० | -७.५२ | ४.७० |
| अन्य उत्पादने | -१.३२ | १२.७९ | ४.४३ | ७.७७ | ०.८९ | ९.४७ |
| सर्व उद्योग | -२.४५ | ९.५८ | १.८५ | ५.२५ | -०.८६ | ६.७२ |

**स्त्रोत** : असंघटीत उत्पादन उपक्रमावरील २००५-०६ आणि २०१०-११मधील राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाकडून मिळालेली संकलित माहिती. OAME (own account manufacturing enterprises) म्हणजे स्वयंरोजगार मिळवून देणारा खाजगी निर्मिती उत्पादन उपक्रम (घरगुती उद्योग).

या पार्श्वभूमीवर आम्ही २००९-२०१० मध्ये दिल्लीत केलेल्या दर्जात्मक सर्वेक्षणाचे काही निष्कर्ष आम्ही काढू इच्छितो. विशेषत: वस्त्रोद्योग गटाने उत्तम कामगिरी बजावली असल्याचे वास्तव लक्षात घेऊन या क्षेत्रातील कामगारांच्या प्राप्तीची पडताळणी करता येऊ शकेल. दिल्लीतील सुंदर नगरी भागात केलेल्या सर्वेक्षणात तीन प्रकारच्या उपक्रमात गुंतलेले कामगार निश्चित करण्यात आले: शिवणकाम आणि कशिदाकारी, दागिने आणि पॅकेजिंग. त्यापैकी बहुतेक जणांना मोठ्या तसेच लहान दुकानांना उत्पादने पुरविणाऱ्या कंत्राटदारांच्या माध्यमातून कामासाठी माल मिळत होता. काही उत्पादनांवर विशिष्ट कंपनीचे नाव नेमकेपणाने लिहिलेले असायचे तर अन्य उत्पादनांवर तसा कोणताही उल्लेख नसतांनाही त्यांची विक्री केली जात होती. कंत्राटदार कच्च्या मालाचा पुरवठा करायचे आणि निश्चित कालावधीनंतर तयार उत्पादन घेऊन जात आणि कामगारांच्या सांगण्यानुसार मालाचा पुरवठा अखंडपणे होत असे. प्रत्येक नगासाठी देण्यात येणारा मजुरीचा दर ती वस्तू तयार करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टाच्या तुलनेत अत्यल्प असायची. प्रत्यक्षात मजुरीचे दर दिवसेंदिवस कमी झाल्याचे पुराव्यनिशी दाखवून देता येते. नियमितपणे काम मिळत असल्याने कामगारांच्या जीवनाचा स्तर खालावलेला नसल्याचे दिसत होते, मात्र प्रत्यक्षात तितकेच उत्पन्न मिळवण्यासाठी

खूप जास्त तास मजूरी करावी लागत होती. कामगारांकडून उत्पादित माल खरेदी करायला कोणीच तयार नसल्याने थेट दुकानदारांना उत्पादन विकण्यासाठी कामगार पुढाकार घेत नाहीत. याचाच फायदा उठवत मध्यस्थ नफेखोरी करतात. मध्यस्थांना दूर करण्यासाठी या उत्पादकांना सरकार आणि स्वयंसेवी संस्थांसारख्या तटस्थांनी (civil society) बाजारपेठेत आपले उत्पादन खपवण्यासाठी सहकार्य केले पाहिजे.

काही विशिष्ट कंपन्यांच्या नावाखाली विकण्यात येणाऱ्या काही उत्पादनांच्या दर्जाबाबत जाणीव असतेच आणि त्यामुळे चांगल्या उत्पादकांना मालाचा पुरवठा अधिक जास्त प्रमाणात आणि नियमितपणे होत राहतो. असे असले तरी, उत्तम उत्पादकता असलेल्यांची संख्या फार मोठी असल्याने या प्रक्रियेतून मजुरीच्या दरात कोणतीही वाढ होत नाही. वास्तविक, **सध्या ग्राहकांपेक्षा विक्रेत्यांचीच संख्या जास्त आहे - कंत्राटदार किंमत निश्चित करतात आणि त्याबाबत कोणत्याही प्रकारे पुर्नविचार केला जाऊ शकत नाही. 'खरेदी करा नाहीतर सोडून द्या' अशाच पद्धतीने मोठ्या प्रमाणात काम चालते**. यासंदर्भात स्वयंसेवी संस्थांसारख्या तटस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. प्रत्येक नगामागे कंत्राटदार देतात त्यापेक्षा कितीतरी जास्त मजुरी यापैकी काही संस्था देऊ शकतात. मात्र, अशा संस्थाकडून घेण्यात येणाऱ्या उत्पादित मालाचे प्रमाण अत्यल्प असल्याने हे कामगार स्वाभाविकपणे खासगी कंत्राटदारांना बळी पडतात आणि अशा स्वयंसेवी संस्थाची मध्यस्थी कंत्राटदारांकडून दिल्या जात असलेल्या मजुरीच्या दरावर मात करण्यात अपयशी ठरते.

**मजुरीच्या प्रचलित दराबाबत यातील प्रत्येक जण जागरूक असला तरी त्यांची कोणतीही औपचारिक किंवा अनौपचारिक कामगार संघटना नाही**. यापैकी कोणत्याही कामगारांसाठी मजुरीचा कमी दर देऊन त्याचे आणखी शोषण करणे शक्य नसले तरी समन्वयाचा अभाव असल्याने कामगारांनी एकत्र येऊन मजुरीचा दर वाढवून मागणे जवळपास अशक्यच आहे. दुसऱ्या बाजूला, वेगवेगळ्या कंत्राटदारांची मजबूत हातमिळवणी असल्याने ते मजुराचे दर वाढू देत नाहीत.

अनौपचारिक क्षेत्रातील सध्याच्या रोजगारातील स्थैर्याच्या परिस्थितीचा लाभ उठवणाऱ्या कामगारांना बाजारपेठेतील संबंध वाढवण्याची आणि दीर्घकाळाचा विचार करता त्यांच्या उद्योजकतेच्या क्षमता विकसित करण्यासाठी अधिक व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्याची संधी मिळू शकते, जी अनौपचारिक क्षेत्रातील उत्पादकतेच्या वाढीत भर घालू शकतील. तरी देखील या सकारात्मक सुधारणांपैकी काही सुधारणा औपचारिक क्षेत्रातील अनेक घटकांमध्ये अनुसरल्या जाणाऱ्या अनौपचारिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे प्रभावहीन होतील. काही उपक्रमांमध्ये जरी प्रसंगवश केवळ खालच्या स्तरावर (उदाहरणार्थ, उद्योगांमधील मजूर तसेच विद्यापीठे आणि सरकारी कार्यालयांसह विविध संस्थांमधील चतुर्थ श्रेणी कर्मचारी) ही प्रक्रिया अनुसरली जात असली तरी औपचारिक क्षेत्राने विविध स्तरांवर अनौपचारिकीकरणाची प्रक्रिया अंगिकारली आहे.

अनौपचारिक क्षेत्रातील उत्पादन घटकांमध्ये आपल्याला बघायला मिळणारे बदल लक्षवेधी आहेत. अनेक लहान उपक्रम, विशेषत: वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, मौल्यवान खडे व दागिने यांच्याशी निगडीत उद्योग आता औपचारिक क्षेत्रात मोडणाऱ्या मोठ्या युनिटशी जोडलेले आहेत. मोठी युनिट कच्चा माल इत्यादींचा पुरवठा करत असल्याने अनौपचारिक क्षेत्रातील लहान युनिटला त्यांचे काम करताना भेडसावणारी अनिश्चितता कमी झाली आहे असे कोणी म्हणू शकेल. त्यांना त्यांच्या दारात कच्चामाल आणि पाठवलेला माल इत्यादी उपलब्ध होत असल्याने त्यांना पतसहाय्य मिळण्याची शक्यता किंवा उत्पादन विक्रीची व्यवस्था शोधण्याची आवश्यकता नसते. या सर्व गोष्टींमुळे युनिटच्या सहज कामकाजात व कार्यक्षमतेत मदत होण्याची शक्यता असते. तसेच यावरून कोणी असाही तर्क करू शकेल की, पोट-कंत्राटीकरण आणि पूरक उद्योगीकरणाच्या प्रक्रियेद्वारे मोठ्या युनिटला आलेले वाढीचे सकारात्मक अनुभव सूक्ष्म युनिटपर्यंत पोहोचतात आणि अशाप्रकारे जागतिकीकरण गरीबांच्या देखील हिताचे ठरेल अशी अपेक्षा आहे.

**निष्कर्ष :**

**ग्रामीण आणि शहरी अशा दोन्ही भागातील अनौपचारिक क्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर कामगार काम करत आहेत. शहराचे आकारमान आणि त्यातील आर्थिक घडामोडी यांच्यात होणाऱ्या बदलाबरोबर अनौपचारिक क्षेत्राच्या स्वरूपात बदल होत असल्याचा कल दिसून येतो ही त्याची रूपेरी किनार आहे**. आकाराने लहान असलेल्या आणि विकास खुंटलेल्या शहरांच्या तुलनेत विकासाची क्षमता असलेल्या शहरातील अनौपचारिक क्षेत्रामध्येच उत्साहपूर्ण अंगभूत घटक शोधता येतात. तितक्याच पातळीची निसर्गदत्त कौशल्ये आणि लोकसंख्येशी निगडीत इतर गुणवैशिष्ट्ये असलेल्या व्यक्तीचे प्रत्यक्ष उत्पन्न आणि शहराच्या विकासाला चालना देणारे अन्य निदर्शक याबाबतीत उन्नती होण्याची शक्यता असू शकते. अनौपचारिक क्षेत्राची वाढ म्हणूनच

सर्वत्र खुंटलेली नसते; आर्थिक विकासाच्या व्यापक संदर्भात उपजिवीकेचे अधिक चांगले स्त्रोत उपलब्ध करून देण्यासाठी ठिकाणानुसार असलेली विभिन्नता त्याच्या सामर्थ्यावर भर देते.

आपल्या गुणात्मक सर्वेक्षणातून हाती आलेले काही निष्कर्ष अनौपचारिक क्षेत्रात अलिकडील काळात दिसून आलेले बदल विशद करण्यासाठी उदाहरणादाखल दिले आहेत. उदाहरणार्थ, करारबद्धता आणि पूरक उद्योगीकरणाचा परिणाम कार्यशैलीवर आणि अनौपचारिक क्षेत्राच्या कार्यक्षमतेवर कशाप्रकारे झाला हा एक महत्वाचा पैलू आहे, त्यातून सकारात्मक बदलाप्रमाणेच कल्याणकारक गोष्टींचे झालेले नुकसान दिसून येते. अनौपचारिक (असंघटीत) उत्पादन क्षेत्रातील रोजगारात झालेली वाढ २००५-०६ ते २०१०-११ या काळात नकारात्मक होती. कदाचित अनौपचारिक क्षेत्रातील युनिटस. स्पर्धेत टिकू शकली नसतील आणि त्यामुळे मजुरांवरील खर्च कमी करण्याच्या प्रयत्नात रोजगाराच्या संधींमध्ये फार मोठ्या प्रमाणावर कपात केली गेली. **निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांमुळे भारतीय उत्पादनांच्या निर्यातीने आणि परिणामी अनौपचारिक क्षेत्राने वेग पकडला नाही. जागतिकीकरणाच्या संदर्भात चिनी उपक्रम जे फायदे घेऊ शकले ते फायदे भारतीय उपक्रमांसाठी आजदेखील स्वप्नवतच आहेत. आधुनिकीकरणाचा अभाव आणि माहिती व दळणवळण तंत्रज्ञानाच्या अनुपलब्धतेमुळे ना विविध उत्पादने तयार केली गेली ना उपक्रम उच्च मूल्याची उत्पादने तयार करू शकले.**

**विकासाचे इंजिन म्हणून उद्योगांना संजीवनी देण्याचे भारत सरकारच्या वतीने करण्यात येत असलेले प्रयत्न असंघटीत किंवा अनौपचारिक उत्पादने विकास आणि रोजगारात लक्षणीय भर घालण्याच्या स्थितीत नसल्याने अव्यवहार्य वाटतात. अनौपचारिक आर्थिक उपक्रमांना तोंड द्यावे लागत असलेला एक मोठा अडथळा वस्तुरूप आणि आर्थिक भांडवलाच्या अभावाशी निगडीत असून त्यातून मजुरांच्या उत्पादकतेतील वाढ सुस्तावली असून आणि उत्पन्न घटले आहे. वस्तूंच्या विपणनासाठी (marketing) देखील ते कंत्राटदारांवर अवलंबून आहेत आणि या प्रक्रियेत त्यांच्या नफ्यात लक्षणीय घट झाली आहे. कच्चा माल आणि उत्पादित माल यांची उपलब्धता वाढली असली तरी मध्यस्थाची पद्धत आणि प्रत्येक नगाच्या दरावर आधारित उत्पन्न यामुळे मिळणारे फायदे कमी-कमी होत जातात.** या अशा सर्व परिस्थितीमुळे निम्न स्तरावर काम करणाऱ्या मजुरांच्या हिताचे नुकसान कमी करण्यात सहाय्यभूत ठरू शकेल असे अनौपचारिक क्षेत्रासाठीचे धोरण सादर करण्याची नितांत गरज आहे.

**स्त्रोत** : राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेचा (NSSO) रोजगार आणि बेरोजगारी सर्वेक्षण (२००९-१०) आणि NSSO चा असंघटीत उत्पादन उपक्रम यावरील विशेष सर्वेक्षण (२००५-०६, २०१०-११)

**संदर्भ :**

दास, के. (एडि.) मायक्रो अँड स्मॉल इंटरप्रायजेस इन इंडिया : दी एरा ऑफ रिफॉर्म्स, राऊटलेज, नवी दिल्ली.

गोल्डर, बी. अरूप मित्रा आणि अनिता कुमारी, (२०११), ''परफॉर्मन्स ऑफ अनऑर्गनाइज्ड मॅन्युफॅक्चरींग इन दी पोस्ट रिफॉर्म्स पिरिएड'', इन के. दास (एडि.) मायक्रो अँड स्मॉल इंटरप्रायजेस इन इंडिया : दी एरा ऑफ रिफॉर्म्स, राऊटलेज, नवी दिल्ली, पीपी. ६७-९७.

हसन, राणा आणि कार्ल रॉबर्ट एल्. जॅनडॉक, (२०१०), ''दी डिस्ट्रीब्युशन ऑफ फर्म साईज इन इंडिया : व्हॉट कॅन सर्व्हे डेटा टेल अस?'', एडीबी इकॉनॉमिक्स वर्किंग पेपर सिरीज, नं. २१३, ऑगस्ट, एशियन डेव्हलपेंट बँक.

मैती, डी. आणि अरूप मित्रा, (२०१०), ''स्कील्स, इन्फॉर्मेलिटी अँड डेव्हलपमेंट'', इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ वर्किंग पेपर ३०६, दिल्ली.

मित्रा, अरूप (२०१३), इनसाईट्स इन टू इन्क्ल्यूजिव्ह ग्रोथ, एम्प्लॉयमेंट अँड वेलबिईंग इन इंडिया, स्प्रिंगर, नवी दिल्ली.

मित्रा, अरूप (१९९४), अर्बनायझेशन, स्लम्स, इन्फॉर्मल सेक्टर एम्प्लॉयमेंट अँड पॉव्हर्टी : एन एक्सप्लोरेटोरी अॅनॅलिसिस, डी.के. पब्लिशर्स, दिल्ली.

रामस्वामी, के.व्ही. (१९९४), ''स्मॉल स्केल मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रीज : सम आस्पेक्ट्स ऑफ साईज, ग्रोथ अँड स्ट्रक्चर'' इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली, व्हॉल्यूम २९, नं. ९, फेब्रुवारी २६, पीपी. एम १३ - एम २३.

शर्मा, आर. के. अँड अबिनाश दाश, (२००६), ''लेबर प्रॉडक्टीव्हिटी इन स्मॉल स्केल इंडस्ट्रीज इन इंडिया : अ स्टेटवाइज अॅनॅलिसीस'', दी इंडियन जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स, व्हॉल्यूम ४९, नं. ३, पीपी. ४०७-२७.

*(**अरूप मित्रा**- लेखक इंस्टिट्यूट ऑफ इकोनॉमिक ग्रोथ दिल्ली, येथे अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक आहेत. यांना गुणात्मक किंवा सांख्यिकी अर्थशास्त्र या विषयातील योगदानाबद्दल प्रा. महालनोबिस स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. संपर्कासाठी **ईमेल** -arup@iegindia.org)*

# ज्ञानाच्या परिप्रेक्ष्यातून असंघटित क्षेत्र

**-अमित बसोले**



**बहुसंख्य असंघटित कामगारवर्ग अकुशल असतो. असंघटित क्षेत्रातील कामगारांमध्ये शिक्षण प्रशिक्षणाचा असलेला अभाव, किमान वेतन व उत्पादनाचे निम्न प्रमाण हे अडथळे आहेत या संदर्भातील निरीक्षणाअंती असे निदर्शनास आले की, असंधटीत क्षेत्रात कौशल्याधारित ज्ञानाचा मोठा साठा असुनही त्या मानाने ज्ञान हस्तांतरण संस्था कमी आहेत.**

**ज्ञानाची निर्मिती, हस्तांतरण, संशोधन याचा तपास करण्याची भूमिका घेऊन आणखी संशोधन करण्याची गरज आहे. अंतिमतः, धोरणाच्या पुढे जाऊन, औपचारिक ज्ञानाच्या बरोबरीने लोकविद्येला प्रतिष्ठा आणि समान दर्जा देण्यासाठी राजकीय चळवळ करण्याची गरज आहे.**

**विषयप्रवेश :**

असंघटित क्षेत्र म्हणजे सर्वसाधारणपणे कमी कुशल अथवा अकुशल कामाचे स्थळ म्हणून मानले जाते. या क्षेत्रासाठी राष्ट्रीय उपक्रम आयोगाने अशी भूमिका घेतली आहे की, बहुसंख्य असंघटित कामगारवर्ग अकुशल असतो. (सेनगुप्ता २००९ : ३) हा निष्कर्ष दोन प्रयोगसिद्ध वस्तुस्थितींवर आधारलेला आहे.

या क्षेत्रातील कामगारांमध्ये औपचारिक शिक्षण आणि प्रशिक्षणाचा असलेला खालचा स्तर आणि या क्षेत्रातील वेतन व उत्पादकतेचे असलेले अत्यंत कमी प्रमाण. या लेखात मी या दोन्ही पैलुंचे जवळून निरीक्षण केले आहे. या मुद्यावरील अनेक धोरणात्मक व शास्त्रीय भूमिकांच्या विरोधात माझा असा दावा आहे की, असंघटित क्षेत्रात ज्ञानाचा फार मोठा साठा असून त्याचबरोबर ज्ञान हस्तांतरण आणि कुशलता निर्मितीच्या उत्तम रित्या प्रस्थापित झालेल्या संस्था (अगदीच माफक प्रमाणात लक्षात येत असल्या तरी) आहेत. या लेखात लघु उद्योगांची जनगणना, राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण आणि बनारसमधील हातमाग कामगार व खाद्यपदार्थ तसेच मुंबईतील फेरीवाल्यांची प्रयोगसिद्ध आकडेवारीही देण्यात आली आहे.

जागतिक बँक आणि जागतिक बौद्धिक संपदा संघटनांसारख्या जगातील बहुतेक प्रमुख संस्थांनी अलिकडेच पारंपरिक व वाढत्या नैसर्गिक, जीवंत

ज्ञानशाखांमध्ये (TK/IK) गांभीर्यपूर्वक काम सुरू केले असून या

ज्ञानशाखांना जागतिक दृष्टीकोन व ज्ञानमीमांसा शास्त्र त्याचबरोबर आधुनिक ज्ञानापेक्षा भिन्न अशी ज्ञान निर्मिती व हस्तांतरण संस्था असल्याचे मानले गेले. जैवविविधता, कृषी - वनीकरण, पर्यावरणशास्त्र, औषधे, हस्तकला आदी संबंधी जगभरातील शेतकरी, हस्तकलाकार, महिला, एतद्देश्यीय लोकांनी शतकानुशतकांपासून जोपासलेल्या ज्ञानाचे विश्लेषण व वर्णन करणाऱ्या साहित्याचे मोठे भांडार खुले झाले आहे. (बसोले २०१२) असंघटित क्षेत्रात मेहनत करणारे हेच लोक आहेत. मात्र पारंपरिक व एतद्देश्यीय ज्ञानशाखांचे हे उदाहरण असंघटित क्षेत्राचे विश्लेषण करतांना पुरेशा प्रमाणात लागू केले गेले नाही, याचे कारण कदाचित असंघटित कामगार आणि उद्योग हे केवळ कृषी व हस्तकला यापुरतेच सिमीत न राहता खाद्यपदार्थ, वस्त्रोदयोग , तयार कपडे, प्लॅस्टिक, धातू उद्योग, यंत्रे, बांधकाम तसेच सेवा क्षेत्रांतही दिसतात, जे उद्योग आधुनिक तंत्रज्ञानाचा नेहमीच वापर करतात आणि पारंपरिक उद्योग या

व्याख्येत बसत नाहीत, हे असावे. तसेच असे उद्योग चालवणारे बहुउद्देश्यीय लोकांनीही (सहस्त्रबुद्धे आणि सहस्त्रबुद्धे २००१) ज्यांना औपचारिक शिक्षण वा प्रशिक्षण मिळालेले नाही, त्यांच्या कौशल्याचा परामर्श घेणाऱ्या व त्याही पुढे जाऊन ज्ञानमीमांसा आणि मूल्यव्यवस्थेचा अंतर्भाव असलेल्या लोकविद्या या संकल्पनेचा (people's knowledge) प्रस्ताव केलेला नाही. राष्ट्रीय ज्ञान आयोगाने संकल्पित केलेले ज्ञान भारतीय समाजात परिवर्तन करण्यासाठी, देशातील फार मोठ्या संख्येने काम करणाऱ्या कामगारांनी निर्माण व वापर केलेल्या लोकविद्येला मान्यता देऊन, तिचा अभ्यास करून त्यावर उभारणी केली पाहिजे.

**वेतन, उत्पादकता आणि कौशल्य यांच्यातील संबंध**

असंघटित क्षेत्रातील कमी वेतन आणि कमी उत्पादकतेचे प्राबल्य हे नेहमीच या क्षेत्रातील पायाभूत कौशल्याचा स्तर खालचा असल्याचा पुरावा म्हणून वापरले जाते. वस्तुत: कौशल्य, उत्पादकता आणि वेतन यांच्यातील संबंध हे गुंतागुंतीचे असून संस्थात्मक व रचनात्मक घटकांनी ते निश्चित केले जातात. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेचे प्रमुख रचनात्मक वास्तव म्हणजे येथील मनुष्यबळाची अतिरिक्त उपलब्धता हे आहे. फार मोठ्या संख्येने असलेल्या कामगारवर्गाला संघटित क्षेत्रातून वगळण्यात आल्याची परिणती रोजगार उपलब्ध नसल्यामध्ये झाली. स्वत:चा उद्योग सुरू करण्यास बाध्य झालेले, सूक्ष्म उद्योगांची उत्पादन बाजारपेठ आणि असंघटित क्षेत्रातील कामगार बाजारपेठ यांच्यातील कमालीच्या स्पर्धेत होते.संघटित आणि असंघटित क्षेत्रातील वेतनातील ही तफावत केवळ कामगारांच्या निरीक्षण केलेल्या वैशिष्ट्यांमुळे (जसे की कौशल्य) नव्हे तर उद्योगाचा सरासरी आकार, उत्पादन बाजारपेठेतील स्पर्धेची तीव्रता आणि भांडवल-कामगार गुणोत्तर प्रमाण यावर आधारित असते का,? यावर संशोधन करता येईल. आणखी पुढे, उत्पादकता मोजण्याची साधने जशी की, प्रति मजूर मूल्यवर्धन बाजारपेठेतील किंमतीवर अवलंबून असल्याने आणि उत्पादन बाजारपेठेतील तीव्र स्पर्धेच्या


## प्रकाशन विभागाच्या प्रकाशनांची ५०% सवलतीत विक्री





**प्रकाशन विभागातर्फे ३१ डिसेंबर २००४ पर्यंत प्रकाशित करण्यात आलेल्या सर्व प्रकाशनांची ५०% सवलतीच्या दरात विक्री करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, प्रकाशन विभागातर्फे ३१ डिसेंबर २०१० पर्यंत प्रकाशित करण्यात आलेल्या कोणत्याही नियतकालिकांच्या १०० रुपये किंमतीच्या खरेदीवरदेखील ५०% सवलत देण्यात येत आहे. २३ ऑगस्ट २०१३ ते २२ फेब्रुवारी २०१४ या सहा महिन्यांच्या कालावधीत या सवलतीचा लाभ घेता येणार आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी - प्रकाशन विभाग, सी - ७०१, केंद्रीय सदन, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ या पत्त्यावर किंवा** dpdsenavimumbai@gmail.com **या ई-मेलवर संपर्क साधावा.**

दबावामुळे किंमती घसरत असल्याने अधिक स्पर्धात्मक बाजारपेठेतील कंपन्यांची उत्पादकता ही बाजारपेठीय ताकदीचा लाभ घेणाऱ्यां कंपन्यांपेक्षा कमी दिसते.

वेतनाशिवाय कामगारांच्या अन्य वैशिष्ट्यांबाबत अनुमान काढण्यासाठी आणखी एक गोंधळात टाकणारी बाब म्हणजे, अतिरिक्त मनुष्यबळ असलेल्या अर्थव्यवस्थेत सौदेबाजीची ताकद कमी असल्याने अगदी कुशल कामगारालाही कमी वेतन असू शकते. (नोरिंगा १९९९, लेबल आणि रॉय २००४) त्याही पुढे, उत्पादकतेची गोड फळे कामगारांऐवजी भरपूर नफ्याच्या प्रमाणात मालकाला किंवा उत्पादन बाजारपेठ स्पर्धात्मक असेल तर ग्राहकाला स्वस्त किंमतीच्या रुपात मिळतात. (हेंझ २००६) उदाहरणार्थ, बनारस हातमाग व्यवसायात यंत्रमाग हे हातमागांपेक्षा दहा पटींनी जास्त उत्पादकता असलेले आहेत, तरीही त्यातील कामगारांचे प्रति ताशी वेतन जवळपास समानच आहे. (बसोले २०१४)

### ज्ञान/बुद्धीवंतांची गणना कशी होते?

असंघटित कामगारांत कौशल्याचा अभाव असतो, ही समजूत केवळ वर उल्लेख केलेल्या आर्थिक घटकांवर अवलंबून नाही. विविध प्रकारच्या

ज्ञानाला संलग्न असलेली प्रतिष्ठा किंवा मूल्य असे सामाजिक घटक आणि ज्ञानाची गणना कशी करायची, असे वैचारिक घटकही महत्वाचे आहेत.

उदाहरणार्थ, असंघटित क्षेत्रातील अतिप्रतिनिधित्व असलेल्या महिला आणि कनिष्ठ जातीच्या कामगारांच्या ज्ञानाचे अवमूल्यन झाले आहे.(इलय्या २००९) एनसीईयूएस असे नमूद करते की, असंघटित क्षेत्रातील महिला करत असलेल्या कामांसाठी अद्वितीय बुद्धीमत्ता आणि अनेक वर्षांचे प्रशिक्षण आवश्यक असले तरी ही कामे किमान कौशल्याची म्हणूनच गणली जाऊ शकतात. (सेनगुप्ता २००७ : ८४ ) वस्त्रोद्योग आणि सिरॅमिक उद्योगाचे उदाहरण यासाठी दिले जाते ज्यात महिला कुशल काम करतात (नाजूक कशिदाकाम अथवा चिकणमाती तयार करणे) तरीही त्यांना सर्वात कमी वेतन मिळते. बसोले यानीं हे दाखवून दिले आहे की, बनारसमधील कशिदाकाम करणाऱ्या महिला कामगारांना संपूर्ण दिवसाच्या कामाचा मोबदला म्हणून अवघे २५ ते ३० रुपये मिळतात. इतक्या कमी वेतनाचे व्यापारी आणि खुद्द महिलाही असे समर्थन करतात की, असे काम करण्याचे कौशल्य महिलांमध्ये उपजतच असते आणि त्या हे फावल्या वेळात म्हणून करतात.

असंघटित क्षेत्रातील ज्ञानाचा आधार निश्चित करण्यासाठी अधिकृत सर्वेक्षणे ही सर्वसाधारणपणे पुरेशी नाहीत कारण लोकविद्येची रचना समजून घेण्यासाठी ते केलेलेच नाहीत. लघु उद्योगांवरील तिसऱ्या आणि चौथ्या अखिल भारतीय जनगणनेत (भारत सरकार २००४ व २०१२) लघु उद्योग कंपन्यांना त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा स्त्रोत विचारला होता. या दोन्ही वर्षात, ९० टक्के अनोंदणीकृत कंपन्यांकडे कुठलाही स्त्रोत उपलब्ध नव्हता हे तक्ता क्रमांक १ ने दाखवून दिले आहे. कंपन्या कितीही लहान असल्या तरी तांत्रिक ज्ञानावर आधारित काम करित असतात आणि साधनसंपत्तीवर आधारित अथवा बाजारातील मागणीनुसार (कितीही वाढीव वा लहान असली तरी) नव्या सुधारणा राबवत असतात, अशी सर्वेक्षणे असंघटित क्षेत्रात तंत्रज्ञानाचे कार्य कसे चालते, याची माहिती घेण्यास काहीच सहाय्य करत नाहीत. याचे कारण असे की, कारागीर आणि कामगारांचे उपजत ज्ञान, त्यांचे असंघटित जाळे आणि आपल्या गरजांनुसार संघटित क्षेत्रातील ज्ञानाची नक्कल किंवा स्वीकार करण्याची क्षमता समजून घेण्याची त्यांनी रचनाच केलेली नसते.

**तक्ता १ अनोंदणीकृत लघुउद्योग क्षेत्रातील तांत्रिक ज्ञानाचा स्त्रोत**

| स्त्रोत | २००१ | २००७ |
|---|---|---|
| परदेशी | ०.६७ | ०.८० |
| देशांतर्गत सहकार्य | ५.५८ | २.११ |
| देशांतर्गत संशोधन | | |
| आणि विकास | ४.८४ | ३.२२ |
| यापैकी काहीही नाही | ८८.९१ | ९२.८३ |

स्त्रोत : लघुउद्योगांची तिसरी जनगणना, २०००-०१ आणि सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची चौथी जनगणना, २००६-०७

राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण रोजगार-बेरोजगारीच्या ताज्या आकडेवारीनुसार (२०११-१२), ग्रामीण भागात ७० टक्के तर शहरी भागातील ४३ टक्के १५ वर्षांवरील तरुणांचे (हेच प्रमाण महिलांसाठी अनुक्रमे ८३ आणि ५५ टक्के) सर्वसाधारण शिक्षण माध्यमिकपेक्षाही कमी आहे. रोजगाराभिमुख कौशल्यासाठी महत्वपूर्ण असलेले इतर प्रशिक्षण तर कामगारांत अभावानेच आढळते. इयूएसची आकडेवारीही हेच दर्शवते की, ८९ टक्के कामगारवर्गाला कोणतेही औपचारिक अथवा अनौपचारिक तांत्रिक किंवा व्यावसायिक प्रशिक्षण मिळालेले नाही. (बसोले २०१२). ही आकडेवारी आणि एनएसएसच्या अशाच आकडेवारीच्या आधारावर एनसीईयूएसने असा निष्कर्ष काढला की, १५ वर्षांवरील जवळपास ९० टक्के कामगारांकडे कोणतेही कौशल्य नाही. (सेनगुप्ता २००९ : १९१)

हा निष्कर्ष समजणे अवघड आहे. असंघटित क्षेत्रातील कौशल्य संपादनची प्रक्रिया आणि मनाव ज्ञाननिर्मितीचे स्वरूप यांचे आकलन नेहमीच्या पारंपरिक सर्वेक्षणाच्या पद्धतीनुसार ज्यात शाळेत किती वर्ष गेला, कोणते प्रशिक्षण घेतले आणि प्रमाणपत्र कोणते मिळाले, इत्यादीची जंत्री असते, होणे कठीण आहे, असे मला वाटते. असंघटित क्षेत्रात या गोष्टी गायब असतात. त्याऐवजी कौशल्य संपादनाची प्रक्रिया चरितार्थ चालवण्यात एकात्म झालेली असते. शास्त्रीय आणि धोरणात्मक कार्यात औपचारिक संपादित शिक्षणाबद्दल पक्षपात करण्याचा इतिहास आहे. शिवाय, काही असंघटित क्षेत्रातील कामगारांनी तर अशी ज्ञानाची उतरंड, नैसर्गिक रित्याच आत्मसात केलेली असली तरीही आपले ज्ञान हे शिक्षण वा प्रशिक्षणातून आलेले आहे, याची त्यांना जाणीवही नसते. काम करतांना कौशल्य प्राप्त झाले आहे, असे त्यांना वाटते. (अधिकृत सर्वेक्षणात नकारात्मक उत्तरांचे स्पष्टीकरण देतांना ही गोष्ट समोर आली.) कामगार आपल्या उद्योगात कौशल्य कसे आत्मसात करतात, याबद्दल विचारल्यावर बनारसमधील मिठाई दुकानदाराने सामायिक भावनाच व्यक्त केली. त्यात अभ्यास करण्यासारखे


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :
**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**
(Circle the period of subscription)

DD / MO No. ______________________ date ______________

Name (in block letters) : ______________________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ______________________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.
P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

काहीच नाही, असे तो म्हणाला. त्याचवेळी, ज्ञानाची अशी वर्गवारी अन्याय्यकारक आहे, याबाबतीतही जागृती झाली आहे. असंघटित प्रशिक्षणासाठी तितकीच वर्षे घालवलेल्या आणि दुसरीकडे औपचारिक प्रमाणपत्र मिळवलेल्यांचा कामगार बाजारपेठ करत असलेल्या मूल्यमापनातील तफावत आणि औपचारिक व अनौपचारिक शिक्षण यातील तफावतींचा मुद्दा बनारसमधील विणकाम करणारे कामगार नेहमीच कळकळीने मांडतात. (बसोले २०१२)

काम करतांना मिळवलेले ज्ञान हे औपचारिक शिक्षणाद्वारे मिळवलेल्या ज्ञानापेक्षा तसुभरही कमी दर्जाचे नसते, हा दृष्टीकोन आता इतिहास ते विज्ञान आणि मानसशास्त्रापासून ते ज्ञानाच्या व्यवस्थापनापर्यंत सर्व क्षेत्रांमध्ये चलनी नाणे बनत आहे. विज्ञानाचे इतिहासकार म्हणतात की, तत्वज्ञान, विज्ञान आणि गणिताचे शास्त्र कारागीर व कामगारांनी तयार केले आहे आणि वास्तवातील प्रश्न सोडवण्यातून ते वाढले आहे, त्यांच्यापासून फारकत घेऊन नव्हे. (कॉन्नोर २००५) वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रातील ठराविक कारागिरी हस्तव्यवसायाला मूर्त स्वरूप देण्याच्या रोजच्या पद्धतीत दिसते. ज्ञान व्यवस्थापनाच्या क्षेत्रात बर्नेट (२०००: १७) यांनी व्यावहारिक ज्ञानाची संकल्पनेची रुपरेषा सांगितली असून काम हे ज्ञान निर्मितीचे स्थळ आहे, असे ते मानतात. पुढे ते असा दावा करतात की, ज्ञानाचा काम करताना उपयोग होत असेल तरच ते अधिकृत आहे आणि काम हे ज्ञानाची परीक्षा घेण्याचे साधन आहे. नुसते कामच नव्हे, तर खेळांतूनही शिक्षण मिळते. उदाहरणार्थ, विणकाम करणाऱ्या कुटुंबातील मुले हातमागातील धोटा खेळत (shuttle) शिकतात, जे त्यांनी आपले वडील/भाऊ यांनी करताना पाहिलेले असते अथवा विणकाम कारखान्यात नुसते भटकत राहतात, ज्यातून तेथील परिस्थिती अथवा आवाजांशी रुळतात. (वुड २००८) असंघटित क्षेत्रातील ज्ञानाची निर्मिती आणि प्रसारामागील प्रेरक शक्ती समजून घेण्यासाठी हा सैद्धांतिक दृष्टीकोन उपयोगात आणला जाऊ शकतो.

**लोकविद्या संस्था**

औपचारिक शिक्षणापेक्षा शिकाऊ कारागीर अथवा प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण याचा असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी किती तरी जास्त पटींनी उपयोग होत असला


Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Punjabi, Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level-VII, R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 011-2610 0207, 011-2610 5590; Fax : 011-2617 5516**

**Subscriptions will arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi-110054,** Ph.011-2389 0205 ● A-wing, Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai-600090,** Ph.: 044-2491 7673 ● 8, Esplande East, **Kolkata - 700069,** Ph: 033-2248 8030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna-800004. Ph.: 0612-268 3407 ● Press Road, Near Govt., Press **Thiruvananthapuram-695001,** Ph.: 0471-2330 650 ● Hall No. 1, 2nd floor, Kendriya Bhawan, Sector - H, Aliganj, **Lucknow-226024,** Ph.: 0522-232 5455 ● 701, C-Wing, 7th Floor, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai-400614,** Ph.: 022 2757 0686 ● Block 4, 1st Floor, Gruhakalpa Complex, M.G. Road, Nampally, **Hyderabad - 500001.** Ph.: 040-2460 5383 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore-560034.** Ph.: 080-2553 7244 ● KKB Road, New Colony, House No.7, Chenikuthi, Guwahati-781003, Ph.: 0361-2665 090 ● Ambica Complex, 1st Floor, Paldi, **Ahmedabad - 380007.** Ph.: 079-2658 8669.

**For Yojana Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujarati, Marathi, Bengali, Assamese, Oriya, Urdu and English, Hindi - please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai-400614. Ph.: 022-2756 6582
Editor, Yojana (Gujarati), Ambika Complex, 1st Floor, Paldi, Ahemdabad-380007. Ph.: 079-2658 8669
Editor, Yojana (Assamese), KKB Road, New Colony, House No. 7, Chenikuthi, Guwahati-781003. Ph.: 0361-266 5090
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata-700069. Ph.: 033-2248 2576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Rajaji Bhawan, Basant Nagar, Chennai-600090. Ph: 044-2491 7673
Editor, Yoajna (Telugu), Block No. 4, 1st Flr., Gruhakalpa Complex, M.G.Rd, Nampally, Hyderabad-500001. Ph.:040-2460 5383
Editor, Yojana (Malayalam), Press Road, Near Govt. Press, Thiruvananthapuram-695001, Ph: 0471-233 0650
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore-560034, Ph: 080-2553 7244.

तरीही या दोन विषयावर साहित्य अगदीच तुटपुंजे आहे. समकालीन कारागिरी कंपन्यांनी शिकाऊ कारागिरी आणि कौशल्य हस्तांतरणाच्या इतर अनुवांशिक पद्धतीचे महत्व उघड केले असले (पार्थसारथी १९९९) तरीही काही अपवाद वगळता (बिस्वास आणि राज १९९६) असंघटित उद्योगांचा अभ्यास करणाऱ्या विकास अर्थतज्ञांनी कौशल्य संपादनाच्या मुद्याकडे दुर्लक्षच केले आहे. अशा संस्था आणि त्या देत असलेले कौशल्य यांचा अभ्यास करण्यातील समस्या त्या संस्था रचनात्मक नाहीत अथवा विस्कळीत आहेत, ही नाही तर आमच्या अभ्यासाच्या पद्धती योग्य नाहीत, ही आहे. अनौपचारिक प्रशिक्षण पद्धतीच्या अभ्यासातील प्रमुख अडथळा म्हणजे सामान्य जीवन आणि कार्यात त्या पूर्णपणे एकात्म झाल्या आहेत. शिक्षण घडवणारी जागा अथवा वेळ म्हणून निश्चित समजता येईल, असे हे नाही. प्रशिक्षण अथवा शिकण्याच्या प्रमाणाची गणती करता येण्याजोगी नाही आणि औपचारिक कागदपत्रेही नसतात. येथे शुल्कही नसते, मात्र शिकाऊ कारागिरीदरम्यान आधीच ठरलेले वेतन अथवा प्रशिक्षण किंवा शिकाऊ कारागीरांच्या वेळेची किंमत याबाबत अव्यक्त खर्च गृहीत धरलेला असतो. कुटुंब, जात, लिंग आणि सामुदायिक संबंध यांत ही प्रक्रिया पूर्ण गुरफटलेली असून सामुदायिक संबंध हे बिगरआर्थिक असे समजले जातात. या सर्वासाठी ज्या मानवजातीविज्ञान विषयक दृष्टीकोन स्वीकारण्याची गरज आहे, तो स्वीकारण्यास अर्थतज्ञ सहसा नाखुष असतात. त्यामुळेच, अशा संस्थांबाबत आमचे सर्व ज्ञान आर्थिक मानववंशशास्त्र-ज्ञांकडून येते.(बार्बर २००४ ; बसोले २०१२)

जेव्हा असंघटित क्षेत्राचा त्यातील ज्ञान संस्था समजून घेण्याच्या दृष्टीकोनातून आपण अभ्यास करतो(कौशल्य संपादन, नाविन्यपूर्ण उपक्रम, कंपन्यांमधील ज्ञानाची देवाणघेवाण) तेव्हा हे क्षेत्र म्हणजे अकुशल कामगारांसाठी ती एक बुडण्यासाठी खाई आहे, या ठराविक पद्धतीची समजूत करून घेणे चुकीचे होईल. असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या मुलाखतींतुन हे उघड झाले की, त्यांनी औपचारिक प्रमाणपत्र किंवा पदवी अभ्यासक्रमांपेक्षाही जास्त काळ प्रशिक्षणात घालवला आहे. कुटुंबातील तसेच कुटुंबाबाहेरील शिकाऊ कारागिरीचा काही महिन्यांपासून ते काही वर्षांपर्यंतचा काळ येथे अगदी नेहमीचा आहे.प्रवेश करण्यासाठी आर्थिक अडसर फारच कमी असतात. (मात्र जात अथवा लिंग निकषांसारखे संस्थात्मक अडसर मोठे असू शकतात) प्रशिक्षणाच्या पद्धती उत्कृष्ट विकसित आणि रचना केलेल्या असतात व कामगार आणि त्यांचे प्रशिक्षक वैयक्तिक शिस्त तसेच शिकण्याच्या इच्छेचे महत्व अधोरेखित करतात. मालक त्यांच्या कुशल कारागिरांची काळजी घेतात कारण बहुतेक ज्ञान हे प्रक्रिया अथवा नित्याच्या कामात नव्हे तर कामगारांमध्ये दडलेले असते. जेथे नवीन कौशल्य शिकण्याची संधी आहे तेथे कामगार काम मिळवतात. उत्पादनाशी संबंधितच नव्हे तर संवादकौशल्यही संपादित केले जाते. बिर्ला आणि बसोले (२०१३) यांनी मुंबईतील फेरीवाले, टॅक्सीचालक व प्रवासी गाईड्स त्यांची इंग्रजी भाषा शिकण्याची प्रक्रिया समजून घेण्यासाठी मुलाखती घेतल्या. आपल्या वरिष्ठांकडूनच हे कामगार शिकतात असे नव्हे तर सार्वजनिक जाहिरातींचे फलक, बॅनर्स, ग्राहकांशी संवाद, मोबाईलमधील नवे तंत्रज्ञान यांचा कौशल्य विकासात मोठा वाटा आहे. मुंबईतील प्रसिद्ध लिंकिंग रोडवरील एक दुकानदार म्हणाला की, लिंकिंग रोड ही एक शाळा आहे. बार्बर (२००४) यांनी अशा शिक्षणाचे सामर्थ्य म्हणजे प्रवेशात अडचणी कमी, साधनसंपत्तीचा तुटवडा असतांना नवीन शोध व पद्धतींचा स्वीकार आणि छुप्या ज्ञानाचा विकास ही वैशिष्ट्ये सांगितली आहेत. अपुरे सैद्धांतिक आकलन, नवीन तंत्रज्ञान व सुरक्षा उपाय आत्मसात करण्यात अडचणी हे दोष आढळले आहेत.

शेवटी, तपशीलवार चर्चा शक्य नसली तरी मी असंघटित क्षेत्रातील कंपनी स्तरावरील नाविन्यपूर्णतेचा तपास करण्याच्या महत्वाकडे निर्देश करतो. रस्त्यावर खाद्यपदार्थ विकणारे आणि विक्रेते यांच्यासारखे लहान असंघटित व्यावसायिकही आपल्या उत्पादन व त्याच्या लौकिकाबद्दल अभिमानी असतात. नवीन पदार्थ नेहमीच त्यांच्या मेन्युत असतात. कारागीर उद्योग म्हणून नाविन्यपूर्ण शोधांची संधारण वाढ होतच असते आणि बौद्धिक संपदा हक्कांचा अभाव असल्याने व्यापारी गुप्तता कमालीची पाळली जाते. (बसोले २०१४) लोकविद्या सातत्याने विकसित होते आहे, उत्क्रांत होते आहे,

नव्याचा स्विकार करून बदलते आहे. यंत्रमागासारख्या कारागिरी उद्योगाची आधुनिक उद्योगात उक्रांती होताना, पारंपरिक संस्थांचे तांत्रिक बदलांना सक्षम करण्याचे महत्व अधोरेखित होते. (हेन्स २०१२) राष्ट्रीय ज्ञान आयोगाच्या भारतातील नाविन्यपूर्ण शोध (भारत सरकार २००७) या अहवालात काही एसएमईजच्या मुलाखतींतून या मुद्याचा परामर्श घेतला आहे पण अद्याप त्यावर बरेच काम करणे बाकी आहे.

**समारोप**

वर केलेल्या युक्तिवादाचा असा अर्थ काढला जाऊ नये की, औपचारिक शिक्षण महत्वाचे नाही अथवा असंघटित क्षेत्रातील अस्तित्वात असलेल्या

ज्ञान संस्था पुरेशा आहेत. असंघटित क्षेत्रातील पारंपरिक पद्धतीच्या माध्यमातून प्रत्यक्ष कामावरील कौशल्य संपादनासाठी सध्या वापरल्या जाणाऱ्या पद्धती पुरेशा आहेत काय? या एनसीइयूएसच्या प्रश्नाला (सेनगुप्ता २००९ : ९) उत्तर नाही असेच असले पाहिजे. सुयोग्य रचना आणि माहितीवर आधारलेल्या धोरण कौशल्यात सुधारणा, पारंपरिक व्यवसायांत आधुनिक तंत्रज्ञानाची एकात्मिकता आणि उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टीने मोठा बदल घडवते. पण सरकारने चालवलेले व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम असंघटित क्षेत्रातील लोकांना नोकऱ्या मिळवून देण्यात अयशस्वी ठरले, याकडेही एनसीइयूएस लक्ष वेधते. या संस्था असंघटित क्षेत्रातील कामगार व व्यावसायिकांपासून फटकून राहिलेल्या आहेत. अस्तित्वात असलेल्या असंघटित संस्थांत त्या क्षेत्राच्या सहभागातूनच उभारणी करणे हा याला पर्याय आहे. नायजेरियातील 'नॅशनल ओपन ऍप्रेंटिसशिप स्कीम' सारख्या अथवा एनसीईयूएसने चर्चा केलेल्या अन्य देशांतील उदाहरणे यासाठी उपयुक्त ठरतील. हे करण्यासाठी, अंसघटित क्षेत्र ज्या पद्धतीने काम करते, त्याच पद्धतीने

ज्ञानाची निर्मिती, हस्तांतरण, संशोधन याचा तपास करण्याची भूमिका घेऊन आणखी संशोधन करण्याची गरज आहे. अंतिमतः, धोरणाच्या पुढे जाऊन, औपचारिक ज्ञानाच्या बरोबरीने लोकविद्येला प्रतिष्ठा आणि समान दर्जा देण्यासाठी राजकीय चळवळ करण्याची गरज आहे.

**आभार**

या लेखात मांडलेल्या कल्पनांसंबंधी झालेल्या चर्चेच्या दृष्टीने मी सुनील सहस्त्रबुद्धे, राजेश भट्टाचार्य आणि जे. मोहन राव यांचे आभार मानतो.

**संदर्भ**

बार्बर, जे. (२००४) स्किल अपग्रेडिंग विदिन इन्फॉर्मल ट्रेनिंग : लेसन्स फ्रॉम इंडियन ऍटो मेकॅनिक, इंटरनॅशनल जर्नल ऑफ ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट, ८(२), १२८-१३९.

बर्नेट, आर. (२०००) वर्किंग नॉलेज इन रिसर्च अँड नॉलेज ऍट वर्क : पर्स्पेक्टिव्हज, केसस्टडीज अँड इन्नोव्हेटिव्ह स्ट्रटेजीज, रौटलेज, न्यूयॉर्क पृ.१५-३१.

बसोले, ए. (आगामी) ''स्पेअर चेंज फॉर स्पेअर टाईम? होमवर्किंग वुमेन इन बनारस'' इन एस.राजू (आवृत्ती) वुमेन वर्कर्स इन मेट्रो सिटीज ऑफ इंडिया, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस.

*(**अमित बसोले**- लेखक सध्या अमेरिकेतील बोस्टन स्थित मेसॅच्युसेट विद्यापीठात अर्थशास्त्र विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. येथे ते प्रामुख्याने डेव्हलपमेंट इकॉनॉमिक्स व पॉलिटिकल इकोनॉमी हे विषय शिकवतात. संपर्कासाठी **ईमेल**- abasole@gmail.com)*

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके (हिंदी)**

१. भारतीय दुर्ग -₹ ४८५.००

२. जाने अपने जिगर की ₹ २०५/-

३. माऊंट एव्हरेस्ट की गाथा ₹ ११५/-

# गांधी आणि स्वच्छता

-सुदर्शन अय्यंगार



**जनतेच्या जीवनशी निगडीत 'स्वच्छता व आरोग्य' या तर विषयाला महात्मा गांधी यांनी आपल्या संपूर्ण जीवनात बरेच महत्व तर दिलेच परंतू लोक प्रबोधन करतांना भविष्यातील 'सामाजीक सुची 'कशी असावी या बाबत मार्गदर्शनही केले. त्यांनी कार्यकर्ते घडवलेचं नाही तर कार्यकत्यांमध्ये भावी कार्यकर्ते शिक्षक घडविण्याचे कसब निर्माण केले. मागील शंभर वर्षानंतरही वर्ष २०१२ चा युनिसेफ व जागतिक आरोग्य सघंटनेच्या अहवालाचे निरीक्षण केल्यास, गांधीजींची स्वच्छता निती आपण किती आत्मसात केली याबाबत संदेह निर्माण होतो केवळ उद्दिष्टे ठरवून उपयोगाचे नाही तर उद्दिष्टांची पुर्ती झाली. तर समस्यांचे प्रमाण कमी होण्यात व नवीन स्वच्छता विषयक समस्यांचे निराकरण होण्यास मदत होईल.**

नुकत्याच आमच्या एका कार्यकर्ता असलेल्या शिक्षकाने ग्राम व तालुका स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पदाधिका-यांनी व संभाव्य लाभार्थीनी निधी व अंमलबजावणीसाठी सादर केलेले वैयक्तिक शौचालय बांधण्याचे प्रस्ताव साफ फेटाळून लावण्याच्या संशयास्पद वर्तनाबद्दल चिंता व्यक्त केली.

आम्ही स्वत:लाच दिलेल्या वचनानुसार, गुजरात विद्यापीठाने शौचालय बांधण्यासाठी सक्रीय प्रोत्साहन देण्यात पुढाकार घेतला. श्री नारायण देसाई यांच्या १०८ व्या गांधीकथेनंतर हा ठराव करण्यात आला होता. सुरूवातीला नमूद केलेल्या समस्येनंतरही आणि लोकांचे मन वळवणे सहज शक्य नसतांना, गुजरातच्या राजधानीपासून २० किमी. अंतरावर विद्यापीठाचे ग्रामीण केंद्र जेथे आहे, त्या सद्रा परिसरातील गावांमध्ये गेल्या दोन वर्षांत १३०० हून अधिक शौचालये बांधण्याच्या कामी आम्हाला यश आले आहे. भ्रष्ट आणि उदासीन सरकारी अधिका-यांचा सामना करतांना तर या अडचणी आणखीच वाढतात, याचा अनुभवही तेथे आला.

घरात शौचालय असलेल्यांपेक्षा मोबाईल धारण करणा-या भारतीयांची संख्या जास्त आहे. वैयक्तिक व कौटुंबिक स्वच्छतेप्रती लोक किती जागरूक, समंजस आणि प्राधान्यशील आहेत, याचे प्रतिबिंब यातच उमटते. भारतीय लोकांमधील या अभावाची जाणीव गांधीजींना लहानपणापासूनच झाली होती. कोणत्याही नागरी आणि विकसित मानवी समाजासाठी उच्च दर्जाच्या स्वच्छतागृहाच्या गरजेची त्यांना आंतरिक जाणीव झाली होती. पाश्चात्य समाजात वावरल्यावर त्यांनी ही जाणीव विकसित केली होती. दक्षिण आफ्रिकेत घालवलेल्या काळापासून ते भारतातील संपूर्ण आयुष्यभरात, गांधीजींनी अखंडपणे व अथकपणे स्वच्छतागृहांसाठी आग्रही प्रचार केला. गांधीजींच्या दृष्टीने स्वच्छतागृहे हा सर्वाधिक महत्वाचा सार्वजनिक मुद्दा होता. १८९५ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील ब्रिटीश सरकारने स्वच्छतागृहांच्या बाबतीत भारतीय व आशियाई व्यापा-यांच्या बाबतीत पक्षपात सुरू केल्यापासून ते अगदी हत्या होण्याच्या एक दिवस अगोदर म्हणजे २९ जानेवारी १९४८ पर्यंत गांधीजींनी स्वच्छतागृहांचा मुद्दा जाहीर भाषणांत सतत चर्चेत आणला. काँग्रेसची जागा घेण्यासाठी स्थापन करण्यात यावयाच्या लोक सेवक संघाच्या घटनेच्या मसुद्यात गांधीजींनी लोक कार्यकर्त्यांची कर्तव्ये खालीलप्रमाणे नमूद केली आहेत. 'त्याने लोकांना स्वच्छता व पोषक आहाराबाबत शिक्षित केले पाहिजे आणि त्यांच्यात अनारोग्य व रोग फैलावू नयेत, यासाठी सर्वतोपरी उपाययोजना केली पाहिजे. (द कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी ३, खंड ९० पी, ५२८).

स्वच्छतेबाबत गांधीजींच्या पूर्वसंकेताबद्दल थोडक्यात माहिती देऊन विद्यमान परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

**सार्वजनिक व्यासपीठांवर स्वच्छतागृहांचा मुद्दा: दक्षिण आफ्रिकेत गांधीजी:**

दक्षिण आफ्रिकेतील व्यावसायिक क्षेत्रांत वसलेल्या भारतीय व्यापा-यांच्या स्वच्छतेच्या सवयींचे समर्थन करताना प्रथम गांधीजींनी सार्वजनिक व्यासपीठांवर स्वच्छतागृहांचा मुद्दा आणला. दक्षिण आफ्रिकेतील भारतीय आणि आशियाई समुदायाच्या वतीने अर्जदार म्हणून गांधीजींनी भारतीय व्यापा-यांच्या स्वच्छतेविषयक प्रथांचे समर्थन केले आणि सतत स्वच्छतेच्या उत्तम सवयींचे पालन करण्याचे आवाहन त्यांनी या समुदायांना केले. लॉर्ड रिपन यांना केलेल्या अर्जात त्यांनी स्वच्छतेचा मुद्दा अशा त-हेने आणला.

स्थानिकांव्यतिरिक्त इतर सर्वांच्या हितांचे समान संरक्षण करण्याची हमी देणा-या १८८१ च्या परिषदेतील मंजूर कलमापासून झालेल्या दुर्दैवी फारकतीचा उगम, ट्रान्सवालमध्ये स्थायिक झालेले भारतीय व्यापारी स्वच्छतेच्या सवयींचे योग्य रित्या पालन करत नाहीत, या चुकीच्या अनुमानातून झाला असून विशिष्ट हितसंबंधीयांनी केलेल्या चुकीच्या सादरीकरणावर ती आधारित आहे. (सीडब्ल्यूएमजी, खंड १, १९६९ आवृत्ती, पृष्ठ २०४)

ब्रिटीश व्यापा-यांना स्पर्धेत जोरदार टक्कर देऊ शकणारे असल्यानेच भारतीय व्यापा-यांना व्यापाराचे परवाने देण्यात येत नाहीत, हे गांधीजींना हा अर्ज आणि अन्य सादरीकरणाद्वारे सिद्ध करायचे होते. त्यांनी दुसरा युक्तिवाद असा केला की, भारतीय व्यापारी आणि व्यावसायिक हे स्वच्छतेच्या उत्तम सवयींचे पालन करतात. भारतीय लोक शारिरीक स्वच्छता उत्तम राखत असून गलिच्छपणा अथवा निष्काळजी सवयींमुळे होणा-या आजारांपासून मुक्त आहेत, या नगरपालिकेचे डॉक्टर व्हील यांच्या निरीक्षणाचा हवालाही ते देतात. (सीडब्ल्यूएमजी, खंड १, १९६९ आवृत्ती, पृष्ठ २१५) आणि भारतीय व्यापा-यांना व्यापाराचे परवाने का नाकारण्यात येत आहेत, याबद्दल असा युक्तिवाद करण्यात आला की, याचे कारण व्यापारी असूया आहे. भारतीय व्यापा-यांना काटकसरीची सवय आणि त्यांचा स्वभाव मवाळ असल्यामुळे ते आयुष्यातील गरजा आटोक्यात ठेवून गौरवर्णीय व्यापा-यांशी स्पर्धा करू शकतात.

भारतीय लोकांमध्ये स्वच्छतेच्या चांगल्या सवयींचा अभाव आहे, याची जाणीवही गांधीजींना होती. आणि तेथे १९१४ पर्यंत म्हणजे वीस वर्षे त्यांनी यासंदर्भात सर्वशक्तिनिशी प्रचार केला. कोणत्याही वस्तीत अस्वच्छता फैलावण्याचे मुख्य कारण क्षमतेपेक्षा जास्त लोकांची झालेली गर्दी हेच असते, हे गांधीजींना समजले होते. दक्षिण आफ्रिकेतील शहरांमधील काही विशिष्ट वस्त्यांमध्ये राहणाऱ्या भारतीय समुदायांना पुरेशी जागा आणि पायाभूत सुविधा पुरवण्यात आल्या नव्हत्या. स्वच्छ वातावरणात राहण्यासाठी आवश्यक जागा आणि पायाभूत सुविधा पुरवण्याची जबाबदारी नगरपालिकेची आहे, असा गांधीजींचा विश्वास होता. जोहान्सबर्गमधील आरोग्यासंदर्भात वैद्यकीय अधिकारी डॉ. सी. पॉटर यांना लिहीलेल्या पत्रात गांधीजींनी म्हटले,

''भारतीय वस्त्यांमधील धक्कादायक परिस्थितीसंदर्भात मी तुम्हाला लिहीण्याचे धाडस करत आहे. खोल्यांमध्ये झालेली क्षमतेपेक्षा जास्त गर्दी वर्णनापलिकडची आहे. शौचालयांची सेवा अत्यंत अनियमित आहे आणि वस्त्यांमध्ये राहणाऱ्या अनेक रहिवाशांनी माझ्या कार्यालयात येऊन स्वच्छतेची अवस्था अत्यंत खराब असल्याची तक्रार केली आहे.'' (सीडब्ल्यूएमजी, खंड ४, पृष्ठ १२९)

आपल्या आत्मचरित्रात गांधीजींनी नमूद केले आहे की, नगरपालिकांचे गुन्हेगारी प्रकरणाकडे दुर्लक्ष आणि भारतीय स्थायिक समुदायाचे त्यांनी जणू कट रचून हा भाग अस्वच्छ म्हणून प्रस्तुत केला आहे. (An Autobiographyop.cit. p २६५). एकदा तेथे काळ्या प्लेगची साथ पसरली. सुदैवाने या साथीसाठी भारतीय वस्ती जबाबदार नव्हती. जोहान्सबर्गच्या जवळ असलेली एक सोन्याची खाण जबाबदार होती. गांधीजींनी स्वत:चा जीव धोक्यात घालून सर्वशक्तीनिशी रुग्णांची सेवा केली. नगरपालिकेचे डॉक्टर आणि अधिका-यांनी गांधीजींच्या सेवेची मुक्तकंठाने प्रशंसा केली. भारतीयांनी यापासून धडा शिकावा, अशी गांधीजींची इच्छा होती. त्यांनी लिहीले,

''असे नियम कडक आहेत यात शंकाच नसली तरीही त्यांनी आपण

संतापून जाता कामा नये. आपण आपले आचरण इतके व्यवस्थित ठेवावे की त्यांची पुनरावृत्ती आपण टाळू शकू. आपल्यातील अगदी नीच व्यक्तीलाही स्वच्छता आणि आरोग्याच्या मूल्याची जाणीव असली पाहिजे. अनावश्यक गर्दी करण्याची सवय आपण काढून टाकली पाहिजे... स्वच्छता हेच एक पारितोषिक नव्हे का? आमच्या देशांच्या लोकांनी नुकतेच ते ज्या खटल्याला सामोरे गेले, त्यातून हाच धडा शिकायला हवा.'' (सीडब्ल्यूएमजी, खंड ४, पृष्ठ १४६)

तरीसुद्धा, बापूजींनी भारतीयांना दक्षिण आफ्रिका आणि भारतात स्वच्छतेविषयक जो पहिला उपदेश केला, त्याला शंभर वर्षांनंतरही आपण समुदाय म्हणून प्रतिसाद देऊ शकलेलो नाहीत. स्वच्छता आणि आरोग्याची दूरावस्था यामुळे होणारे मलेरिया, चिकुनगुनिया, डेंग्यु यांसारख्या रोगांची साथ देशाच्या राजधानीसह सर्व शहरांत पसरली आहे. अहमदाबाद येथील सरकारी रुग्णालयात डेंग्युमुळे डॉक्टर आणि परिचारिकांच्या मृत्युंच्या कारणांची चौकशी करण्यासाठी गुजरात उच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीचे लेखक सदस्य होते. स्वच्छतेच्या प्रथांबाबत समितीने सुचवलेल्या सुधारणांचा अहवाल सादर करूनही दोन वर्षे उलटली आहेत. त्या सुचनांची प्रभावी अंमलबजावणी करणे सरकारी रुग्णालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालवलेल्या रुग्णालयांनाही शक्य झालेले नाही. रोग आणि मृत्यू सुरूच आहेत.

**भारतातील स्वच्छते संबंधित गांधीजींचा पूर्वसंकेत** (Tryst):

१४ फेब्रुवारी, १९१६ रोजी मद्रास (आता चेन्नई) येथील मिशनरी परिषदेत गांधीजींनी स्वदेशीवरील भाषणात गावांमधील स्वच्छताविषयक सोयींबाबत प्रथम जाहीर उल्लेख केला होता. ते म्हणाले होते की, सर्व विद्याशाखांमध्ये स्थानिक भाषांमधून सूचना केल्या गेल्या असत्या तर मी असे धिटाईने म्हणेन की, आज गावांमधील लोक स्वच्छतेबाबत जागरूक झाले असते व फार पूर्वीच गावांमधील स्वच्छतेचा प्रश्न सुटला असता. (सीडब्ल्यूएमजी, खंड १३, पृष्ठ २२२)

शालेय व उच्च माध्यमिक अभ्यासक्रमांमध्ये स्वच्छतेच्या धड्यांचा समावेश करण्याच्या आवश्यकतेबद्दल गांधीजींनी तत्परतेने लक्ष वेधले होते. २० मार्च, १९१६ रोजी गुरूकुल कांगडी येथे वर्धापनदिन समारंभात बोलताना ते म्हणाले, ''आरोग्य व स्वच्छतेच्या कायद्यांची माहिती आणि मुलांच्या संगोपनाची कला गुरूकुलमधील विद्यार्थ्यांच्या शिकण्याचा आवश्यक भाग बनली पाहिजे. ...या अनिवार्य स्वच्छता निरीक्षकांनी सातत्याने आम्हाला धोक्याचा इशारा दिला आहे की, स्वच्छतेच्या मुद्यावर सर्व काही सुरळीत नाही. वार्षिक भेटीवर येणाऱ्या स्वच्छता निरीक्षकांनी स्वच्छतेविषयक वास्तविक धडे देण्याची सुवर्णसंधी आपण गमावल्याची खंत मला वाटते.'' (सीडब्ल्यूएमजी, खंड १३, पृष्ठ २६४)

नीळ उत्पादक शेतक-यांचे प्रश्न सोडवण्यासाठी गांधीजी चम्पारणमध्ये गेले होते. चौकशी पथकाचे सदस्य या नात्याने त्यांनी तयार केलेल्या गोपनीय टिप्पणीत स्वच्छतेविषयक स्थितीचा उल्लेखही ते करतात. तेथील समुदायांमध्ये शिक्षण आणि स्वच्छतेचे कार्य हाती घेण्यासाठी ब्रिटीश प्रशासनाने आपल्या कार्यकर्त्यांना स्वीकारावे, अशी गांधीजींची इच्छा होती. त्यांनी असे नमूद केले होते की, हे कार्यकर्ते गावात असतांना गावातील मुले आणि मुलांना शिकवतील आणि रयतेला प्राथमिक स्वच्छतेचे धडे देतील. (सीडब्ल्यूएमजी, खंड १३, पृष्ठ २६४, ३९३).

**१९२० मध्ये गांधीजींनी गुजरात विद्यापीठाची स्थापना केली. तेथे आश्रमाच्या जीवनातील धर्तीवर कार्य चालत असल्याने शिक्षक, विद्यार्थी, इतर स्वयंसेवक व कार्यकर्ते प्रवेश घेतल्यापासूनच स्वच्छतेच्या कामात गुंतलेले असत. राहण्याची निवासस्थाने, रस्ते, कामाचे ठिकाण आणि कॅम्पस स्वच्छ करणे हा नित्याचा दिनक्रम असे. डोक्यावरून मैला वाहून नेणे आणि शौचालये साफ करणे हा ही नित्याच्या कामाचा भाग असे. नुकतेच प्रवेश घेतलेल्यांना गांधीजी अगदी तज्ञाप्रमाणे धडा शिकवू शकत असत आणि शिकवत.** आजही विद्यापीठांमध्ये काही प्रमाणात ही प्रथा टिकून आहे आणि त्याचा चांगला परिणामही दिसला आहे.

रेल्वेच्या तिस-या वर्गातून गांधीजींनी देशभर भरपूर प्रवास केला. भारतीय रेल्वेच्या तिस-या वर्गातील अस्वच्छता पाहून ते अत्यंत व्यथित झाले. वृत्तपत्रांना पत्र पाठवून त्यांनी तत्परतेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २५ सप्टेंबर,१९१७ या तारखेच्या या पत्रात त्यांनी लिहीले आहे की,

संपूर्ण प्रवासी वाहतुकीत सोयी सुविधांच्या अभावांमुळे अडथळा येणे समजू शकतो, पण आरोग्य आणि नैतिकता यांना पायदळी तुडवणा-यांना अस्वच्छतेची स्थिती कायम राहणे अगर त्याचे महत्व कधीच समजणार नाही. ...रेल्वेच्या तिस-या वर्गातील प्रवाशाला निश्चितच किमान प्राथमिक अत्यावश्यक गरजा पुरवल्याच पाहिजेत. **रेल्वेच्या तिस-या वर्गातील प्रवाशांकडे दुर्लक्ष करून लाखो लोकांना व्यवस्थितपणा, स्वच्छता, उत्तम सहजीवन आणि साध्या व स्वच्छ सवयींची जोपासना यांबाबत चांगले शिक्षण देण्याची सुवर्णसंधी आपण गमावत आहोत असेही गांधीजींनी नमूद केले होते.** (सीडब्ल्यूएमजी, खंड १३, पृष्ठ २६४, ५५०).

धार्मिक स्थळांवरील अस्वच्छतेच्या स्थितीकडेही गांधीजींनी लक्ष वळवले आहे. ३ नोव्हेंबर, १९१७ रोजी गुजरात राजकीय परिषदेत ते म्हणाले, '' येथून अगदी फार दूर नसलेल्या पवित्र स्थळ ''डाकोर'' मध्ये पहा. मी तेथे जाऊन आलो आहे. तेथील अपवित्रता ही अमर्याद आहे. मी स्वत:ला वैष्णव भक्त समजतो. त्यामुळे डाकोरजीच्या स्थितीवर टीका करण्याचा विशेषाधिकार मला आहे. तेथील अस्वच्छतेची स्थिती इतकी भीषण आहे की, आरोग्यदायी परिसरात राहण्याची सवय असलेला एखादा तेथे चोवीस तासही काढू शकणार नाही. (सीडब्ल्यूएमजी, खंड १४, पृष्ठ ५७).

त्याचप्रमाणे, यंग इंडियाच्या ३ फेब्रुवारी १९२७ रोजीच्या अंकात गांधीजींनी दुसरे पवित्र स्थळ बिहारमधील गया येथील अस्वच्छतेच्या स्थितीवर लिहीले असून गयामधील सर्वत्र पसरलेल्या गलिच्छ व दुर्गंधीयुक्त शौचालयांविरोधात आपला हिंदू आत्मा बंड करून उठला.

**भारतीय रेल्वेत आजही हीच अस्वच्छतेची स्थिती असल्याचे दिसते. कंपार्टमेंट्स स्वच्छ करण्यासाठी व शौचालयांच्या सफाईसाठी कामगारांना मजुरीवर घेतले जाते पण आम्हां भारतीय प्रवाशांमध्ये स्वच्छता आणि आरोग्य याविषयी लज्जा आणि जाणीवेचाच अभाव आहे. रेल्वेच्या शौचालयांचा दुरूपयोग ठायीठायी दिसतो.** अगदी वातानुकूलित रेल्वे बोगींमधून प्रवास करणारे उच्चशिक्षित प्रवासीही आपल्या लहान मुलांना शौचालयाच्या भांड्याऐवजी बाहेर शौच करण्यास परवानगी देतात. **रेल्वेत कचरा करणे ही तर भारतात अगदीच सामान्य आढळणारी गोष्ट आहे.**

२०१३ मध्ये मी डाकोरला भेट दिली आणि गेल्या दहा वर्षांत अनेक पवित्र तीर्थस्थळांना भेटी दिल्या. स्वच्छता आणि आरोग्याची जाणीव असलेला कुणीही गांधीजींनी डाकोरबद्दल १९१७ मध्ये जे म्हटले त्याचा शब्दश: पुनरूच्चार करेल.

**स्वच्छतेकडे लोकांचे लक्ष वळवतांना गांधीजी :**

२९ डिसेंबर, १९१९ रोजी अमृतसर काँग्रेसमध्ये भाषण करताना गांधीजींनी सी.एफ.अँड्र्यूज यांचा हवाला दिला. त्यांच्या मतानुसार, भारतीयांचा भौतिकदृष्ट्या मोठा प्रभाव नाही, यामागे त्यांची स्वच्छता व आरोग्य याबाबत असलेली असाध्य किळस हेच कारण आहे.

काँग्रेसच्या प्रत्येक प्रमुख अधिवेशनात गांधीजींनी आपल्या भाषणात स्वच्छतेच्या मुद्याला स्पर्श केला. एप्रिल १९२४ मध्ये त्यांनी दोहाड (आता दाहोड) शहरातील स्वच्छतेच्या उत्तम सोयींबद्दल काँग्रेस सदस्यांचे अभिनंदन केले आणि अस्पृश्य जातीच्या वस्त्यांमध्येही भेट देऊन त्यांच्यातही उत्तम स्वच्छतेच्या सवयींचा प्रचार करण्यास सुचवले. १९२५ मध्ये कानपूर काँग्रेस अधिवेशनातही त्यांनी स्वच्छतेच्या उत्कृष्ट व्यवस्थेसाठी मुक्तकंठाने प्रशंसा केली.

**शहरे आणि नगरांमध्ये स्वच्छता राखणे हे पालिकांचे सर्वात महत्वाचे काम आहे, असे गांधीजी मानत. काँग्रेस कार्यकर्त्यांनी नगरसेवक बनल्यावर उत्तम स्वच्छतेचे सेवक व्हावे, असा सल्ला ते देत. त्यांच्यासाठी अस्वच्छता हे पाप होते.**

२५ ऑगस्ट, १९२५ रोजी कलकत्त्यात (आता कोलकता) केलेल्या भाषणात त्यांनी म्हटले,

''गावांमध्ये महात्मा संत म्हणून त्याने जाऊ नये. त्याने हातात झाडू घेऊन नम्रतेने जायला हवे. कार्यकर्त्यांना अस्वच्छता, गरीबी आणि आळस या त्रिमूर्तीला सामोरे जावे लागेल आणि त्यांचा मुकाबला हातात झाडू, कोयनेल आणि एरंडेल तेल घेऊन करावा लागेल.'' (सीडब्ल्यूएमजी, खंड २८, पृष्ठ १०९).

यंग इंडियाच्या १९ नोव्हेंबर, १९२५ रोजीच्या अंकात भारतातील स्वच्छतेविषयक स्थितीचा सारांश काढला आहे. त्यांनी लिहीले आहे की, ''माझ्या या भटकंतीत देशभरात पसरलेल्या अस्वच्छतेचे भीषण स्वरूप पाहण्यासारखी वेदनादायी दुसरी गोष्ट नाही. अस्वच्छतेच्या सर्वात महत्वाच्या मुद्याशी जुळवून

घेतांना मला प्रचंड मन:स्ताप झाला. (सीडब्ल्यूएमजी, खंड २८, पृष्ठ ४६१).

आम्ही आता हे सोडून दिले आहे, हे दुखदायक आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये आमच्याकडे सफाई कामगार आहेत. हक्कांबद्दल अतिजागरूक असलेल्या कार्यकर्त्यांना वाटते की, गरीब घरातील मुलांना स्वच्छतेचे प्रत्यक्ष धडे देणे ही बालमजुरी आहे. अजूनही खूप उशीर झालेला नाही. जेथे प्रत्यक्ष कामातून शिक्षण दिले जाते, तेथे नवी तालीम पुन्हा लागू केली पाहिजे.''

**गांधीजी, स्वच्छता आणि भंगी:**

**गांधीजींना अस्पृश्यतेची घृणा होती.** लहान वयात मोहनला आपल्या आईबद्दल अत्यंत आदर आणि प्रेम होते पण जेव्हा ती त्याला सफाई कामगाराला स्पर्श करू देत नसे तेव्हा कोवळ्या वयातही मोहन तिला विरोध करत असे. **स्वच्छता आणि आरोग्य हा प्रत्येकाने हाती घ्यायचा प्रश्न आहे, असे त्यांना ठामपणे वाटत असे. एका वर्गाच्या नशिबी सामाजिक जात म्हणून आलेली डोक्यावरून मैला वाहून नेणे व सफाई करण्याची प्रथा नष्ट करण्याची त्यांची इच्छा होती.** त्यांना मुख्य गाव अथवा वस्तीपासूनही दूर रहावे लागत असे आणि त्यांच्या वस्त्या तर अस्वच्छतेने भरलेल्या असत. उपेक्षा, गरीबी आणि शिक्षणाच्या अभावामुळे त्यांचे जगणे अगदीच खालच्या स्तरावरील असे. गांधीजी तेथे गेले आणि त्यांनी या लोकांना जवळ केले व तसेच सर्व कार्यकर्ते आणि नेत्यांनाही तसेच करण्याचे आवाहन केले. त्या लोकांनी सुधारून मुख्य प्रवाहात सामील व्हावे, ही गांधीजींची इच्छा होती. देशभरातील विद्यार्थ्यांसह सर्वांनी सहाय्य करण्याची कळकळीची विनंती त्यांनी केली.

भारतीय समाजात डोक्यावरून मैला वाहून नेण्याचे अत्यंत अमानवी कृत्य करणा-यांबद्दल गांधीजींनी भेदक भाष्य केले आहे. ते नमूद करतात, ''हरिजनांमध्ये गरीब भंगी हा समाजातील सर्वात महत्वाचा आणि अपरिहार्य घटक आहे, जितकी आई मुलासाठी अपरिहार्य असते तितकाच, तरीही तो सर्वात खालच्या पायरीवर आहे. आई मुलाची स्वच्छता करते तसाच तो समाजाच्या स्वच्छतेचे कार्य करतो. जर उच्च जातीच्या लोकांना स्वत:चा मैला स्वत:च वाहून नेणे भाग पडले असते तर भंग्यांना आपले काम करण्यासाठी ज्या काही प्रथा पाळाव्या लागतात, त्यांचे फार पूर्वीच उच्चाटन झाले असते.'' (सीडब्ल्यूएमजी, ५४, पृष्ठ १०९).

**स्वच्छता: विद्यमान स्थिती:**

**दुर्दैवाने, डोक्यावरून मैला वाहून नेण्याची प्रथा नष्ट करण्यासाठी गांधीजींनी आवाहन आणि कार्य करूनही आज ७५ वर्षांनंतर ती अस्तित्वात आहेच.** १९९३ च्या कायद्यान्वये एकाही प्रकरणात शिक्षा झाली नाही म्हणून मैला वाहून नेण्याची मानवी प्रथा नष्ट करण्यासाठी २०१३ मध्ये नवा कायदा आला. त्याच्या अंमलबजावणीसाठी राज्यांनी अद्याप नियम तयार केले नाहीत. गुजरात सरकारने तर त्यां कायद्याच्या अस्तित्वालाच नकार दिला आहे.

सहस्त्रकातील विकास उद्दिष्टांचे रुपांतर शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये झाल्यावरही भारतात सुरक्षित शौचालय व्यवस्थेचे चित्र निराशाजनक आहे. पॅ पॅसिफिक इन्स्टिट्यूटच्या वर्ल्डस वॉटर या संस्थेकडील भारतातील सुरक्षित स्वच्छतेच्या सोयी असणा-या लोकांच्या टक्केवारीनुसार, १९७० मध्ये फक्त १९ टक्के कुटुंबांकडे सुरक्षित स्वच्छतेच्या सोयी होत्या. (८५ टक्के नागरी व ५ टक्के ग्रामीण) २००८ मध्ये सर्वांसाठी ३० टक्के, ५२ टक्के नागरी व २० टक्के ग्रामीण अशी स्थिती होती. नागरी भागात पायाभूत सुविधा पुरवण्याचे प्रमाण तीव्रतेने घटल्याचा अर्थ असा आहे की, तेथे विस्थापित झालेल्यांना या सोयींचा लाभ मिळत नाही. युनिसेफ आणि जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार, भारतात २०१२ मध्ये, ६२ कोटी ६० लाख लोक म्हणजेच ५० टक्के लोकसंख्येने उघड्यावर नैसर्गिक विधी उरकले आहेत.

स्वच्छता ही फक्त शौचालयांपुरती नाही. २०१२ पर्यंत संपूर्ण ग्रामीण भागात स्वच्छतागृहे बांधली जातील, असे भारताने आश्वासन दिले होते, पण त्यापासून फार दूर आहोत. १९८१ मध्ये, भारतातील फक्त एक टक्का ग्रामीण भाग हा संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत आणला गेला होता. १९९१ मध्ये, त्यात ११ टक्क्यांपर्यंत वाढ झाली. २००१ मध्ये, हे प्रमाण २२ टक्के इतके होते आणि २०११ मध्ये ५० टक्क्यांपर्यंत वाढल्याचा दावा करण्यात आला. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रमामध्ये प्रत्येक कुटुंबात शौचालय बांधणे, ग्रामीण शाळांचा त्यात समावेश करणे आणि घनकचरा व्यवस्थापन यांचा समावेश

होता. मात्र संपूर्ण भाग त्यात आणणे ही फार दूरवरची गोष्ट आहे.

स्वच्छता आणि आरोग्याचा स्वीकार व विस्तारात काही सांस्कृतिक गोष्टींचाही अडसर आहे. या संदर्भात दोन विशिष्ट बाबींचा निर्देश करावा लागेल. उत्तम आरोग्य व स्वच्छतेपेक्षा पावित्र्य महत्वाचे आहे, ही समजूत हा पहिला मुद्दा. पूर्वी नमूद केल्याप्रमाणे, भारतातील तीर्थस्थळांवर याचा पुरावाच दिसतो. मंदिरे आणि मंदिरांच्या शहरांमध्ये स्वच्छता व आरोग्याचा संपूर्ण अभाव पाहता येतो. बहुतेक धार्मिक स्थळांवर कुठेही कचरा टाकणे, उघड्यावर शौच करणे, प्रदूषण व दूषित पिण्याचे पाणी या अगदी सार्वत्रिक गोष्टी आहेत. ग्रामीण भागात व लहान शहरांत जातीविषयक समजुती आजही प्रचलित आहेत. शहरांमध्ये त्या अत्यंत सूक्ष्म आहेत. प्रदूषणाच्या कल्पनेचा सातत्याने सामाजिक स्वीकार केला गेल्याने सफाई, आरोग्य व स्वच्छतेविषयक सोयींकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.

दुसरा मुद्दा हा की, बॅक्टेरिया व विषाणू यांसारख्या जिवाणूंच्या अस्तित्वाची जाणीवच नाही. बहुतेक लोकांमध्ये, ज्यांनी शालेय शिक्षण घेतले आहे आणि प्राथमिक विज्ञान शिकले आहे, त्यांनाही सूक्ष्म जिवाणूंमुळे होणारे दूषित पाणी व प्रदूषणाची जाणीव नाही. **अगदी उच्चशिक्षित शहरी समुदायांमध्येही पिण्याचे पाणी हाताळण्याची पद्धती सदोष व घातक आहे.** शहरी भागांमध्ये तोटीवर आधारित आरओ आणि जल शुद्धीकरण यंत्रणा येण्याच्या अगोदर, ज्यांना ती यंत्रणा परवडत होती त्या लोकांकडेही पाण्यासाठी माठ असायचा, ज्यात पाणी दूषित न करता पाझरण्याची व्यवस्था असे. आज त्याची अनुपस्थिती ठळकपणे जाणवत असून ज्यांच्याकडे आहे ती भिंतीवर लटकलेली शोभेची वस्तु म्हणूनच राहिली आहे.

भारतातील स्वच्छतेचे चित्र अत्यंत निराशाजनक आहे. गांधीजींचा पुन्हा आम्ही पराभव केला आहे. **गांधीजींना समाजशास्त्र समजत होते आणि त्यांनी स्वच्छतेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न करून ज्यांना सफाई करण्याचा शाप मिळाला होता, अशा स्वच्छता करणा-यांना प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यानंतर आम्ही मोहीमांचे रुपांतर योजनांमध्ये केले. योजना नंतर फक्त उद्दिष्ट, रचना आणि संख्या यापुरत्याच उरल्या. आम्ही तंत्रावर भर दिला - भौतिक पायाभूत सुविधा विकसित करणे आणि तत्वाकडे दुर्लक्ष केले - लोकांमध्ये मूल्य रुजवता आले नाही. स्वच्छतेच्या पायाभूत सुविधा आपल्याला हव्यातच, पण प्राथमिक स्वच्छता मूल्यांची म्हणजे आरोग्य तत्वाची गरजही आहेच. शिक्षणातून ते रुजवता येईल.** गांधीजींनी स्वच्छतेविषयक शिक्षणावर जोर दिला. भारतीयांना सर्वाधिक आवश्यकता शौचालय प्रशिक्षण आणि स्वच्छता व आरोग्य शिक्षणाची आहे. गांधीजीं दीपस्तंभासारखे मार्ग दाखवताहेत.

**संदर्भ:**


१. गुजरात विद्यापीठाचे उपकुलगुरू

२. कथा सांगण्याची भारतीयांची परंपरा असून विशेषत: पौराणिक गोष्टी मोठ्या संख्येने जमलेल्या लोकांसमोर सांगितल्या जातात. गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू यांनी कथेच्या या प्रकाराचा गांधीजींचे जीवन लोकांसमोर नेण्यासाठी यशस्वीपणे उपयोग केला आहे.

३. या लेखातील सीडब्ल्यूएमजीचे सर्व संदर्भ मुळातल्या के.स्वामीनाथन आवृत्तीतून घेतले आहेत.

४. ज्यांना स्वारस्य असेल, त्यांनी विविध शहरे आणि गावांमधील काँग्रेस अधिवेशनातील गांधीजींची भाषणे वाचावीत. उदा. सीडब्ल्यूएमजी खंड २३, पृ.१५, पृ. ३२७, २५, ४०, ४४९, खंड २६, पृ. २४०, खंड २८, पृ. ४००, ४२४, ४६४, ४७१, खंड २९, पृ. ३२६.

५. १२ नोव्हेंबर, १९२६ रोजी गिरीराज किशोर आणि २७ नोव्हेंबर रोजी सी. नारायण राव यांना त्यांनी लिहीले.

६. <httpë//www.tbcindia.nic.in/dots.html>



*(**सुदर्शन अंय्यगार**- लेखक सध्या अहमदाबाद येथील गुजरात विद्यापीठाचे कुलगुरू आहेत. आपल्या कारकिर्दीच्या सुरूवातीपासूनच ते महात्मा गांधींच्या तत्वांचे पुरस्कर्ते आहेत. यांनी देश विदेशात गांधीजींच्या विचारसरणीचा प्रचार व प्रसार करतांना अनेक व्याख्याने दिली असून विविध लेखांतून व पुस्तकांतूनही त्यांनी गांधीजींची तत्वे मांडली आहेत. संपर्कासाठी **ईमेल** - sudarshan54@gmail.com, vc@gujaratvidyapeeth.org)*

# भारतातील अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या भूमिका

-

**बार्बरा हॅरीस - व्हाईट**



**अनौपचारिक अर्थव्यवस्थेचा आकार आणि महत्व या दृष्टीने भारत हा कदाचित जगातील एकमेव देश असावा. अर्थतज्ञांनी या संकल्पनेचा खरपूस समाचार घेतला असून 'अनौपचारिकते' चा संबंध राज्य किंवा त्याच्या कायद्यांद्वारे अनिवार्यपणे नियमन केल्या न जाणाऱ्या व नोंदणीकृत नसलेल्या उपक्रमांच्या महत्वाच्या वास्तविकतेशी आहे. जनतेला हे चांगल्या प्रकारे समजले आहे आणि त्यामुळे पुरेशी वैचारिक समज असून नियोजनकर्त्यांनी त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. धोरण आणि नियोजन यातील त्यांची भूमिका आणि त्याचे परिणाम याचा समावेश नुकत्याच झालेल्या संशोधनातून मिळालेल्या यथार्थ ज्ञानाच्या आधारे या निबंधातुन करण्यात आला आहे.**

भारतातील अनौपचारिक अर्थव्यवस्थेची भूमिका चार मुद्यांद्वारे बार्बरा हॅरीस यांनी पुढील प्रमाणे स्पष्ट केली आहे.

*१. भारताच्या अनौपचारिक अर्थव्यवस्थेची संरचना आणि संबंध*

अनौपचारिक अर्थव्यवस्था परिवर्तनशील नाही. १९७० च्या दशकात ही (पश्चिम व पूर्व आफ्रिकेतील परिस्थितीसाठी) संकल्पना विकसित करण्यात आली तेव्हा अपेक्षा अशी होती की, नोंदणीकृत नसलेले उपक्रम औद्योगिकीकरण (शेती क्षेत्राच्या समावेशासह), शहरीकरण आणि बँकींग यांच्या औपचारिक, राष्ट्र उभारणीच्या प्रक्रियेत अतिशय लवकर समाविष्ट होतील. 'विकासाच्या दशकां'च्या मार्गामुळे हे स्पष्ट झाले की, अनेक अर्थव्यवस्थांच्या संरचनेमध्ये अनौपचारिक अर्थव्यवस्था कायमस्वरूपी सहभागी झाली आहेत, केवळ औपचारिक नोंदणी झालेले उपक्रम पोट-कंत्राटदारीच्या माध्यमातून अनौपचारिक अर्थव्यवस्थेचे थेट शोषण करतात असे नाही तर त्यांनी निर्माण केलेली निकृष्ट उत्पादने आणि सेवांद्वारे त्यांची कमाई ही चालु असते. हल्ली अनौपचारिक (नोंदणी न केलेल्या) मजूर सर्वत्र उपलब्ध असल्याने त्यावर टिका होत असतानांही या संकल्पनेची व्याप्ती वाढली आहे. लाभार्थ्यांऐवजी लक्ष्य करण्यात आलेले लाभार्थीच वारंवार बळी का पडतात? याविषयी संशोधन करत असतानां धोरण ठरवण्याचे आणि अंमलबजावणीचे साधनच अनौपचारिक असल्याचे दिसून आले. निवडणूक निधीबाबत केलेल्या संशोधनातूनही असे दिसून आले की, अनौपचारिक अर्थव्यवस्था आणि काळ्या पैशाची अर्थव्यवस्था या भारताच्या प्रातिनिधीक राजकारणाचा अपरिहार्य आधार आहेत.

दुसरे, भारताची अनौपचारिक अर्थव्यवस्था ही इतर ब्रीक्स (BRICS) आणि युरोपीय महासंघ (EU) यांच्याप्रमाणे अर्थव्यवस्थेतील दुर्लक्षित, अल्प प्रमाण असलेला घटक नाही, तर त्याचे स्वरूप विशेषत्वाने व्यापक आहे: अंदाजाप्रमाणे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनात दोन-तृतीयांशापर्यंत भर घालत असलेली आणि त्यात कोणतीही घसरण होण्याची चिन्हे नसलेली उपजिवीकेची ९२.५% साधने नोंदणीकृत नाहीत. अंदाज बांधण्याच्या ज्या सांख्यिकी प्रक्रियेद्वारे ही आकडेवारी उपलब्ध झाली आहे, त्याच प्रक्रियेला, माहिती संकलनाचा केंद्रबिंदु आणि दर्जा यांच्यावरील आर्थिक दडपणांमुळे धोका निर्माण झाला असून अंदाज बांधणीच्या पर्यायी पद्धती, लहान स्वरूपाची सर्वेक्षणे आणि त्याची साधने यांच्या निष्कर्षांचे (कमी-जास्त प्रमाणात स्वैरपणे निवडलेले) प्रमाण वाढवल्याने ज्ञानाच्या तात्त्विक मांडणीत सातत्य राहात नाही. 'जाणून घेण्याचे' हे दोन वेगवेगळे मार्ग आहेत, श्रेणी आणि संकल्पना वापरून ते नेहमीच देशाच्या हिताशी अनुरूप ठरत नाहीत. परंतू, हे नाकारता येणार नाही

की, अनौपचारिक अर्थव्यवस्था केवळ व्यापक प्रमाणांवर कायमस्वरूपी टिकून तर राहतेच, ती विकासाला चालनाही देते आणि 'रोजगारनिर्मिती न करणाऱ्या विकास' प्रक्रियेची जागा सर्वांना रोजगार पुरवून भरून काढते. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील नियोजन पश्चात भारतीय स्पर्धात्मक लाभांचे मुळ ही अनौपचारिक अर्थव्यवस्था होते.

तिसरे, सर्व प्रकारचे दारिद्रय आणि आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) ज्याचा उल्लेख 'अयोग्य' कामे (म्हणजे, कामाच्या ठिकाणी परिणामकारक हक्क नसताना काम करणे, संघटीत होण्याचा हक्क किंवा सामाजिक सुरक्षा मिळवण्याचा हक्क), ती सर्व कामे अनौपचारिक अर्थव्यवस्थेत असताना देखील या अर्थव्यवस्थेत केवळ दारिद्राच कायमस्वरूपी नसते. बहुतेक भागात कामगार म्हणून नाही तर नागरिक म्हणून दारिद्रयावर मात करण्यासाठी कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांचे कल्याण साधण्यात आले आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेत संपत्तीची निर्मिती आणि संचय देखील करण्यात आला आहे. याशिवाय संपत्तीचा दारिद्रयाशी संबंध जोडणारे आणि दारिद्रयासाठी कारणीभूत ठरणारे व्यापक आर्थिक संबंध अनौपचारिक अर्थव्यवस्थेत अधिक स्पष्टपणे दिसून येतात.

चवथे, अनौपचारिक अर्थव्यवस्था ही 'असंघटित' आहे. सांख्यिकी आणि अधिकृत कागदपत्रांमध्ये जरी त्यावर असा शिक्का मारण्यात आला असला तरी अनौपचारिक अर्थव्यवस्था ही अव्यवस्थित आहे असे त्यात गृहित धरलेले नाही; आणि उत्पादनाच्या ठिकाणची परिस्थिती सुधारण्यासाठी करण्यात येणाऱ्या भविष्यातील प्रयत्नांसाठी ती प्रत्यक्षात कशी संघटित आहे याबाबत आश्चर्यकारक मौन बाळगण्यात आले आहे. अनौपचारिक बाजारपेठांवर शासनाचे नाही तर सामाजिक नियंत्रण आहे. हजारो चेंबर ऑफ कॉमर्स आणि लक्षावधी व्यावसायिक संघटना, उमेदवारी, रोजगारात समावेश आणि कामाच्या ठिकाणी प्रवेश याबाबत सामाजिक व्यापारी नियंत्रण लागू करतात; योग्य आणि कुशल असल्याचे अनौपचारिक प्रमाणपत्र देतात; करारांबाबतचे वाद निस्तरतात, किंमत निश्चितीवर प्रभाव टाकतात, मूलभूत बाजारपेठेवर (विशेषत: मजुरांच्या बाजारपेठेवर) अटी लादतात; सामायिक सुरक्षा, प्रतिनिधित्वाची व्यवस्था करतात आणि शासनाकडून धोका संभवतो अशा आपल्या कमतरतांचे समर्थन करतात, हक्क निर्माण करतात व शासकीय अधिकाऱ्यांना त्यात वाटेकरी बनवतात, त्यांच्याकडे मान्यता असलेल्या स्रोतांचे पुनर्वितरण घडवून आणतात, तंत्रज्ञान आणि मागणी याबाबतच्या नवीन माहितीचा प्रचार करतात. विकासाचा सिद्धांत मांडणारे ते मान्य करण्यास नकार देत असले तरी, व्यक्तिमत्त्वाचे तथाकथित कमकुवत पैलू – लिंग, वंश, धर्म, स्थान, भाषा आणि जात (व्यावसायिक संरचनांप्रमाणे जाती व्यवस्था असमानपणे विरून जात असली तरी अनेक स्थानिक संगमांची ऐतिहासिक मूळे जातींच्या संबंधांमध्ये आहेत.) भांडवलशाही अर्थव्यवस्थेशी अधिक सुसंगत असल्याचे सिद्ध झाले आहे. ते कमकुवत होऊ नयेत यासाठी प्रत्यक्षात पुन्हा कष्ट घेण्यात आले मात्र आर्थिक संधी, प्रवेश आणि कामकाज यांच्या कठोर नियंत्रकांनी, भांडवल आणि कामगार या दोन्हींच्या गतिशीलतेवर मर्यादा आणल्या पण त्याच वेळी संरचना सोप्या केल्या आणि आर्थिक विकासाला स्थैर्य मिळवून दिले.

पाचवे, लहान आर्थिक संस्था जरी फार मोठ्या संख्येने प्रचलित असल्या तरी अनौपचारिक अर्थव्यवस्था ही त्यांच्या पुरतीच मर्यादित नाही. सर्व संस्थांपैकी अंदाजे ९५ टक्के संस्थांमध्ये एकूण कर्मचाऱ्यांपैकी फार कमी कर्मचारी रोजंदारी कामगार असतात. ही सरासरी १९९० मधील सुमारे २.९ वरून २००५ मध्ये २.४ पर्यंत कमी झाली आहे. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे अतिशय लहान आकाराच्या संस्थांचे पेव फुटले. लहान आकार, सामाजिक सुरक्षेच्या बाबतीतील अपात्रता आणि अतिसंवेदनशीलता या आधारावर अशा संस्थांच्या मालकांना कामगार कायद्यानुसार कामगार मानण्यात येते. अशाप्रकारे शोषण करणाऱ्या मालकांना त्यांच्या कर्मचाऱ्यांना असलेल्या औपचारिक हक्कांसारख्या हक्कांसाठीच पात्र ठरविण्यात येते. या संस्था मालकांपैकी ९५ टक्के मालक बहुसंख्येने घाऊक आणि किरकोळ व्यापारात, स्वयंरोजगारीत 'उपयोगी वस्तूंचे लघु उत्पादक' (PCP) आहेत. भारताच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेत - औपचारिक आणि अनौपचारिक – PCP हे उपजीविकेचे सर्वाधिक समान स्वरूप आहे. एक म्हणजे, स्वरूपातील विविधता व स्वतंत्र, स्वायत्त आर्थिक घडामोडी आणि अवलंबून असलेले छुपे रोजंदारी कामगार यांच्यातील संबंध आणि दुसरे म्हणजे, संयुक्त भांडवल आणि मजूर यांच्यात स्वेच्छेने केलेली गुंतवणूक आणि उपजीविकेसाठी जबरदस्तीने करावे लागणारे वेदनादायक काम यामधील खोटी माहिती. या दोन एकसंध असलेल्या बाबींच्या जोडीला

लहान संस्थांच्या वितरणासाठी कोणतीही सांख्यिकी माहिती उपलब्ध नाही. बाजार अर्थव्यवस्थेच्या चक्रात कामगार व छोटया संस्थांना फार हुशारीने सामावून घेण्यात आले आहे ते क्वचितच भांडवल जमा करतात (म्हणजेच नफा कमावणे आणि उत्पादकतेचे प्रमाण वाढवण्यासाठी त्याची पुन्हा गुंतवणूक करणे). अनौपचारिक अर्थव्यवस्थेत पैसे जमा न करता कमी प्रमाणात मिळणारे अतिरिक्त उत्पन्न, कर्ज, विवाहात मिळालेले पैसे, वडिलोपार्जित धन इत्यादींचा वापर गुणाकार पद्धतीने विस्तार करण्यासाठी केला जातो. हाच, महामंडळांपेक्षा आधुनिक भारतीय भांडवलशाहीचा सर्वाधिक वैशिष्टपूर्ण गुण आहे.

अनौपचारिक अर्थव्यवस्था ही केवळ या लहानशा आर्थिक व्यवस्थांमध्येच दिसत नाही, अनौपचारिकता ही शासनासह मोठ्या व्यवस्थांमध्ये देखील अंगभूत आहे. कॉर्पोरेट क्षेत्रातील ४० ते ८० टक्के कामगारांची नोंदणी झाली नसल्याचा अंदाज आहे; त्यातील फारच थोडे संघटित आहेत (ही परिस्थिती वेगाने बदलत असली तरी) आणि खूप जण एकतर रोजगाराच्या हक्काबाबत अजिबात जागृत नाहीत किंवा जर त्यांनी त्याचा वापर केला तर मालक त्याचा बदला घेईल अशी भीती त्यांना वाटते. कोळसा क्षेत्राबाबत नुकत्याच केलेल्या संशोधनातून असे दिसून आले की, नोंदणीकृत आणि कायदेशीर घडामोडींबरोबर असलेले सहअस्तित्त्व म्हणजे केवळ 'कोळसा सायकलवाल्यां'ची बेकायदेशीर/अनौपचारिक फौज नाही तर खासगी क्षेत्र आणि खासगी सुरक्षा दलांमध्ये पराकोटीचे शोषण झालेले प्रचंड संख्येत असलेले दारावरचे पहारेकरी, दलाल आणि पोटकंत्राटदार यांच्यासह, या क्षेत्रातील सरकारी महामंडळांमधील पगारी कामगारांची व्यापक प्रमाणात अल्प कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात झालेली बदली हे देखील आहे - नियोजनाच्या कागदपत्रांकडे दुर्लक्ष करणाऱ्या औपचारिक शासन व्यवस्थेतच अदृश्य किंवा अनौपचारिक शासन अस्तित्त्वात असल्याचे हे एक चांगले उदाहरण आहे.

नव्याने उदयाला येणाऱ्या कॉर्पोरेट क्षेत्रासह प्रसिद्धी माध्यमांना आकर्षण असतानांही भारताची अर्थव्यवस्था अधिकांश अनौपचारिकच राहिली. ती तशीच राहिल का? आणि धोरण आणि नियोजन त्याला सरकारी नियंत्रणाच्या कक्षेत समाविष्ट करू शकेल का?

*२. धोरण आणि नियोजनासाठी काही निष्कर्ष आणि प्रश्न*

अनौपचारिक अर्थव्यवस्थेतील लहानसंस्थांसाठी भारत सरकारकडे आर्थिक प्रकल्प आहे का? मोठ्या प्रमाणातील दडपशाही आणि रोजगारनिर्मितीशिवाय झालेला विकास किंवा लघु उत्पादन हे असंघटित असल्याचे वास्तव आणि धोरण तयार करताना रंगवले जाणारे गुलाबी चित्र प्रत्यक्षात बघितल्यानंतर सरकारकडे तो नसल्याचा दावा काही जण करतात. सरकारकडून विस्थापनाची भरपाई मिळवणे आणि 'बेदखल होण्यातून पूंजी जमा करण्याची' सवय जडलेल्यांना देशोधडीला लावणे याच्या उलट 'भांडवलशाही-विरहीत', 'गरजांची अर्थव्यवस्था' म्हणून जे अनौपचारिक अर्थव्यवस्थेकडे बघतात ते सरकारकडे प्रकल्प असण्याची शक्यता वर्तवतात. हरितक्रांतीचे आणि शेतीच्या बाबतीत लोकहिताचे, संरक्षित उद्योगांचे आणि समावेशक विकासाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात विकासाचे प्रकल्प असल्याचा दावा करत असले तरी ते नेहमीच यशस्वी ठरत नाहीत. चवथी भूमिका अशी आहे की, अभिप्रेत नसलेल्या निष्कर्षाच्या नियमांमुळे देखील तगून राहिलेल्या लघु उत्पादकांना, संरक्षण देणारे, प्रोत्साहन देणारे आणि सहिष्णुता दाखवणारे असे भारत सरकारचे असुसंगत प्रकल्प एकाचवेळी सुरू आहेत. उदाहरणार्थ, अनौपचारिक अर्थव्यवस्था (IE) आणि उपयोगी वस्तूंचे लघु उत्पादक PCP, शहारांच्या सौंदर्यीकरणाच्या योजनेत निर्वासित झाले; सामाजिक बदलाच्या माध्यमातून सुरक्षित राहिले; सूक्ष्म पतपुरवठ्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळाले; आणि महानगरातील बाजारपेठेत त्यांना सहिष्णुता अनुभवायला मिळाली. जाणीवपूर्वक तसे नियोजन केल्याचे संकेत सरकारी धोरणातील असुसंगतपणात जरी दिसत नसले तरी आता तो दूर करणे अतिशय अवघड आहे - एकतर अनौपचारिक अर्थव्यवस्था संपुष्टात आणावी लागेल किंवा त्यामधील संचय करण्याला पाठिंबा द्यावा लागेल.

दुसरे म्हणजे, २१व्या शतकात धोरण मान्यता आणि सरकारी नियमन यांचा अनौपचारिक अर्थव्यवस्थेत विस्तार केला जात आहे - कृषि उत्पन्न बाजार (नियमन) कायद्यांद्वारे शेतकरी आणि व्यापारी यांच्यातील व्यवहारांना मिळत असलेली वाढती मान्यता लक्षात घ्या, विडंबना अशी की, एकावेळेला कॉर्पोरेट किंमत शृंखलांच्या गरजा लक्षात घेता ही नियमने अप्रासंगिक आहेत अशी टिका करण्यात आली होती. निवड संस्था कामगार आणि पर्यावरण विषयक कायदे ती उघडपणे पायदळी तुडवेल, अनियमितपणे व

अनिच्छेने व्यावसायिक व महापालिका कर भरेल, सरकारकडून शिक्षा माफ करून घेऊन, पुरवठादार, वाहतूकदार आणि संरक्षण दलांना सर्व प्रकारचे अनौपचारिक कर आणि 'शुल्क' देऊन बेकायदेशीर कच्चा माल (कोळशासारखा) वापरेल.

तिसरे म्हणजे, धोरण निवडीची ही पद्धत सार्वत्रिक आहे. सरकारी लाभासह भारतातील सर्वोच्च भांडवलदार वर्ग त्याला शिस्त लावण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना विरोध करत असल्याचे फार पूर्वीपासून दिसत आहे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेवर अंकुश ठेवणारी, सरकारला समांतर असलेली व्यवस्था आणि औपचारिक शासन व्यवस्था या परस्परांशिवाय अस्तित्वात राहू शकत नाहीत. संमिश्र निकाल अर्थव्यवस्थेला चालना देतात मात्र सार्वजनिक क्षेत्रातील कायदेशीरपणा ढासळतो.

कोणत्याही गोष्टीचे पालन न करण्याच्या सार्वत्रिक मानसिकतेतून निर्माण झालेला व्यापक संस्थात्मकतेचा अभाव असतांना देखील सार्वजनिक क्षेत्रात होत असलेला हा ऱ्हास सरकारच्या क्षमतेच्या अभावामुळे होत नाहीये. ते जेव्हा निर्णय घेईल तेव्हा भारतातील सरकार महत्त्वाकांक्षी नियमनात्मक, विकासात्मक आणि लोकशाहीवादी ध्येय गाठण्यास सक्षम आहे. नियमनात्मक पालनाची सक्ती न करण्याचा सरकारचा हेतू नाही मात्र अनुशासनात्मक कायद्यांची पायमल्ली करण्यास कमी भांडवलाला जाणीवपूर्वक परवानगी दिली जाते आणि त्यातून सरकारचा अधिकार कमकुवत होतो तसेच सरकार त्याच्या नियमनात्मक, पुनर्वितरणात्मक आणि विकासविषयक बहुतेक कार्यांमध्ये आपणहून तसेच करू इच्छिते हा त्यातून निघणारा निष्कर्ष टाळता येणार नाही.

चवथे म्हणजे, शासन व्यवस्थेतच धोरणाबाबतची प्रक्रिया फार व्यापक स्वरूपात अनौपचारिक झाली असल्याने त्याची निष्पत्ती हीच की, स्पष्ट हेतू डोळ्यासमोर ठेवून आखण्यात आलेली, धोरणे ध्येयापासून फार दूर गेलेली असतात. या बहुतेक विकृती जिथे निर्माण होतात त्या अंमलबजावणीच्या राजकारणाकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल धोरण जाहीर करणारे दीर्घकाळ स्वत:लाच दोषी ठरवतात. धोरण ठरवणारे या मुद्द्यासाठी खटल्याच्या अभ्यासातून मिळालेला केवळ एकच पुरावा कदाचित वैध असल्याचे स्वीकारत नसतील. बंगळुरूमध्ये झालेल्या जमिनीच्या गैरवापराच्या अशाच एका अभ्यासातून नियोजनबद्घ पद्धतीने कायद्याचे उल्लंघन करण्याच्या पातळीपर्यंत नियोजन आयोगाचे खच्चीकरण करण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्तिगत हितासाठी एकत्र आलेल्यांनी सत्ता कशी हस्तगत केली आहे हे दाखवणारी आणि स्वयंसेवी संस्थांसारख्या तटस्थांचा प्रतिकार रोखण्यासाठी 'स्थानिक भाषेतून प्रशासन चालवण्याची' कल्पना पुढे आली. दुसऱ्या एका अभ्यासात, केवळ अनौपचारिकतेची संकल्पनाच नाही तर नोकरशाहीच्या राजकारणात 'धोरणात्मक आणि सुनियोजित कारवाई'ची संकल्पना विकसित करून धोरणाची आखणी व अंमलबजावणी (आणि 'राजकीय इच्छाशक्तीचा अभावा'चे 'गुप्त कट रचण्यातून सुटके'चे विश्लेषण) यांच्यापेक्षा गरीबीविरोधी धोरण आणि लाभार्थींमधील विरोधाभासाचे मध्य प्रदेश व महाराष्ट्रातील बळी, यामुळे वरचढ ठरली. इतर अनेक हेतूंपैकी एक असलेले परंतू व्यक्तिगत आर्थिक हिताचे रक्षण येथे उघडे पडले (येथे तक्ता क्रमांक १ बघा); सरकारने कामात आकर्षित केलेल्या संबंधांशिवाय अन्य संबंध असतात. त्यामध्ये औपचारिक दिशादर्शन किंवा औपचारिक प्रतिबंधाचा अनुपस्थितीत औपचारिक निर्देश, अनौपचारिक कृती, व्यवस्थेत हलगर्जीपणा असताना सुरू केलेले वर्तन, काम सोपे किंवा शक्य करणारे वर्तन आणि शेवटी धोरणात्मक व सुनियोजित कारवायांचा औपचारिक कायदेशीरपणा याकडे दुर्लक्ष करणे (किंवा जाणीवपूर्वक कार्यक्षमता कमी ठेवणे) यासारख्या गोष्टी अंतर्भूत असतात.

तिसरे म्हणजे, हरियाणातील शेती आणि कापणीच्या हंगामानंतरची पुरवठा साखळी यासंदर्भातील खटल्याच्या अभ्यासात असे आढळून आले की, जमिनीच्या संबंधात अजूनही जातीचे नियंत्रण असून राज्याच्या जमिनविषयक कायद्यांकडे दुर्लक्ष केले जाते. नियंत्रित बाजार कायद्याची काही वेळेस अंमलबजावणी केली जाते मात्र कोणताही दंड न आकारता त्याकडे दुर्लक्ष करता येते; सामाजिक नियंत्रण कायदा दूर सारते.

शेतीमाल प्रक्रियेत एकाचवेळी अनेक कारणांसाठी परवाने देण्याकरिता, प्रदूषण नियंत्रणाचे नियम पायदळी तुडवण्याकरिता, दर्जाबाबतच्या मापदंडात कायदेशीर फसवणुकीकडे कानाडोळा करण्याकरिता नियमकांकडून 'अतिरिक्त सेवा शुल्क' (लाच) वसूल केले जाते. राज्यात बेकायदेशीरपणे खासगी बाजार आणि उपजीविकेची साधने निर्माण करून फसवेगिरीने मान्यता नसलेल्या अर्थव्यवस्थेला मदत केली जाते. वाहतुकीच्या क्षेत्रातील मध्यस्थ लाच

घेण्यासाठी 'एक खिडकी' व्यवस्था सुरू करण्याइतक्या टोकाला पोहोचले असून लाच देण्यासाठी आणि त्याचा हिशोब ठेवण्यासाठी 'प्रिपेड कार्ड्स' यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. बेकायदेशीरपणे क्षमतेपेक्षा जास्त वजनाच्या मालाची वाहतूक करण्यातून मिळणारा नफा मालक, बुकींग करणारे मध्यस्थ, कमिशन एजंट, अनौपचारिक पतपुरवठादार, अधिकारी, राजकारणी आणि स्थानिक जातीचे नेते आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक सत्ताकेंद्रांशी हातमिळवणी करून वाटून घेतात. त्यातच भर म्हणजे सत्तेतील हितसंबंधातून बेकायदेशीर बाजारपेठा निर्माण केल्या जातात आणि नंतर त्यातून व्यक्तिगत फायदा मिळवून दिला जातो.

सरकारच्या औपचारिक धोरणाच्या बाह्यसीमारेषा 'धूसर' असतात असे जेव्हा म्हटले जाते, तेव्हा प्रत्यक्षात तो राजकीय अवकाश असतो. अन्य क्षेत्रांमध्ये आणि प्रदेशांमध्ये याचे स्वरूप खूप वेगळे आहे का ? हे तपासण्याची गरज आहे प्रश्न असा की, अशा राजकारणाचे सामान्यपणे किती प्रमाण आहे की, नियोजन आणि धोरण तयार करणाऱ्यांनी त्याचा विचार केला पाहिजे. दोन्ही हातांनी हस्तगत करण्याच्या प्रक्रियेत पक्षात फूट पाडण्याच्या तंत्राचा वापर अनेकदा नियमनात्मक राजकारणात केला जातो - नियमनाचे स्वातंत्र्य सरकारने हस्तगत केले आहे आणि स्थानिक भांडवलादाराने सरकार काबीज केले आहे.

शहरी आणि प्रादेशिक नियोजनाच्या धोरणामध्ये धोरण तयार करणाऱ्यांना उद्देश आणि कृती या दोन्हींच्या गंभीर स्वरूपाच्या विकृतींचा सामना करावा लागल्याने दोन प्रकारचे प्रतिसाद मिळाले : 'लवचिक' नियमन आणि नेहमीपेक्षा जास्त सखोल तपशील. मात्र, नियमनात्मक आघाडीवर पर्यायी व्यवस्था लादण्यात अनौपचारिक अर्थव्यवस्थेतील कोणतीही पद्धत यशस्वी ठरली नाही.

धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या, अंमलबजावणीच्या अभावाच्या, सरकारला प्रवेश देण्याबाबत मध्यस्थता करण्याच्या, ताब्यात ठेवण्याच्या किंवा बंदी घालण्याच्या बाबतीतील हे सर्व 'बिघडलेले' संबंध आता खोलवर रूजले आहेत. भारतातील सरकारी उद्दीष्ट, संस्था, संघटना आणि सरकारची सर्व धोरणे निश्चित दिशेने नेणारी विविध स्तरावरील कार्यांमध्ये एकूणच अपरिपक्वता आहे. सरकारी नियोजनात धोरणे प्रभावीपणे राबविण्यासाठी विचार विनिमयासह परिणामकारक अंमलबजावणी आवश्यक आहे.

### ३. औपचारिकता

अनौपचारिक अर्थव्यवस्था औपचारिक करण्याचा प्रश्न नियमितपणे औपचारिक मालमत्तेच्या मालकीच्या आकर्षणाबाबत 'डी सोटो'च्या अपुऱ्या पुराव्यानिशी काढलेल्या अनुमानापर्यंत खालच्या पातळीवर पोहोचला आहे. मात्र, औपचारिकतेची प्रक्रिया हीच मूलत: अनौपचारिक आहे. या अर्थव्यवस्थेतच संयुक्त मालकी असलेल्या मालमत्तेबाबत अस्पष्टता असतांनाही ठराविक परवाने मिळाल्यावर आणि व्यापारी संघटनांनी कौशल्ये प्रमाणित केल्यानंतर 'मालमत्तेवर नाव लावले' जाते; बँकेतून कर्ज मिळवणे, कौशल्ये उपलब्ध करणे हे मनुष्यबळा अंतर्गत येते. सार्वजनिक क्षेत्रातील कामासाठी (मनरेगासह) इलेक्ट्रॉनिक पेमेंटच्या झालेल्या असमान विस्ताराबरोबर आधार च्या माध्यमातून नागरिकत्वाच्या निकषाद्वारे कामाचे संबंध पसंतीप्रमाणे औपचारिक केले जातात. नोंदणीकरणात सूक्ष्म पतपुरवठ्याचा देखील सहभाग आहे, परंतू स्वयंरोजगार मिळवून देण्यातील सूक्ष्म पतपुरवठ्याच्या यशावर जात आणि लिंग भेदामुळे गंभीर आघात झाला आहे. बँकेत (अनेक) खाती उघडण्यासाठी नोंदणीकृत तारण आवश्यक असते पण अनेक कर्जे ही त्यानंतर सामाजिक नियंत्रण असलेल्या विस्तृत पतरचनेमध्ये दिली जातील. NEFT ने बाजारपेठेचे भौगोलिक क्षेत्र विस्तारले आहे आणि विवेकावर आधारित पतपुरवठा बाजूला सारला आहे पण अजूनही मौखिक करारावर व्यवहार करण्यास जागा ठेवली आहे. लक्षावधी लहान कौटुंबिक व्यवसायांना बाजूला सारण्यासाठी देशभर नव्या प्रमाणातील भांडवल आपल्या शाखा आणि अधिकृत विक्री केंद्रांसह सज्ज आहे, त्याची नोंदणी केली जाईल. अनौपचारिक, औपचारिकीकरणाव्यतिरिक्त या उदाहरणांमध्ये असलेली समानता म्हणजे सरकार नाही तर बाजारपेठ देखील त्रुटी असलेल्या या प्रक्रियांना चालना देत आहे.

सरकारसाठी ही गंभीर स्वरूपाची तडजोड ठरली आहे. विशेषत: स्थानिक पातळीवर सरकारला दीर्घकाल हंगामी महसूलाच्या चणचणीला तोंड द्यावे लागत असल्याने मूलभूत पायाभूत सुविधांसाठीची तरतूद अपुरी पडत आहे. त्यामुळे आर्थिक बेशिस्तीला खतपाणी घातले जाते आणि त्यातून गैरमार्गाने कामे करण्यास आणि सार्वजनिक सेवांचे अनौपचारिक खासगीकरण होण्यास प्रोत्साहन दिले जाते. परिणामी सामाजिक भेदभाव केला जातो. भारतात असे काही प्रदेश आणि विभाग आहेत जिथे स्थानिक अर्थव्यवस्थेचे

केवळ अनौपचारिकीकरण नाही तर गुन्हेगारीकरण झाले आहे, जिथे केवळ नियमनात्मक कायदे मोठ्या प्रमाणावर पायदळी तुडवले जात नाहीत तर वरील वर्णन केलेल्या समांतर व्यवस्थांचा आधार म्हणून व्यवहारात उपयोग केला जातो, परंतू जिथे बेकायदेशीर त्याचबरोबर कायदेशीर वस्तूंचे देखील उत्पादन केले जाते तसेच व्यापार केला जातो आणि त्याला गुन्हेगारी संघटनांचे संरक्षण असते. राजकीय पक्षांना पैसा पुरवण्यासाठी आणि राजकीय सहभागाचे गुन्हेगारीकरण करता यावे यासाठी धोरणांच्या पुनर्रचनेची चर्चा करणे सोपे असते. निवडणुकीसाठी सरकारने निधी उपलब्ध करून देण्याला कितीही कडवा राजकीय विरोध असला तरी ही कर चुकवेगिरी आणि गुंतवणुकीतील धरसोड वृत्तीचा अर्थव्यवस्थेच्या महत्त्वाच्या क्षेत्रात पायंडा पडत आहे. सरकारची क्षमता प्रत्येक खटल्यानंतर सुधारण्यापेक्षा अन्य पर्यायांचा किंवा अनौपचारिक आणि काळ्या पैशाची अर्थव्यवस्था भरभराटीला येण्याऐवजी तिला तोंड देण्यासाठी अन्य काही विचार होतो का हे डोळ्यात तेल घालून बघावे लागेल.

आजवर मिळालेल्या ज्ञानाच्या विरूद्ध असे नव्या संशोधनातून दिसते की, अनौपचारिक अर्थव्यवस्था बदलांना आडकाठी करत नाही तर भारताच्या तुलनात्मक उच्च विकासदराचे ते चैतन्यपूर्ण प्रकटीकरण आणि अभिनव विचारांचा खुला मंच आहे : शोध, जुळवून घेणारा आणि शोध स्वीकारणारा; प्रगतीशील आणि मूलगामी शोध, तंत्रज्ञानात्मक, वेगळ्या स्वरुपाच्या घटनांपेक्षा प्रक्रियांचा अभ्यास अंतर्भूत असलेला आणि संघटनात्मक शोध इत्यादी.

आर्थिक नियोजनाची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली आहे त्यांनी हे फार मोठे आव्हान स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

तक्ता क्रमांक १. सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या (एउएभ) अंमलबजावणीतील औपचारिक आणि अनौपचारिक कार्यपद्धतींचे प्रकार, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील जिल्ह्यांमधील धोरण. (फर्नांडेझ, २००८/२०१२ मधून).

| **कार्यपद्धतींचे प्रकार** | राजकीय तंत्रज्ञान | राजकीय व्यूहरचना |
|---|---|---|
| कार्यपद्धतीतील औपचारिक बदल | • गरीबी रेषेखाली नसलेल्या सभासदांचे स्वयंसहायता गटांमध्ये 'समावेशन'<br>• कर्जे 'जाणीवपूर्वक न थकवलेले' थकबाकीदार आता पात्र<br>• गरीबी रेषेखालील ३०% नागरिकांना सामावून घेण्याचे वचन देण्याचा नियम काढून टाकणे<br>• शेवटच्या टप्प्यावर अनुदान देण्यास सुरवात<br>• स्वयंसहायता गटांच्या थेट खात्यात किंवा धनादेशाद्वारे रक्कम जमा करणे<br>• जनावरे किंवा अन्य मालमत्तांची खुल्या बाजारातून खरेदी | • नव्याने निवडून आलेल्या सरकारकडून गरीबीविरोधी नवीन किंवा सुधारित धोरणे लागू |
| औपचारिक कार्यपद्धतीकडे दुर्लक्ष | • गरीबी रेषेखालील ३०% नागरिकांना सामावून घेणार<br>• महत्त्वाचे उपक्रम व समूह<br>• जाणीवपूर्वक कर्जे न थकवलेल्या थकबाकीदारांची पात्रता<br>• ८०% | • स्वयंसहाता गटाच्या सभासदांची निवड ग्रामसभेत<br>• लोकलेखा समितीच्या अहवालातील शिफारसी टाळण्यात आल्या |
| औपचारिक कार्यपद्धती कमी कार्यक्षम | • राज्य सरकारकडून अर्थसंकल्पाचा अपुरा विनियोग | • जिल्हा नियोजन व दक्षता आणि देखरेख समित्या अपेक्षेप्रमाणे नियमित व प्रभावीपणे काम करत नाहीत |

| | | |
|---|---|---|
| | • राज्ये त्यांच्या वाट्याच्या २५% भाग पूर्णपणे देत नाहीत<br>• केंद्राकडून देण्यात येणाऱ्या निर्धारित रक्कमेत घट<br>• योजनांतर्गत स्त्रोतांमध्ये घट<br>• अपुरा अर्थपुरवठा<br>• कमी कर्ज उभारणी<br>• मंजुरी मिळण्यात विलंब<br>• आर्थिक वर्षाच्या अखेरीस कर्ज अर्जांची जुळवाजूळव<br>• सरकारशी करार केलेल्या स्वयंसहायता गटांना संबंधित सरकारी खात्यांकडून नियमितपणे पुरवठा किंवा आर्थिक मोबदला मिळत नाही | • लोकलेखा समितीच्या अहवालातील शिफारसींबाबत अकार्यक्षमता |
| औपचारिक दिशानिर्देश नसताना अनौपचारिक कार्यपद्धती | • स्वयंसहायता गटांसाठी जिल्हा प्रशासन<br>• जिल्हा प्रशासन-स्वयंसहायता गटातील सभासदांना दरमहा ३०-५० रुपये बचत करण्यात प्रोत्साहन देतात | • गरीबी रेषेखालील लोकांसाठी ब्लॉक कट ऑफ कार्यकारिणी ही जिल्हा स्तरापेक्षा राज्य स्तरावर निश्चित होणार<br>• स्वयंसेवी संस्थांच्या निवडीतील निकषांमध्ये पारदर्शकतेचा अभाव - DRDA च्या अधिकाऱ्यांच्या पसंतीनुसार निवडीची कार्यपध्दती आणि त्यामुळे NGO चा अनुभव किंवा विश्वासार्हता याआधारे निवडी केली जातेच असे नाही<br>• धारमधील ग्रामपंचायतींनी संभाव्य कर्जदारांची छाननी केली |
| व्यवस्थेतील हलगर्जीपणावर अनौपचारिक कार्यपद्धतीत मतभेद | • ध्येय निश्चिती सुरूच<br>• गडचिरोलीत मध्य-वार्षिक ध्येय सुधारणा | |
| अनौपचारिक कार्यपद्धती काम सोपे करते | • स्वयंसहायता गटांना बँकेत खाते उघडण्यासाठी EO प्रारंभिक ठेव ठेवतात | • धारमध्ये बँकेत खाते उघडण्यासाठी बँकेला आवश्यक असलेला ओळखीचा दाखला ग्रामपंचायत देते |

| | | |
|---|---|---|
| | • पुरूष व महीलांचे स्वयंसहायता गट स्थापन झाले असून एकाच कुटुंबबातील पती व पत्नी दोघेही सभासद आहेत<br>• दर्जाचे निकर्ष पूर्ण करण्यासाठी स्वयंसहायता गटांच्या रेकॉर्डमध्ये खाडाखोड केली जाते किंवा मागील तारीख टाकली जाते<br>• तात्पुरते प्रशिक्षण, सर्व स्वयंसहायता गटांना किंवा सर्व प्रकारचे प्रशिक्षण दिले जात नाही<br>• दर्जा निश्चितीची पात्रता, निकष लवचिक करण्यात आले आहे आणि परिणामी पात्रता नसलेल्या स्वयंसहायता गटांना उत्तीर्ण केले जाते - दर्जा निश्चितीच्या निकषांमध्ये निवडक स्वयंसहायता गट 'योग्य' ठरावेत म्हणून रेकॉर्डसमध्ये 'सुधारणा' केल्या जातात. | • राजकीय नेते एतउद्देशिय मुद्दे दीर्घकालीन नियोजनाच्या दृष्टिकोनाऐवजी प्रत्येक प्रकरणातील तक्रारींच्या आधारे हाताळतात<br>• स्वयंसहायता गटाच्या उपक्रमाच्या कारभारात पती/ पुरूष नातेवाईकांचा सहभाग<br>• स्थानिक उच्चभ्रू व्यक्तींकडून स्वयंसहायता गटाच्या स्त्रोतांवर कब्जा |
| | • दर्जा निश्चिती शिबिरे<br>• कर्ज वितरणासाठी स्वयंसहायता गटाच्या सर्व सभासदांनी उपस्थित राहण्याची मागणी बँकेकडून केली जाते<br>• धार आणि गडचिरोली या दोन्ही जिल्ह्यात महत्वाचे कार्यक्रम प्राधान्याने 'पारंपरिक' व 'घरगुती' उपक्रमांवर केंद्रीत असतात<br>• महत्वाच्या कामांसाठी वापरत असलेल्या प्रकल्प प्रस्तावांचे स्वरूप बनावट<br>• गडचिरोलीत मध्य-वार्षिक ध्येय सुधारणा | |
| औपचारिक कार्यपद्धतीत हितांचे रक्षण | • निधी अन्यत्र वळवणे (गुंतवणे इ.)<br>• संपूर्ण प्रकल्पाची रक्कम/अनुदान वितरित केली जात नाही - मोठ्या रकमेचे कर्ज असले तरी प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या कमाल ५०% पर्यंत रक्कम दिली जाते | • राज्य व जिल्हा पातळीवर गरीबी रेषेखालील याद्यांची संख्या वाढली<br>• गरीबी रेषेखालील लोकांसाठी ब्लॉक कट ऑफ कार्यकारिणी ही जिल्हा स्तरापेक्षा राज्य स्तरावर निश्चित होणार |
| | • रू. ५० हजारांपेक्षा जास्त रकमेचे कर्ज असल्यास जमीन तारण म्हणून ठेवण्याची मागणी करणारी बँक कर्मचाऱ्यांची मनमानी कार्यपद्धती | • कर्जे माफ केली जातील असे राजकीय आश्वासन<br>• संसदेचे अधिवेशन सुरू असतांना आणि खासदार उपस्थित राहू शकत नसताना जिल्हा समितीच्या बैठका जिल्हा ग्रामीण विकास संस्था आयोजित करणार |

| | | |
|---|---|---|
| | • जाणीवपूर्वक कर्जे न थकवलेल्या थकबाकीदारांना अपात्र ठरवणे<br>• सरकारी व बँक अधिकारी यांच्या दलालीच्या 'पैतृक' भ्रष्ट कार्यपद्धती<br>• कर्जाची परतफेड न करणे<br>• स्वयंसहायता गटातील सभासदांना व्यक्तीगत पतपुरवठा - कर्जाची कागदपत्रे गटाच्या नाही तर प्रत्येक व्यक्तीच्या नावाने केली जातात आणि ती व्यक्ती थेट बँकेत परतफेडीची रक्कम भरते | • स्वयंसेवी संस्थांबरोबरच्या करारात व विशेष प्रकल्पांमध्ये 'ग्राहकवादी भ्रष्ट कार्यपद्धती'<br>• राजकीय नेत्या त्यांच्या पक्षाच्या समर्थकांच्या स्वयंसेवी संस्थांना एउएभ अंतर्गत स्वयंसहायता गट स्थापन करण्यासाठी व प्रशिक्षण करारांसाठी प्रोत्साहन देतात. |
| | • अल्प जलसंधारणासाठी बँकेचे अधिकारी सहकर्जदारांचे प्रकरण तयार करतात ज्यात जमीन पतीच्या नावावर आणि कर्ज पत्नीच्या नावावर असते<br>• स्वयंसहायता गटाच्या करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर १०% रकमेचा पहिला हप्ता DRD वितरीत करत नाही आणि स्वयंसहायता गट स्थापन होऊन त्यांनी बँकेत खाते उघडेपर्यंत त्यात विलंब केला जातो | • स्वयंसहायता गटांसाठी सरकारी ठेके (माध्यान्ह भोजन, गणवेश इ.) मिळवण्यासाठी स्थानिक पातळीवरील राजकीय वातावरण<br>• राजकारण्यांसाठी स्वयंसहायता गट ही एक संधी - महिलांना एकत्र आणण्याचे व जमा करण्यासाठीचे साधन |
| औपचारिक कायदेशीर मान्यता, नंतर दिली जाणाऱ्या अनौपचारिक कार्यपद्धती | • गरीबी रेषेखालील लोकसंख्येपैकी ३०% नागरिकांना सामावून घेता आले नाही आणि नंतर मार्गदर्शक तत्त्वांमधून वगळण्यात आले<br>• महत्त्वाच्या उपक्रमांसाठीच्या धोरणात्मक संकल्पनेच्या दृष्टीने योग्यता नसतानाही 'बहु-उद्देशीय' गटांना परवानगी देण्यात आली<br>• वापरण्यात न आलेले अनुदान बँकेने परत पाठवले पण 'मोठी कामगिरी बजावल्या' सारखे दाखवले<br>• निधी अन्यत्र वळवणे (गुंतवणूक, ठेव इ.)<br>• परतफेड करण्यात ८०% पेक्षा जास्त वेळेस अपयशी ठरलेल्या पंचायतींच्या भविष्यातील पतपुरवठ्यावर बंदी घालण्यात येणार, निकषातून वगळण्यात आले | • अंत्योदयाचा दृष्टिकोन वगळणे |
| दंडात्मक प्रतिबंधांच्या अनुपस्थितीत अनौपचारिक कार्यपद्धती | • पुरेसे दंडात्मक प्रतिबंधाच्या अभावी भ्रष्टाचार सुरू राहील<br>• वसुलीची औपचारिक कार्यपद्धत प्रभावहीन असल्याने कर्जाची परतफेड न करणे सुरूच राहील | • पुरेसे दंडात्मक प्रतिबंधाच्या अभावी भ्रष्टाचार सुरू राहील |

**संदर्भ :**

अदनान एस. २०१३ ‘लँड ग्रॅब्ज अँड प्रिमिटीव्ह अँक्युम्युलेशनझ डेल्टाइक बांगलादेश : इंटरॅक्शन्स बीटविन निओलिबरल ग्लोबलायझेशन, स्टेट इंटरव्हेनशन्स, पॉवर रिलेशन्स अँड पीजन्ट रेझिस्टन्स“, जर्नल ऑफ पीजन्ट स्टडीज, ४०(१) : ८७ - १२८.

बेसाईल ई. २०१३ कॅपिटॅलिस्ट डेव्हलपमेंट इन इंडियाज् इन्फॉर्मल इकॉनॉमी, लंडन : राऊटलेज.

डी बर्सेगोल, आर. आणि एस. गौडा २०१२, ‘बिल्डींग दी सिटीज् ऑफ टूमारो : फाईंडींग्ज फ्रॉम स्मॉल इंडियन म्युनिसिपाल्टीज्“ सिक्स्थ अर्बन रिसर्च अँड नॉलेज सिंपोझिअम http://siteresources.worldbank.org/inturbandevelopmentresources/336387-1369969101352/De-Bercegol.pdf

भल्ला एस. २०१४ बियॉन्ड दी पोस्ट १९९१ ‘चॅलेंज“ टू दी फन्क्शनल एफिशिअन्सी ऑफ एस्टॅब्लिशड स्टॅटीस्टीकल ऑर्गनायझेशन्स, इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली फेब्रुवारी १५ व्हॉल्यूम XLIX क्र. ७ पीपी ४३-५०

चक्रबर्ती, अंजन, अजित चौधरी अँड स्टीफन क्युलेनबर्ग (२००८). ग्लोबल ऑर्डर अँड न्यू इकॉनॉमिक पॉलिसी इन इंडिया : दी पोस्ट कलोनिअल फॉर्मेशन ऑफ दी स्मॉल स्केल सेक्टर, केंब्रिज जर्नल ऑफ इकॉनॉमिक्स, ३३(६), ११६९-१८६.

चंपका आर. आगामी, प्लेस, प्ल्युरल लिगॅलिटीज, ट्रान्सफॉर्मेशन्स अँड कन्टिन्यूटी. दी इन्फॉर्मल इकॉनॉमी ऑफ दी हिस्टॉरिक पेटे, बंगलोर, इंडिया, इन (एड) ई. बेसाईल बी. हॅरीस - व्हाईट अँड सी ल्यूट्रींजर इंडियाज् कॅपिटॅलिजम : ओल्ड अँड न्यू रीजन्स, लंडन, पालग्रेव्ह

चॅटर्जी, पी. २००८, ‘डेमॉक्रसी अँड इकॉनॉमिक ट्रान्सफॉर्मेशन’, इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली ४३(१६) : १९-२५.

फर्नांडिझ, बी. (२०१२) ट्रान्सफॉर्मेटीव्ह पॉलिसी फॉर पूअर वूमन : अ न्यू फेमीनिस्ट फ्रेमवर्क. बर्लिंग्टन, व्हीटी अँड सर्व्हे : अँशगेट.

गुरीन आय., बी. द एस्पालिअर आणि जी. वेंकटसुब्रह्मण्यम, जी. (आगामी) दी सोशल रेग्यूलेशन ऑफ मार्केट्स. व्हाय मायक्रो क्रेडिट फेल्स टू प्रमोट जॉब्ज इन रूरल साऊथ इंडिया, डेव्हलपमेंट अँड चेंज.

गुप्ता ए. १९९५. ब्लर्ड बाऊंड्रीज : दी डिस्कोर्स ऑफ करपशन, दी कल्चर ऑफ पॉलिटीक्स, अँड दी इमॅजिन्ड स्टेट. अमेरिकन एथनॉलॉजिस्ट, २२, २८.

हॅरीस-व्हाईट बी. २००३, इंडिया वर्किंग : एसे ऑन इकॉनॉमी अँड सोसायटी केंब्रिज, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस.

हॅरीस-व्हाईट बी. २००६ पॉव्हर्टी अँड कॅपिटॅलिझम इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली एप्रिल १ पीपी १२४१-६

हॅरीस-व्हाईट बी. (एड) आगामी मिडल इंडिया अँड अर्बन - रूरल डेव्हलपमेंट : फोर डिकेड्स ऑफ चेंज इन तमिळनाडू (नवी दिल्ली, स्प्रिंजर)

हॅरीस-व्हाईट बी. आगामी, ‘इनोव्हेशन इन दी इन्फॉर्मल इकॉनॉमी ऑफ मोफुस्सील इंडिया“ इन (एड) एल मिशेल एट अल इंडिया अँस अ पायोनिअर ऑफ इनोव्हेशन : कन्स्ट्रेन्ट्स अँड अपोर्च्युनिटीज (युनिव्हर्सिटी ऑफ पेनसिल्व्हानिआ)

हॅरीस-व्हाईट बी., वेंडी ओलसेन, पेन्नी व्हेरा सॅन्सो आणि व्ही सुरेश २०१३, ‘मल्टीपल शॉक्स अँड स्लम हाऊसहोल्ड इकॉनॉमीज इन साऊथ इंडिया“, इकॉनॉमी अँड सोसायटी ४२(३) : ४०० - ४३१ (रिपब्लिश्ड इन (एड) ए. शाह अँड एस. कॉरब्रिज ‘दी अंडरबेली ऑफ दी इंडियन बूम“ राऊटलेज)

हॅरीस-व्हाईट बी. विथ जी. रॉड्रिगो, २०१३, ‘पुदुमाई’ - इनोव्हेशन अँड इन्स्टिट्यूशनल चर्निंग इन इंडियाज् इन्फॉर्मल इकॉनॉमी : अ रिपोर्ट फ्रॉम दी फिल्ड http://www.southasia.ox.ac.uk/working-papers-resources-greenhouse-gases-technology-and-jobs-indias-informal-economy-case-rice

हॅझेल, पी., सी. पाऊल्टॉन, एस. विग्गीन्स अँड ए. डॉरवॉर्ड (२००७) ‘दी फ्युचर ऑफ स्मॉल फार्म्स फॉर पॉव्हर्टी रिडक्शन अँड ग्रोथ’. डिस्क्शन पेपर ४२. वॉशिंग्टन: आयएफपीआरआय.

हेन्समॅन, आर. (२०००) ‘ऑर्गनायझिंग अगेन्स्ट दी ऑड्स : वूमेन इन इंडियाज् इन्फॉर्मल सेक्टर“, इन एल. पॅनिश अँड सी. लेज (एड) सोशालिस्ट रजिस्टर २००१ : वर्किंग क्लासेस, ग्लोबल रिअँलिटीज, पीपी. २४९-५७. न्यूयॉर्क: मन्थली रिव्ह्यू प्रेस.

जयराज ए. आणि बी. हॅरीस-व्हाईट, २००६, ‘सोशल स्ट्रक्चर, टॅक्स कल्चर अँड दी स्टेट : तमिळनाडू, इंडिया“ इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली व्हॉल्यूम XLI क्र. ५१ पीपी ५२४७-५७, डिसेंबर २३.

जॅन एम. ए. आणि बी. हॅरीस-व्हाईट २०१२, 'दी थ्री रोल्स ऑफ अग्रीकल्चर मार्केट्स : अ रिव्ह्यू ऑफ आयडियाज् अबाऊट अग्रीकल्चरल कमॉडिटी मार्केट्स इन इंडिया" इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली (विशेष अंक) डिसेंबर २९, २०१२ व्हॉल्यूम एक्सएलव्हीआयएल क्र. ५२ पीपी ३९-५२

झा पी.एस. २०१३ व्हेअर डीड इंडियन डेमॉक्रसी गो रॉंग? संडे गार्डियन नोव्हेंबर ९ एक्सरप्टेड फ्रॉम इंडिया सीन्स १९४७: लूकिंग बॅक अट अ मॉडर्न नेशन (नियोगी बुक्स).

कर, डी. (२०१०) 'दी ड्रायव्हर्स अँड डायनॅमिक्स ऑफ इललिसीट फायनान्शिअल फ्लोज फ्रॉम इंडिया: १९४८ - २००८', ग्लोबल फायनान्शिअल इंटेग्रिटी (www.gfintegrity.org/).

कविराज, एस. १९८८, 'ए क्रिटीक ऑफ दी पॅसिव्ह रिव्होल्यूशन", इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली विशेष क्रमांक नोव्हेंबर, पीपी. २४२९-२४४४.

कुमार अरूण १९९९, दी ब्लॅक इकॉनॉमी इन इंडिया, नवी दिल्ली, पेंग्विन.

कुमार अविनाश, २०१४ क्रिमिनलायझेशन ऑफ पॉलिटीक्स : कास्ट, लँड अँड दी स्टेट ऑफ बिहार, नवी दिल्ली, रावत पब्लिकेशन्स.

महेंद्र देव एस. २०१४ दी चॅलेंज इन एम्प्लॉयमेंट इन ग्लोबलायझिंग इंडिया इकॉनॉमिक अँड पॉलिटीकल विकली ऑगस्ट २, २०१४ व्हॉल्यूम र्ते ५० क्र. ३१ पीपी ५०-५२

मणी एम., जी मोडी आणि एम. सुकुमार २०१३ एम्प्लॉयमेंट अँड वर्किंग कंडिशन्स अँड दी सप्लाय चेन फॉर कमॉडिटीज इन रीटेल - अ केस स्टडी ऑफ राईस इन चेन्नई वर्किंग पेपर नं. ११ http://www.southasia.ox.ac.uk/working-papers-resources-greenhouse-gases-technology-and-jobs-indias-informal-economy-case-rice

मेनन, एस. १३, 'इंडियन ट्रेड युनियन्स आर गेटींग बीगर, कोईंसाईडिंग विथ स्लो-डाऊन", बिझनेस स्टॅंडर्ड ६ एप्रिल. http://www.business-standard.com/article/economy-policy/indian-trade-unions-are-getting-bigger-coinciding-with-slowdown-113040600392_1.html

मोहन, आर. (२००२) 'स्मॉल स्केल इंडस्ट्री पॉलिसी इन इंडिया : अ क्रिटीकल इव्होल्यूशन", इन ए. क्रुएगर (एड.) इकॉनॉमिक पॉलिसी रिफॉर्म्स अँड दी इंडियन इकॉनॉमी, चॅप्टर ६. शिकागो, आयएल : युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस.

नासकर एस २०१२ इंडियन व्हिलेजर्स, फेड अप विद कॉन्स्टंट कोल फायर्स, टर्न टू प्रोटेस्ट दी नॅशनल ऑगस्ट ३१

पटनायक, पी. २०१२, 'दी पर्व्हर्स ट्रान्सफॉर्मेशन". २२ वे राजन लेक्चर, आयआरएमए, गुजरात (जानेवारी). http://www.youtube.com/watch?v=Vy39RVvV_c4 (accessed 19 April 2012).

प्लॅनिंग कमिशन २००९, डेव्हलपमेंट चॅलेंजेस इन एक्सट्रीमिस्ट अफेक्टेड एरियाज, एक्स्पर्ट ग्रुप, प्लॅनिंग कमिशन गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली

प्रकाश ए. आगामी अ (२०१४) दलित कॅपिटल : स्टेट, मार्केट अँड सिव्हील सोसायटी इन अर्बन इंडिया, नवी दिल्ली, राऊटलेज

प्रकाश ए. आणि बी. हॅरीस-व्हाईट २०१० सोशल डिस्क्रीमिनेशन इन इंडिया: अ केस फॉर इकॉनॉमिक सिटीझनशिप आयएचडी/ ओक्सफाम वर्किंग पेपर आयएचडी नवी दिल्ली/ / ओक्सफाम वर्किंग पेपर नं. ८

रघु राम टी. एल. २००९, इललिगल कोल मायनिंग इन झारखंड अँड कन्ट्रोल स्ट्रॅटेजीज्, XLRI जमशेदपूर स्कूल ऑफ बिझनेस अँड ह्यूमन रिसोर्सेस जमशेदपूर

रॉय आर. १९९६ स्टेट फेल्यूअर इन इंडिया : पॉलिटीकल-फीस्कल इम्प्लिकेशन्स ऑफ दी ब्लॅक इकॉनॉमी आयडीएस बुलेटीन व्हॉल्यूम २७ नं. २ पीपी २२-३०

संकरन के. २००८. इन्फॉर्मल इकॉनॉमी, ओन अकाऊंट वर्कर्स अँड दी लॉ : ॲन ओव्हरव्ह्यू. WIEGO लॉ पायलट प्रोजेक्ट ऑन दी इन्फॉर्मल इकॉनॉमी. रिट्राईव्ह्ड फ्रॉम http://wiego.org/sites/गुद

सन्याल, के. (२००७) रिथिंकींग कॅपिटलिस्ट डेव्हलपमेंट : प्रिमिटीव्ह ॲक्युम्युलेशन, गव्हर्नमेंटॅलिटी अँड पोस्ट-कलोनियल कॅपिटॅलिझम. नवी दिल्ली : राऊटलेज इंडिया.

शर्मा ए. (एड) २०१४ इंडियन लेबर अँड एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०१४, इन्स्टिट्यूट फॉर ह्यूमन डेव्हलपमेंट अँड ॲकॅडेमिक फाउंडेशन, नवी दिल्ली,

सिंग एन. २०१४ थिव्हज् ऑन टू व्हील्स, ओपन मॅगझिन २० जानेवारी पीपी ३३-३८

सिन्हा ए. २००७ 'ड्रायव्हर्स ऑफ ग्रोथ" चॅप्टर ५ इन (एड) बी हॅरीस-व्हाईट अँड ए सिन्हा ट्रेड लिबरलायझेशन अँड इंडियाज इन्फॉर्मल इकॉनॉमी, नवी दिल्ली ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटी प्रेस

डे सोटो एच २००३, दी मिस्ट्री ऑफ कॅपिटल : व्हाय कॅपिटॅलिझम ट्रिम्फ्स इन दी वेस्ट अँड फेल्स एव्हरिव्हेअर एल्स. न्यूयॉर्क : बेसिक बुक्स.

श्रीनिवासन के. आगामी, मनी लॉन्ड्रींग अँड कॅपिटल फ्लाईट पीपी १९०-२०७ इन (एड) बी हॅरीस - व्हाईट आणि जे हेयर इंडियन कॅपिटॅलिझम इन डेव्हलपमेंट, लंडन राऊटलेज

श्रीनिवासन एम. व्ही. सेगमेंटेशन ऑफ अर्बन लेबर मार्केट्स इन इंडिया : अ केस स्टडी ऑफ अर्नी, तमिळनाडू. पी.एचडी.

*(**बार्बरा हॅरिस व्हाइट**- लेखिका ऑक्सफोर्ड विद्यापीठात डेव्हलपमेंट स्टडीज् या विषयाच्या प्राध्यापिका असून तेथे त्या वरिष्ठ संशोधिका म्हणूनही कार्यरत आहेत. भारतातील आर्थिक व सामाजिक विकास या विषयावर संशोधन करतांना त्यांनी भारतातील भांडवलशाही, दलित वर्ग, आदिवासी तसेच भारतातील व्यापार अर्थशास्त्र यांबाबत सखोल संशोधन केले असून त्यादरम्यान विविध ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित विषयांबद्दल सप्रमाणित माहिती मिळवली आहे. संपर्कासाठी **ईमेल** - barbara.harriss-white@qeh.ox.ac.uk*

**योजना मराठी**

**ऑक्टोबर २०१४**

**'नागरी नियोजन'**

**२०१४-२०१५ या**

**अंकातील लेखांचा अनुवादाचे काम पाहणाऱ्या भाषांतरकारांची नावे पुढीलप्रमाणे -**

१. शर्वरी जोशी
२. रवींद्र जोशी
३. निवेदिता भोरकर
४. उमेश कुलकर्णी
५. राजेंद्र येवलेकर
६. जुई देशपांडे
७. सुवर्णा बेडेकर
८. ग्रिष्मा जोग
९. शैलेश पाटील

# आगामी अंक

**नोव्हेंबर, २०१४**

**'तंत्रज्ञान, शोध आणि माहिती आधारित अर्थव्यवस्था'या विषयावर असेल.**

---

**डिसेंबर, २०१४**

**' अधिकार विकेंद्रीकरण आणि भारतीय प्रशासन '**

**या विषयावर असेल.**

# आर्थिक समावेशकतेचा आराखडाः प्रधानमंत्री जन धन योजना

-प्रवाकर साहू



**आर्थिक समावेशकतेच्या बाबतीत कुठल्याही फुटपट्ट्या वापरल्या तरी भारतात बरेच काही अजून होणे बाकी आहे.**

**भारतीय बँक खातेधारकांना वित्तीय संस्थांमध्ये समाविष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबाचे मूलभूत खाते उघडले जाऊन अर्थसाक्षरतेला अगदी खेड्यापाड्यांपर्यंत विस्तारित करण्यावर जोर देण्यात येत आहे.**

**तरीही वित्तीय निरिक्षरता दूर करायची असल्यास आणि त्वरीत सुटसुटीत वित्तीय पद्धत अवलंबवायची असल्यास प्रधानमंत्री जनधन योजना सर्वोत्तम आहे. अलिकडेच म्हणजे २८ ऑगस्ट २०१४ ला ही योजना सर्वत्र चालु करण्यात आली.**

**जन धन योजना आणि आर्थिक समावेशकता:**


आर्थिक समावेशकतेच्या बाबतीत कुठल्याही फुटपट्ट्या वापरल्या तरी भारतात बरेच काही अजून होणे बाकी आहे.

जसे, २०१२ पर्यंत वयाची १५ वर्षे पूर्ण असलेल्यांपैकी केवळ ३५% लोकांचे औपचारिक संस्था ( बँका ) मध्ये खाते होते, जेव्हा इतर विकसनशील देशांत हे प्रमाण सरासरी ४१% इतके आहे. (जागतिक बँक) रिझर्व बँक ऑफ इंडिया च्या आर्थिक समावेशकतेच्या प्रयत्नाने २०११ ते १३ पर्यंत हे प्रमाण १०० दशलक्ष अधिक वाढले. आज २२९ दशलक्ष मुलभूत बँक खाती भारतात आहेत. औपचारिक वित्तीय संस्थांमधील प्रवेश सर्वसामान्य नागरिकांसाठी तुलनेने सोपा झाला आहे. तरीही हजारो खेड्यांमध्ये आज बँकांच्या शाखाच नाहीत. व्यावसायिक बँकांच्या एकूण पत कर्जापैकी १०% पेक्षाही कमी पतकर्ज ग्रामीण भागाकडे जाते. जिथे ६५% अधिक जनता रहाते. म्हणूनच आर्थिक समावेशकतेची भारताची गरज वादातीत आहे.

**प्रधान मंत्री जन धन योजनेची अंमलबजावणी (प्रमजधयो) २८ ऑगस्ट २०१४ पासुन लागु करण्यात आली**. सुरुवातीला प्रतिवर्षी म्हणजेच १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत ७. ५ करोड कुटुंबाची बँक खाती उघडण्याचे प्रमजधयो चे उद्दिष्ट आहे. त्या पैकी जवळ जवळ २ करोड बँक खाती पहिल्याच दिवशी उघडण्यात आली.पहिल्या टप्प्यात सर्व **भारतीय बँक खातेधारकांना वित्तीय संस्थांमध्ये समाविष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबाचे मूलभूत खाते उघडले जाऊन अर्थसाक्षरतेला अगदी खेड्यापाड्यांपर्यंत विस्तारित करण्यावर जोर देण्यात येत आहे हा प्रयत्न आहे**. प्रत्यक्ष रोख लाभ ही कार्यप्रणाली राबवण्याचे उद्दिष्ट आहे. दुसऱ्या टप्प्यात मूलभूत बँक खाते धारकांसाठी आर्थिक योजना आणि छोटे विमे आणि निवृत्तीवेतन आदिं. चा त्यात समावेश करण्यात येईल. दुर्गम, ग्रामीण भागात बँकांच्या शाखा उघडणे कठीण असले तरी या योजनेला कार्यान्वित करण्यासाठी बँक समन्वयक मोठ्या प्रमाणात नेमले जातील.

विकसित राष्ट्रांपेक्षाच नव्हे तर इतर विकसनशील देशांच्या मानाने भारतातील आतिगरिब आर्थिक रुजवात ही फारच कमी आहे. म्हणूनच या आर्थिक समावेशकतेच्या या उपक्रमाचे स्वागत होते आहे.

**आकृती १. ० १५ वर्षे वयापेक्षा अधिक वय असलेल्यांचे बँक खाती**




**स्त्रोत: वर्ल्ड बँक २०१२**

**असणा-यांचे २०११ सालचे प्रमाण**

सूक्ष्म पातळीवर आर्थिक समावेशकता आणि औपचारिक पतकर्ज आर्थिक उन्नतीसाठी अतिशय महत्वाच्या बाबी आहेत, तसेच लहान उद्योग व्यवसायांना चालना देणाऱ्याही आहेत.

**१.१ : आर्थिक समावेशकतेचे महत्व :**

**आर्थिक समावेशकतेमुळे वित्तीय संस्थांचे लोकांपर्यंत पोहोचणे शक्य होते त्याचा विकास आणि रोजगारावर चांगला परिणाम होतो**. (लेव्हाईन २००५) या यंत्रणे मार्फत दिसून येणारे फायदे हे निम्न हस्तांतरण खर्चामुळे उत्तम भांडवल वाटप आणि जोखीम यात वाढ होऊन अर्थव्यवस्थेला बळकटी येते.

जहान आणि मैकडोनल्ड यांच्या (२०११) निरीक्षणानुसार, आर्थिक खोलीचा सहसंबंध हा गरीबांच्या उत्पन्नात किती वाढ झाली आणि त्याद्वारे दारिद्रय निर्मूलन झाले का? याच्याशी असतो आर्थिक समावेशकतेमुळे विविध उत्पन्न गटांमधिल दरी कमी होण्यास मदत होते आणि औपचारिक वित्तीय संस्थांकडून पतकर्ज मिळण्याच्या संधी (आर्थिक दृष्ट्या) निम्न वर्गास उपलब्ध होतात. एरवी या वर्गाजवळ कुठलेही तारण, पत, कर्जफेडीचा इतिहास किंवा प्रभावशाली व्यक्तींशी ओळख-पाळख नसते.

असे अनेक दाखले पुरावे देता येतील की, आर्थिक समावेशकतेमुळे स्वयंरोजगाराच्या शक्यता वाढतात आणि गरिब कुटुंबाचे उत्पन्न आणि राहणीमान सुधारते. बॉशेट (२०११) बॅनर्जी व डफ्लो (२०१३) यांच्या मतानुसार **सूक्ष्म वित्तीय कर्जे गरिबी निर्मूलनास हातभार लावतात.**

अनौपचारिक अर्थव्यवस्था असलेल्या विकसनशील देशांतील; जसे भारतात, गरीब कुटुंबे ही आपल्या आर्थिक देवाणघेवाणी (बचत किंवा कर्ज) या अनौपचारिक पद्धतीनेच करित असतात. या मध्ये कुटुंबातील सदस्य/नातेवाईक, सावकार, विविध आकर्षक परताव्याच्या (फसव्या) योजना अशांशी आर्थिक व्यवहार केला जातो आणि तो बहुधा खूप नुकसानीचा आणि जोखमीचा असतो.

परंतु, प्रधानमंत्री जन धन योजनेद्वारे आर्थिक पाठबळ खात्रीने उपलब्ध होईल आणि अधिक बचत होण्यासाठी सुध्दा याचा फायदा होईल.

दक्षिण आशियातील विकसनशील देश व भारत यांच्या अभ्यासावरून (अगरवाल २०११ साहू आणि डॅश २०१३ ) बँक शाखांची उपलब्धता जर खेडोपाडी असेल तर बचतीचे प्रमाण नि:संशय वाढते.

**भारतात आर्थिक सुधारणांच्या दृष्टीने वित्तीय क्षेत्र सर्वाधिक महत्वाचे आहे**. औपचारिक वित्त संस्थांचे अस्तित्व हे सुरक्षित, विश्वासार्ह आणि सक्षम पर्याय देणारे असल्याने हे बचतीला चालना देणारे आहे. बचत करण्यासाठी लोकांना सुरक्षित आणि विश्वासार्ह पर्याय जसे बँका आदी पर्यंत सहज पोहोचता येणे गरजेचे असते. तसेच त्यांच्यासाठी सुयोग्य साधने आणि प्रोत्साहनपर परतावे आवश्यक असतात. परंतु भारतासारख्या देशात विशेषत: खेडोपाडी असे बँकांपर्यंत पोहोचणे सर्वांनाच शक्य होत नाही.

बचतीमुळे लोकांना अस्थिर आर्थिक परिस्थितीत आपले नित्याचे अर्थव्यवहार पार पाडणे सोपे जाते, त्यांचे ग्राहक म्हणूनही मूल्य वाढते आणि एकूणच कामकाजी भांडवल वाढण्यास मदत होते. बचतीसाठीचा मार्ग नसणारी गरीब कुटुंबे खर्च करण्याच्या तात्कालिक मोहाला चटकन बळी पडतात.

प्रधानमंत्री जन-धन योजना गरिब कुटूंबांना उचल (ओव्हर ड्राफ्ट) मिळण्याचे आश्वासन देते ज्या द्वारे गरिबांना कर्ज मिळण्याची सोय होते आणि एकूणच राहणीमान, निर्णयक्षमता सुधारण्यास तसेच आर्थिक व्यवहारात विश्वासार्हता निर्माण होण्यास मदत होते.

या योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या एक लाख रुपयांच्या विमा संरक्षणामुळे गरीब लोकांना नैसर्गिक संकटे व आर्थिक तोटयापासुन संरक्षण मिळते. ही व्यवस्था नसेल तर अशा प्रकारच्या आपत्तींना सामोरे जाणे आणि त्यांचे दारिद्रय रेषेकडून वर सरकणे गरिबांना अशक्य असते. बर्गेस व पांडे (२००५) यांच्या नुसार बँकांच्या शाखा जर ग्रामिण भागात वाढवल्या तर याचा संबंध सर्वच राज्यांमध्ये दारिद्रय निर्मूलानासाठी होईल. तसेच या योजनेमुळे जास्तीतजास्त लोकांपर्यंत औपचारिक बँकिंग प्रणाली पोहोचत असल्याने खातेधारकांसाठी कमीत कमी खर्चात आर्थिक व्यवहार पार पाडणे सरकारला शक्य होते. आर्थिक समावेशकते मुळे सरकारला सामाजिक सुरक्षेसंबंधित देयके अधिक कार्यक्षमतेने व लवकर देणे शक्य होते.


**२. बँकींग पायाभूत सेवा आणि योजना उभारणीला असलेला वाव :**

प्रधानमंत्री जन धन योजना ही अधिकतर सर्वाधिक बँक खाती उघडली जावीत यासाठी आहेच पण त्यात इतरही अनेक बाबी आहेत. रु पे डेबिट कार्ड, १ लाख रु. चे अपघात विमा संरक्षण व जे लोक१५ ऑगस्ट २०१५ पर्यंत खाती उघडतील त्यांना ३० हजार रु. चे जीवन विमे काढुन दिले जातील. बँक खात्यांचे परीक्षण केले जाऊन उचल देण्याचा निर्णय घेतला जाईल. या योजनेचे विक्रमी बँक खाती उघडण्याचे उद्दिष्ट अवघड आहे कारण बँक खाते उघडण्याची प्रक्रिया किचकट आहे.

एक खाते उघडायला साधारणपणे २० मिनिटे लागतात. कारण खेड्यापाड्यांमध्ये मनुष्यबळ कमी असते, तांत्रिक मदतही उपलब्ध असतेच असे नाही आणि आतापर्यंत ज्यांची बँक खाती नव्हती अशांशी सामना असतो. आठ तासांचा कार्यालयीन कामकाजाचा एक दिवस असा विचार केल्यास दिवसात केवळ २४ खाती ग्रामीण भागात उघडली जातात. काही वर्षांपूर्वी भारतीय रिझर्व बँकेने आर्थिक समावेशकतेच्या उद्देशाने अधिकाधिक बँक खाती उघडण्याचे सांगितले होते. दरम्यानच्या ३ वर्षांच्या काळात १०० दशलक्ष खाती उघडण्यात आली परंतु पंतप्रधान जनधन योजनेची उद्दिष्टे आणखी व्यापक आहेत. ही योजना लागू होण्याच्या पहिल्या दिवशीच शहरी आणि ग्रामिण भागात मिळून २ करोड हून अधिक बँक खाती उघडली गेली. परंतु अशा त-हेने खातेधारकांच्या संख्येत वाढ झाल्याने बँकिंग प्रणालीवर अतिरिक्त ताण येऊ शकतो.


२ व ३ क्रमांकाच्या आकृत्यांमध्ये भारतातील आणि जगातील इतर बँक खाती व ए टी एम संबंधी तुलना केलेली आहे.

**आकृती : २**




(स्त्रोत: वर्ल्ड डेव्हलपमेंट इंडिकेटर्स वर्ल्ड बँक २०१४)

**आकृती- ३**




(स्त्रोत: वर्ल्ड डेव्हलपमेंट इंडिकेटर्स वर्ल्ड बँक २०१४)

या वरून असे लक्षात येते की प्रती एक लाख लोकसंख्येसाठी असलेल्या बँक शाखांमध्ये किरकोळ वाढ झाली हे आकडे ब्राझिल, रशिया आणि मेक्सिको पेक्षाही कमी आहेत.

भारतात आर्थिक निरिक्षरता प्रमाण खूप आहे. एकूण लोकसंख्येच्या ४२% जनतेची कुठल्याही औपचारिक वित्तीय संस्थांमध्ये खाती नाहीत आणि हे लोक सावकार, अनौपचारिक वित्तीय व्यवहार करणाऱ्या संस्था किंवा माणसे यांच्यावर आपल्या आर्थिक गरजांसाठी अवलंबून आहेत. सध्या भारतात बँका ११५०८२ व १६००५५ ए टी एम केंद्रे आहेत; त्यापैकी ४३९६२ बँक शाखा आणि व २३३३४ ए टी एम केंद्रे ही ग्रामीण भागात आहेत. भारतात बँकांचे व ए टी एम्स चे असे जाळे रिझर्व बँकेने सर्व इतर बँकांना दिलेल्या निर्देशांमुळे शक्य झाले. भारतात डाक खात्याची कार्यालये देशाच्या अतिदुर्गम भागांत देखील अस्तित्वात आहेत, त्यांची मदत या कामी घेता येणे शक्य आहे. आर्थिक समावेशाकतेची योजना कार्यक्षमपणे राबवायची असेल तर बँकांचे जाळे सर्वत्र पसरणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री जन धन योजनेद्वारे डेबिट कार्ड्स दिले जाणार आहेत त्यामुळे ए टीएम्स चा वापर वाढेल.

आकृती क्रमांक ३ मध्ये भारत (१ लाख लोकसंख्येसाठी ११) आणि इतर विकसनशील देशांचे ए टी एम जाळे यांची तुलना केलेली आहे. रशिया मध्ये हे गुणोत्तर १८२ ए टी एम्स प्रति एक लाख लोकसंख्या, ब्राझिल मध्ये ११८, मेक्सिको ४७ तर चीन मध्ये ३७ आहे. रशिया मध्ये हे गुणोत्तर २००७ साली ४५ इतके होते ते २०१२ मध्ये १८२पर्यत वाढले भारतात हेच प्रमाण ३ पासुन ११ पर्यत वाढले आहे. याच काळात भारताने इतर देशांच्या तुलनेने ए टी एम्स जाळे पसरवण्यात अथक प्रयत्न केला. आज भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे. योजने

अंतर्गत बँक खाते धारकांची अचानक सात करोड इतकी वाढलेली संख्या उद्दिष्टानुसार पूर्तता झाल्यास गृहीत धरली तर बँकांना आपल्या आतापर्यन्तच्या ग्राहकांसोबतच या वा खातेधारकांची डेबिट कार्ड्स सेवाही अधिक कार्यक्षमतेने राबवावी लागेल. यामुळे अस्तित्वात असलेल्या बँकिंग सेवा क्षेत्रावर कमालीचा अतिरिक्त ताण पडणार आहे. त्याचप्रमाणे ग्रामिण भागात ए टी एम्स चे जाळे अजून वाढविणे गरजेचे आहे. आर्थिक सर्व समावेशकतेपासून बाहेर राहिलेल्यांना जर सामावून घ्यायचे असेल तर जगभरात अशा प्रणाली वापरल्या जातात त्यांचा अवलंब आपल्याला करावा लागेल .

विमा नियंत्रण व विकास प्राधिकरण कायदा १९९९ अंतर्गत भारतातील विमा क्षेत्राची वाढ झाली. १९९९ साली सहा राष्ट्रीय कंपन्या ते आज ५६ खाजगी गैर जीवन विमा व विमा कंपन्यांपर्यत ही संख्या वाढली आहे. समाजातील सर्व घटकांसाठी सुयोग्य विमा उत्पादने आणणे यामुळे शक्य झाले. २०११ साली भारतात विमा क्षेत्राचा साधारण सहभाग ३२३२८ करोड रु. इतका होता त्यापैकी जीवन विमा क्षेत्र ७७% एवढे म्हणजे २५००० करोड रु. इतके होते. जीवन विम्याच्या तुलनेने गैर जीवन विमा क्षेत्राचा विकास अधिक वेगाने झाला. २०११-१२ दरम्यान जीवन विम्याच्या हप्त्यात ८.५ % ची घट झाली जी जगभरात २. ७% एवढी होती. गैर जीवन विम्याच्या हप्त्यात मात्र १३.५% वाढ झाली जी जगभरात १.% एवढी होती. २०११ सालच्या 'पॅन इंडिया इन्श्युरन्स अवेअरनेस कॅम्पेन' अंतर्गत या विषयी जनजागृती, त्याची खोलवर व्याप्ती तसेच विमा उत्पादनांसंबंधी राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश यांचे अनुभव लक्षात घेऊन अविकसित जिल्ह्यांमध्ये या वर अधिक लक्ष केंद्रित केले गेले. जर प्रधानमंत्री जन धन योजना नीट अंमलात आली तर याचा सर्वाधिक फायदा हा गरिब प्रवर्गाला अधिक होईल कारण त्यात विमा संरक्षण दिले जाते आहे. यासाठी अभिनव विमा उत्पादनांची, तसेच कार्यक्षम वितरण प्रणाली जोखीम व्यवस्थापन आणि अधिकाधिक गुंतवणुकीची गरज भासेल.

हे सर्व करित असतांना सध्या अस्तित्वात असलेला आणि आता वाढीव ग्राहक वर्ग यांच्याकरता विमा क्षेत्राला आपली उद्दिष्टे गाठण्यासाठी अवघड गुंतवणूक म्हणजे साधारणपणे ६१२००करोड रु. इतकी गुंतवणूकभारतीय भांडवली बाजारात अपेक्षित आहे. जरी खाजगी आणि परदेशी विमा कंपन्या (२६% मर्यादेनुसार) मुळे विमा क्षेत्राची व्याप्ती वाढली असली तरी जीवन विमा आणि गैर जीवन विम्याची व्याप्ती ४.१% इतकीच अल्प वाढु शकली.

गैर जीवन विमा क्षेत्रात भारताचा क्रमांक जगभरात ५२ वा होता तर २०११ साली त्याची व्याप्ती ०.७% होती, जी जगभरात त्या वेळी २. ८% इतकी होती. परंतु जीवन विमा क्षेत्राच्या बाबतीत हेच प्रमाण भारतात ३. ४% एवढे तर जगभरात सरासरी २. ८ %, १२. ५ % संयुक्त राष्ट्रसंघ, १०. ५% जपान, १०.३% कोरिया तर अमेरिकेत ९. २% एवढे होते.

दुसऱ्या एका सूचकांकानुसार, हे क्षेत्र अविकसित आहे. कारण विम्याची दरडोई विमा हप्त्याची घनता जीवन विम्यासाठी ४९ डॉलर तर गैर जीवन विम्यासाठी १० डॉलर एवढी होती. चीन मध्ये हेच प्रमाण अनुक्रमे ९९ डॉलर्स आणि ६४ डॉलर्स एवढे आहे. या कारणामुळे भारत सरकारने बँकेत मूलभूत खातेधारकांसाठी म्हणजेच जे खरोखरच गरीब आहेत अशांसाठी जी विमा योजना लागू केली आहे ही मोठी पायरी आहे. परंतु याचे यश हे बँकिंग आणि वित्त क्षेत्रातील मूलभूत सोयी सुविधा कशा यावर अवलंबून असेल.

**३ जगात इतरत्र असलेली आर्थिक समावेशकता :**

बँक क्षेत्रातील सर्वसमावेशकता ही जगभरातील सर्वच विकसनशील देशांमध्ये एक मोठा प्रकल्प मानला जातो. तसेच यात अभिनव संकल्पनांचा समावेश देखील याचा विकास दर्शवतो. जगभरातील अनेक विकसनशील देशांनी बँकांच्या मदतीने हे उद्दिष्ट गाठण्याचा प्रयत्न यशस्वीपणे राबवला आहे. उदा: ब्राझील ने त्यांच्या सरकारने जाहीर केलेल्या अनुदान रक्कमांच्या वाटपासाठी विविध बँक सेन्टर्स ज्यांची बँक खातीच नव्हती अशांसाठी नेमले. २००० साली ब्राझिल मधल्या १/३ संस्थाच्या बँक शाखा उघडल्या गेल्या. ९५ हजार हून अधिक बँक समन्वयक नेमून १२ दशलक्ष बँक खाती उघडली गेली. तीन वर्षाच्या कालावधीत ब्राझिल च्या सर्व नगर परिषदांचा यात समावेश होता. ब्राझिल च्या या यशस्वी प्रयोगाने प्रेरणा घेऊन कोलंबिया, पेरू, मेक्सिको आणि चिले यांनीही हा आपापल्या देशात राबवला. या योजनेसाठी होणारा खर्च बघता त्यातून होणारा फायदा अधिक आहे. ब्राझिल मधल्या बँका व ए टी एम्स चे जाळे भारताच्या तुलनेत खूप दृढ आणि कार्यक्षम आहे.

बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर हा सर्वसमावेशक वित्तीय योजनेतला आणखी एक आवश्यक घटक आहे. विशेषत:, आफ्रिकेसारख्या देशात जिथे भौतिक मूलभूत सोयीसुविधांची कमतरता

आहे परंतु दूरध्वनीचे जाळे मात्र तुलनेने अतिशय मजबूत आहे. उदा: केनिया मधील मोबाईल टेलीफोन नेटवर्क ऑपरेटर द्वारे 'इलेक्ट्रोनिक मनी ट्रान्स्फर'(M-PESA ) चे लाखो पंजीकृत ग्राहक आहेत ज्यांचे पूर्वी कुठल्याही बँकेत खाते नव्हते. हा प्रकल्प सुरु झाल्यापासून जे लोक आतापर्यंत आर्थिक समावेशकतेच्या बाहेर होते त्यांचे प्रमाण गेल्या काही वर्षात सहा टक्क्यांहून खाली आलेले आहे. मोबाईल फोन्सच्या याबाबत च्या मदतीला धन्यवाद द्यायला हवेत.

आज ७५% अधिक केनियन जनतेला आर्थिक समावेशकतेचा लाभ मिळाला आहे आणि विविध बँकिंग उत्पादनांचे हे लोक ग्राहक आहेत. सब सहारन आफ्रिकेत हे प्रमाण सर्वाधिक आहे. M-PESA सारख्या योजनांमुळे मेक्सिको मध्ये देखील सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ हा प्रत्यक्ष खातेदाराच्या खात्यात जमा होतो.

या योजनेचा लोकांवर होणारा असर यांच्या अनुमानानानुसार मोबाईल फोन द्वारे रोख रकमेचे हस्तांतरण योजना राबवतांना रोख रकमेच्या हस्तांतरणाच्या खर्चात घट होतांना दिसते. अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सीज् च्या वितरणाच्या खर्चातही घट झाली आहे.

भारताच्या बाबतीतही अशा प्रकारची प्रणाली अंमलात आणणे शक्य आहे का याचा आढावा घ्यायला हवा! या मुळे भ्रष्टाचाराला रोखणे, तसेच विविध सरकारी योजनांचे फायदे नकली खाती उघडून दुहेरी फायदा लाटणे अशा प्रकारांना चाप बसून देशाच्या अर्थ खात्यावर येणारा ताण कमी करता येईल. ज्यांचे कुठल्याही बँकेत खाते नाही तरीही सरकारी योजनांचा लाभ प्रत्यक्ष व्यक्तीला मिळण्यासंदर्भात मेक्सिको हे उत्तम उदाहरण आहे. बँक खाते नसतांना देखिल असे लाभार्थी प्रत्यक्ष लाभ घेतात हे बँक शाखा अस्तित्वात नसतांनाही शक्य होते हे मेक्सिको ने दाखवून दिले.

**४: प्रधान मंत्री जन धन योजनेकडून असलेल्या अपेक्षा :**

केवळ बँक खाती उघडून आर्थिक समावेशकतेवर त्याचा खूप चांगला परिणाम दिसून येईल असे नाही पण या योजने अंतर्गत इतर सवलती बहुआयामी आहेत. या खात्यांत सरकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ रोख रकमांच्या स्वरूपात जमा होणार असल्याने ही खाती निद्रिस्त राहण्याची शक्यता नाही. तसेच, सरकारी योजनांचा लाभ घेतांना खातेधारक यातून रक्कम काढू शकेल, त्याच प्रमाणे काही अंशी बचतही करू शकेल. या मुळे आतापर्यंत बँक खाते नसणाऱ्याला ग्राहक आता संस्थात्मक वित्तीय प्रणालीचा हिस्सा बनतील. इथे विचाराधीन असलेल्या प्रक्रियेत द. अमेरिकेतील ब्राझिल, मेक्सिको व इतर विकसनशील देशांच्या रोख रकमांच्या हस्तांतरण प्रक्रियेचे आपण अनुकरण करू शकतो. या मुळे मध्यस्थ किंवा दलाल हे घटक नष्ट होऊन अधिक पारदर्शिता या व्यवस्थेत येईल आणि सरकारी किंवा अनुग्रह राशी ही प्रत्यक्ष ग्राहकाच्या खात्यात जमा होऊ शकेल. त्याच प्रमाणे या रकमेच्या खर्चासंबंधीचे निर्णय संबंधित कुटुंब स्वतंत्रपणे घेऊ शकतील.

परंतु 'डायरेक्ट कॅश बेनिफिट 'इलेक्ट्रोनिक ट्रान्स्फर ऑफ कॅश पेमेंट या विषयावर अनेक मतभेद आहेत (साहू २०१३).

बँक शाखांचा खेडोपाडी नव्याने विस्तार करून लोकांना आर्थिक समवेशकते मध्ये आणणे या ऐवजी, याच्या मदतीने असे जाळे उभारणे हे कमी वेळात प्रभावीपणे होऊ शकते. कारण केवळ बँक खाते उघडून सारे काही शक्य होईल असे नाही. बँकांना आपल्या कार्यप्रणाली मध्ये अधिक सरलता अणि सहजता आणावी लागेल

तसेच नव्या ग्राहकांना त्यांच्या आर्थिक समावेशकतेच्या संकल्पनांबद्दल समजावून सांगावे लागेल. ञग सोल्युशन चा हा भाग इतर अनेक देशांमध्ये अतिशय महत्वपूर्ण सिद्ध झाला आहे. प्रधानमंत्री जन धन योजना देखील नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून मोबाईल बँकिंग ची प्रक्रिया सुलभ करेल असे अनुमान आहे. सर्व्हिस कोड *९९# वापरुन ग्राहक त्यांच्या खात्यातील शिल्लक रक्कम आणि रोखीचे हस्तांतरण करीत असल्यास त्याचा तपशील आदि अगदी सध्या जीएसएम मोबाइल फोनवर देखील बघू शकतील.

बँकिंग व्यवहारांद्वारे लोकांची बँक खाती उघडून देणे, सरकारी अनुदान किंवा इतर रक्कम त्यांच्या खात्यात जमा करण्यास मदत करणे अशी कामे करणे अपेक्षित आहे. परंतु यांच्यावर लक्ष ठेवणारी व्यवस्था अस्तित्वात आणल्याशिवाय त्यांच्याकडून वेळेत आणि प्रामाणिकपणे काम केले जाईल किंवा नाही याबद्दल खात्रीने सांगता येत नाही. सरकारने यांना ५०००रु. प्रती महिना वेतन देणार असल्याचे म्हंटले आहे. परंतु सध्या यांना केवळ १५००रु. ते २०००रु. मिळत आहेत. या मुळे उत्तम आणि कार्यतत्पर बँकिंग प्रशासक मिळणे कठीण आहे. या विषयावरही सरकारने काय विचार केला या बाबत सांगणे आवश्यक आहे.

प्रधान मंत्री जन धन योजना (बँक खाते, संबंधित विमा, डेबिट कार्डे, ए टी

एम्स) ही बहुआयामी योजना आहे. परंतु दुर्गम भागात, समुद्र किना-या जवळचा प्रदेश किंवा बंदरे आदि ठिकाणी ए टी एम्स चे जाळे कमकुवत आहे. यामुळे या योजनेला त्याचा अडसर होऊ शकतो. या योजने अंतर्गत डेबिट कार्डाचा वापर वाढणार आहे आणि अर्थातच त्यामुळे ए टी एम्स चे जाळे मजबूत करण्यावर भर दिला जाईल; विशेषत: ग्रामीण भागात जिथे आपल्या देशातील ७०% जनता राहते आहे. या जनतेला एकूण भारतातील एटीएम्स च्या केवळ १५% एटी एम्स वर अवलंबून रहावे लागते. त्या मनाने बँक शाखांचे जाळे बऱ्यापैकी विस्तारीत आहे. या क्षेत्रात जर अनेक मंडळी आली तर गरज आणि पुरवठा यांच्यात समन्वय साधता येईल .

ही योजना अंमलात आणण्यासाठी जे प्रशिक्षित मनुष्यबळ आवश्यक आहे त्याचा सध्या अभाव आहे. आणि त्यामुळे या योजनेसाठी आवश्यक मूलभूत सोयी सुविधांच्या पुरवठ्यात कमतरता राहू शकते. प्रधान मंत्री जन धन योजने अंतर्गत सर्व बँकांना आपल्या सर्व ग्रामीण भागातील शाखांतून कमीत कमी दोनशे नवी खाती उघडण्यासाठीचे उद्दिष्ट दिले गेले आहे. परंतु बँकांना याबाबत काळजी वाटते कारण त्यांच्या मनुष्यबळ या नव्या खात्यांचा भार उचलण्यास पुरेसे नाही. या मुळे आधी बँक शाखांचे जाळे अधिकाधिक विस्तारीत करण्यावर भर दिला गेला पाहिजे, बँकांतील मनुष्यबळ वापरले पाहिजे आणि त्या अनुषंगाने म्हणजेच बँकेतील मनुष्यबळाच्या क्षमतांनुसार हळू हळू नव्या खात्यांचे काम त्यांना सोपवले पाहिजे. हे सर्व झाले तरच बँकांकडून त्यांच्यावर अतिरिक्त ताण न येता त्यांच्याकडून अपेक्षित कार्यक्षमतेने या योजनेची अंमलबजावणी शक्य आहे.

**५ निष्कर्ष:**


'प्रधान मंत्री जन धन योजना' हे आर्थिक सर्व समावेशकतेच्या दृष्टीने उचलले मोठे पाऊल आहे. मूलभूत बँक खाती उघडणे, त्याच्याशी जोडून विमा संरक्षण देणे, डेबिट कार्ड, एटीएम्स चे जाळे आदींमुळे गरीब कुटुंबांचे राहणीमान सुधारण्यास मदत होईल, त्यांच्या आर्थिक व्यवहारांना गती मिळेल, त्यांना स्थैर्य लाभून कुठल्याही संकटांना सामोरे जाण्याचे बळ त्यांना प्राप्त होईल या योजनेची अंमलबजावणी तत्परतेने झाल्यास बँक शाखा, एटी एम्स आदींचे जाळे वा आर्थिक समावेशकता शक्य होईल

*(**प्रवाकर साहू-** लेखक इंस्टिट्यूट ऑफ इकोनॉमिक ग्रोथ दिल्ली, येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. संपर्कासाठी- **ईमेल** - ravakarfirst@ gmail.com, pravakar@ iegindia.org)*

| प्रकाशन विभागाची नवी पुस्तके | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **पुस्तकाचे नाव** | **मुल्य** |
| १. | भारतीय कला के हस्ताक्षर हिंदी | ३१०/- |
| २. | भारतीय कला के हस्ताक्षर हिंदी | २५५/- |
| ३. | एस. एस. ऑफ मनमोहन सिंग व्हॅल्युम -७ | ६३५/- |
| ४. | इंद्रधनुष्य | ११५०/- |
| ५. | वींग वंडर्स ऑफ राष्ट्रपती भवन - राष्ट्रपती भवन मालिका उत्कृष्ठ | २८५०/- |
| ६. | उत्तर भारत की लोक कथाएं हिंदी | ७५/- |
| | **बच्चों के लिये** | |
| ७. | ची ची और चुं चुं | १९०/- |
| ८. | रोचक ऐतिहासिक कहानियाँ भाग-१ | ४५/- |

# असंघटित क्षेत्रातील धोरणकर्त्यांकरिता महत्त्वाकांक्षी वेध

-सुप्रिया राऊत



**'असंघटित श्रमिक सामाजिक सुरक्षा कायदा, २००८' चे उद्दीष्ट्य देशातील असंघटित श्रमिकांच्या राहणीमानाची स्थिती सुसह्य करणे, त्यांना आर्थिक बळकटी देणे हे होय.'**

**असंघटना हा केवळ अर्थव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजाचा प्रश्न अधिक आहे त्यामुळे असंघटित श्रम संकल्पना ही तिच्या मर्यादित वा ठराविक (निश्चित) स्वरुपाविरोधावर आधारलेली आहे. समाज हा योगदान देणारे घटक व समुदाय यांच्या परस्परसहकार्यावर अवलंबून असतो. हे सहकार्य वृध्दींगत केल्यास वर्तमान समाजाचा चेहरा मोहरा बदलण्यास वेळ लागणार नाही.**

**परिचय :**

१९७०च्या दशकात खूपसा वेळ असंघटित अर्थव्यवस्थेवर खर्च केल्यानंतर, मागील दशकापासून सुशिक्षित व धोरणकार असंघटित श्रमिकांच्या हितासाठी, पुनरुत्थानासाठी खपत आहेत. आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटना (ILO) आणि भारत सरकार या श्रमिकांच्या कल्याणार्थ एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत (ILO) कायदा १९७२नुसार असंघटित श्रमिक व्यवस्थेबाबतची उत्सुकता सुरुवातीच्या वर्षांत म्हणजे सन २००० च्या अगोदर अधिक तीव्र होती. (ILO २००२). नंतर भारत सरकार या असंघटित क्षेत्रात राष्ट्रीय उपक्रम आयोग (NCE) द्वारे २००४ मध्ये या प्रश्नाकडे वळले, मात्र थोडे उशिरानेच.

इतका विलंब झाला असला तरीसुध्दा भारतीय संसदेने 'सामाजिक सुरक्षितता' यावर आधारित कायदा संमत केला, जो देशातील बहुसंख्य श्रमजीवी लोकांकरिता आहे त्यातही **'असंघटित श्रमिक सामाजिक सुरक्षा कायदा, २००८' चे उद्दीष्ट्य देशातील असंघटित श्रमिकांची राहणीमानाची स्थिती सुसह्य करणे हे होय.'** या दरम्यान आयएलओ असंघटित श्रमिकांचे संघटित श्रमिकांच्या गटात स्थित्यंतर करण्याच्या दृष्टीकोनातून योजना आखत आहे (शक्य झाल्यास त्याचे कागदपत्रांत सादरीकरण करण्याच्याही प्रयत्नात आहे). याचे महत्त्व जगातील कामगारांसाठी अधिक आहे (दक्षिण गोलार्धातील कामगारांसाठी जास्त) आणि भारताविषयी बोलायचे तर ९०% हून अधिक श्रमिक असंघटित क्षेत्रात आहेत. त्यामुळे त्यांचे संदर्भ आणि उद्दीष्ट्ये ही त्यांचे संघटित क्षेत्रात स्थित्यंतर करताना जागरुक असावयास हवे.

असंघटित श्रमिकांच्या कल्पनेच्या सैध्दांतिक सिध्दांतिक व योजनासंबंधी उपयुक्ततेचे अवलोकन केले आहे. तसेच कामगारकेंद्री समजुतीशी निगडीत संकल्पनांसाठी काही योजना मांडण्यात आल्या आहे. या असंघटित श्रमिकांसंदर्भातील कल्पनांचा आवाका वाढवून विनावेतन म्हणून ओळखले जाणारे, सामाजिक दृष्टीकोनातून मौल्यवान असणा-या असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे वर्गीकरण करण्याचा प्रस्तावही येथे करण्यात आला आहे. तरीही योजनांच्या उद्दीष्टांसाठी आपल्याला एका ठराविक प्रकारच्या असंघटित श्रमांवार लक्ष घालावयास हवे व योजना ठरवण्याच्या प्रक्रियेमध्ये स्वस्त श्रमिक केंद्रस्थानी ठेवावयास हवे.

**असंघटन आणि तत्स्वरुपाची संकल्पना:**

ब्रिटीश मानववंशशास्त्रज्ञ केन हार्ट यांनी १९७३ मध्ये घाना येथे केलेल्या असंघटित क्षेत्राच्या अभ्यासाची कल्पना तत्परतेने उचलली गेली, युनायटेड किंगडम् मधून आल्यामुळे ज्या ठिकाणी उद्योग हे नोकरशहांनी नियंत्रित केलेले

तसेच चालवलेले होते, अशा संस्थानी कायदे पाळून चौकटबध्द अर्थव्यवहार केले आहेत परंतु हार्टना मात्र तेथील व्यवहार नवखे होते. जेव्हा त्यांनी घानातील शहरी प्रांतातल्या पथविक्रेते, श्रमिकवर्ग किंवा इतर कामगार यांना असंघटित कामगार असे संबोधले तेव्हा त्यांच्या कल्पनेमध्ये संयुक्त राष्ट्रसंघ किंवा इतर भांडवलशाही देशातील कारभाराची चौकट होती. त्याच्या व्यक्तव्यानुसार घानातील आर्थिक आराखडयांना त्यांचे ठराविक स्वरुप संयुक्त राष्ट्रसंघ उद्योगसमूहांप्रमाणे लाभलेले नाही त्याप्रमाणे आर्थिक उपक्रम हे असंघटित आहेत. (हार्ट २००६: २२-२३)

अशाप्रकारे, ही असंघटित श्रमिकांची संकल्पना, ही एका ठराविक स्वरुपात विस्तारलेली आहे. ती ही अशा स्वरुपात की, ही संकल्पना केवळ उत्तम नमुना वाटावी. हा आर्थिक आराखडा खरोखरीच नियोक्ता- कर्मचारी नातेसंबंध, निश्चित कामाची जागा, निश्चित हक्क आणि कर्तव्यांवर असलेली नियंत्रणे, आणि सरकारी पर्यवेक्षण या वर आधारलेला असून एका ठराविक वेळी एखाद्या निश्चित समाजघटकासाठी विकसित झालेला आहे. या कामाच्या संघटन नमुन्याशी असंख्य आर्थिक उपक्रमांना जमवून घेता आले नाही, ना जमवून घेत आहेत. आजच्या काळात हा नमुना कामगारांच्या स्वानुभवांवर जोर देत नाही. म्हणूनच या वरुन असा निष्कर्ष निघू शकतो की, ही असंघटित क्षेत्रातील संकल्पना मूळ हेतू व परिणाम साध्य करतच नाही.

कितीही द्विधा वृत्ती आणि नकारात्मकता या संकल्पनेत भरलेली असली तरी त्याआधीच ही योजना धोरणाच्या वर्तुळातून हद्दपार करणे शहाणपणाचे ठरणार नाही. उलट ही संकल्पना बरेच उपयुक्त हेतू पुरवेल. यातील भविष्यकालीन मोठा फायदा असा की, जेव्हा कोणतीही संकल्पना नकाराशी संबंधित असते, तेव्हा त्यात खूपसे सकारात्मक असते, अतिप्रचंड शक्ती भरलेली असते. भारतातील ९०% हून जास्त जनता ही या अशा प्रकारचे उत्तम उदाहरण होय. दुसरा मुद्दा महत्वाचा हा की, ही असंघटित श्रमांची संकल्पना विशिष्ट आणि अनिश्चित कारागिरांमधील अंतर स्पष्ट करते. तिसरे हे की, ही कल्पना थोडी ध्येयानिष्ठता आणि आदर्शवादाकडे झुकणारी आहे. (जरी या स्वरुपात पुनर्विचाराची गरज असली तरीही) चौथे, ही कल्पना या गतिशीलतेला शब्दांकित करते अगदी त्यांच्या कार्यकर्त्यांच्या जाणीवेतून. अंततः ही संकल्पना विस्तृत योजना आराखड्यांना सर्वतोपरी मदत करते.

तरीही, ही कल्पना, योजनेच्या ठराव घटकांमधून स्वीकारतांना अडचणी आहेतच. असंघटित क्षेत्रात खरेतर प्रचंड विविधता आहे. फक्त भारताचाच विचार करावयाचा झाल्यास, त्यातील वैविध्याला सीमा नाही. यातील अडचण अशी की, असंघटित श्रमिकांची ही संकल्पना वापरुन असंघटित श्रमिक उपक्रमातील वैविध्य हस्तगत करण्याच्या प्रयत्नात पुढे गुंतागुंत वाढत जाते. कारण पूर्वार्धात सोप्या वाटणाऱ्या गोष्टी नंतर जटील होत जातात. जसे, भारतात सुरुवातीला संघटित वाटणा-या संस्था उत्तरार्धात आर्थिक व्यवहार संबंधात जटील होतात.

दुसरी अडचण ही संकल्पनेचे स्वरुप समजून घेतांना येते. एखाद्याने असंघटनेचा अर्थ, क्षेत्र अर्थव्यवस्था घ्यावा की रोजगार? खूप वर्षे आयएलओ ने असंघटित क्षेत्रास आकार दिला म्हणून यास 'क्षेत्र' असे संबोधले. तर जसजसे आर्थिक अर्थव्यवस्थेची प्रमाणे विकसित झाली तसतसे लोक यास 'रोजगार' असेही म्हणू लागले. जर ही असंघटित अर्थव्यवस्था संघटीत अर्थव्यवस्थेच्या बाजूस ठेवली तर अर्थव्यवस्थेच्या असंघटित भागाची उत्पादकता निश्चित करतांना, व देशाच्या अर्थविकासात आपले योगदान मोजतांना, समजते की ही संकल्पना संघटित व असंघटित दोन्ही क्षेत्रामध्ये व अर्थव्यवस्थेमध्ये अंतर्भूत आहे.

असंघटित श्रमिकांच्या नोकरी कामधंद्यांची कल्पनाही, संघटित वा असंघटित क्षेत्रातल्या वा अर्थव्यवस्थेत गुंतलेल्या, असंघटित कारागिरांकडून पार पाडल्या जाणा-या नानाविध अर्थोपक्रमांना सुंस्पष्टता देते. भारतामध्ये, धोरणांच्या दृष्टीकोनातून, जर आपल्या संविधानाप्रती वा तत्वांप्रती खरे उतरायचे ठरवल्यास विश्लेषणाचे केंद्र हे असंघटित कामगार व त्यांच्या राहणीमानाच्या स्थिती यांवरच असावयास हवे. कामगारांच्या सर्वसाधारण विकासासाठी त्यांची त्यांच्या कामाशी निगडीत स्थिती, तेथील परिस्थिती, आरोग्य, सुरक्षा, शिक्षण, पोषण आणि आवक या अनुषगांनी योजनांची पाऊल उचलण्याची गरज आहे. असे काम करण्याच्या दृष्टीने ही संकल्पना महत्त्वाची ठरते. त्याचवेळेस ती

बरीच जखडलेलीही वाटते. ही संकल्पना हे स्पष्ट करते की बरेचसे वैविध्यपूर्ण अर्थविषयक उपक्रम महत्त्वाचे आहेत कारण ते अर्थविषयक आहेत म्हणून, केवळ संघटित नाहीत म्हणून नव्हे. हीच समजूत वा बाब सत्यपरिस्थितीच्या आडही येते की, ही **असंघटना हा केवळ अर्थव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजाचा प्रश्न अधिक आहे**.

**असंघटन: अर्थव्यवस्थेपलिकडला सामाजिक प्रश्न:**

**असंघटित श्रम संकल्पना ही तिच्या मर्यादित वा ठराविक (निश्चित) स्वरुपाविरोधावर आधारलेली आहे**. या संकल्पनेचे स्वरुप हे औद्योगिक क्रांती, उद्योगातील नोकरशाहीवरील नियंत्रण याचा परिणाम होते आणि म्हणूनच, फायदेशीर आर्थिक उपक्रमांशी निगडीत होते. याचा परिणामाने असंघटित श्रम संकल्पना ही उत्पादक वा फायदेशीर आर्थिक उपक्रमांशी संलग्न असेल, यात नवल ते काय? असंघटित कामगारांवर लक्ष केंद्रीत करतांना ही कामे फक्त आणि फक्त आर्थिकच असावीत असे गरजेचे नाही. कित्येकदा त्यांत सेवा, शेती, तर काही वेळा घरकाम आणि विनावेतन कौटुंबिक श्रमही अंतर्भूत होतात. जेव्हा जेव्हा उपरोल्लेखित बाबी या असंघटित श्रम आहेत वा नाहीत याबाबत वाद होतो तेव्हा पूर्वग्रहीत धोरणे साधारणपणे नकारात्मक उत्तरे देतात.

शब्दांच्या कमतरतेमुळे आणि सुलभ आकलनासाठी, येथे असंघटित श्रम उपक्रम असा शब्द प्रयोग करण्यात आला आहे ज्यात विविध प्रकारचे अंसंघटित श्रम अंतर्भूत होतात, अर्थातच त्यात अर्थव्यवस्था सुध्दा अंतर्भूत होते. समाज ही मोठी संकल्पना आहे तर अर्थव्यवस्था (ज्यात बाजारपेठही) हा तिचा एक घटक होय (पोल्यांयी २००१:६०, ७१-७९) (हार्ट आाणि हान २००९) जर अर्थव्यवस्था वा बाजारपेठा हे सामाजिक राजकीय सांस्कृतिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या एकच अर्थ असलेले संदर्भ शब्द असतील तर आपली धोरणरुपी भिंगे फारच तोकडी आहेत. स्टिगलीझ २००१ यांनी अभ्यासाद्वारे म्हटले आहे की, जर अर्थव्यवस्था ही समाजाचा एक घटक आहे, फक्त मानवी व्यवहारांचा संदर्भ मुद्दा नाही. हे कळत असेल तर आपल्या योजनांमध्ये पुरेशी समृध्दी आली आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. (पोलांयी २००१ ७४,११६) (पॅरी २००९)

जर या सुक्ष्माभ्यासाची भिंगे आपण परिधान करु शकलो तर विनावेतन घेतली जाणारी निगा वा घरकाम ही महत्वपूर्ण काम असंघटित श्रम असण्यामागची कारणे समजणे सोपे जाईल. उत्तरादाखल येथे दोन प्रमुख मुद्दे लक्षात घ्यावयास हवेत, त्यात पहिला मुद्दा असा की, अशा विनावेतन कृत्यांना असंघटित श्रमांचा दर्जा का द्यावा? व दुसरा हा की, या कृत्यांना 'काम' या संकल्पनेत आरेखित करणे नक्की योग्य आहे का? हार्टने जेव्हा ही विभागणी केली तेव्हा त्याच्या मनातील असंघटनाची कल्पना आज समजणे कठीण आहे. तरी त्याची ही कल्पना ठराविक स्वरुपाची नव्हती. जर असे मर्यादित स्वरुप मानले नाही तरच एखादे काम असंघटित स्वरुपात मानणे अधिक सोपे जाईल. या अर्थाने हेच मानावे लागेल की ही विनावेतन कामे सध्या कोणत्याही असंघटित कामांत मान्य नाहीत.

खरेतर उपरोल्लेखित श्रमांना असंघटित श्रमात मोजण्याचे काही कारण नाही. मात्र संघटित कामांत लागणा-या कोणत्याही उद्देशाशी ही कामे मेळ खात नसल्याने यांना त्यात गणणे आवश्यक आहे. ही कामे असंघटित वर्गवारीत गेल्याने कुणाचीही या कामांबाबतीतील गांभीर्य परीघाबाहेर जाता नये आणि धोरणास योग्य प्रतिसाद मिळू शकतो. असंघटित श्रम हे केवळ दुवा आहे ज्याच्याद्वारे संघटित क्षेत्रात येणा-या नियमित, पर्यवेक्षित कामांच्या वर्तुळाबाहेरील सामाजिक मूल्ये जपणारी कामे यात संघटित होतात.

याद्वारा आपल्याला पुढील प्रश्न पडतो तो हा की, विनावेतन कामांना 'काम' या संकल्पनेत का बरे घेतले पाहिजे? खरेतर विनावेतन काम समाजाच्या भरण-पोषणात व उत्क्रांतीस योगदान देते आणि समाज म्हणजे ऐक्य व एकता असेल तर ही समाजाचीच जबाबदारी ठरते की, या विनावेतन कामांना मानाचे स्थान मिळावे. **समाज हा योगदान देणारा घटक व समुदाय यांच्या परस्परसहकार्यावर अवलंबून असतो.**

आपल्या राजकीय धोरणांनी विनावेतन कामगारांनी दिलेल्या मौल्यवान योगदानास योग्य तो मान देण्यासाठी मार्ग काढावयास हवा. याच धर्तीवर ऍलिन सुपिअट आणि त्याचे सहकारी हेच सुचवतात की, कामगारांकडून केले जाणारे विनावेतन काम हे कर्तव्याधारित असू शकते. सुपिअटच्या टिप्पणीनुसार, जर ही कामे कर्तव्याधारित आहेत तर ती सर्वमान्यही असावयास हवीत. ही संकल्पना

भारतीय स्थितीमानास चपखळपणे लागू पडणारी आहे. तरीही, या कामांस मान्यता मिळणे व कामगारांची ऋची वृध्दिंगत होणे ही या योजनांपुढे आव्हाने कायम आहेतच.

**असंघटित कामे आणि वेतन :**

असंघटित आर्थिक कामे आणि बिनआर्थिक कामांना मान्यता दिलेली असो वा नसो, ती कामे पायाभूत कल्पनांवर आधारित असल्याने ती राजकीयदृष्ट्या आव्हाने आहेत. खरेतर दोन्ही प्रकारची कामे समाजात मोलाची पण तरी आपण सामाजिक दृष्ट्या मौल्यवान कामे आणि उत्पादक व अर्थाचे योगदान करणा-या कामांमध्ये गल्लत करता कामा नये. एकदा का या असंघटित कल्पनांवर आधारीत विनावेतन वर्गवारीला मान्यता मिळाली की, या कामांना व्यवहारातही अशीच मान्यता देण्यासाठी आपण इतरही मार्ग शोधून काढू. हे प्रस्ताव अगदी सेवा व इतर घरकामांना वेतन मिळवून देण्यापासून ते जनतेला त्यांच्या आर्थिक स्थितीची पर्वाही न करता त्यांच्या कुटुंबाकरिता उत्पन्नाची तरतूद करण्यापर्यंत असतील.

तरीही येथे एक विवादाचा मुद्दा असा की, फक्त वेतन नसणे म्हणून असंघटित विनावेतन कामांना मान्यता मिळावी असे नाही. या विनावेतन कामांना व्यवहारात मान्यता देण्यासाठी इतर अर्थेतर बाबींचाही विचार करावयास हवा. या कामांसाठी खूपशा योजनांवर आधारित यंत्रणा उपलब्ध आहेत. या असंघटित कामांना मान्यता देण्यासाठी नानाविध धोरणांवर आधारलेल्या यंत्रणा राबवतांना कामगारांचे अनुभव आणि अपेक्षा यांचा विचार व्हायलाच हवा. कामगारांचे स्वत:चे अनुभव हे धोरणांसाठी फार मौल्यवान स्रोत आहे, ते जे काम करतात त्या कामाचे स्वरुप व आव्हान ओळखण्यास मदत करतात. दुस-या बाजूस आहेत त्यांच्या अपेक्षा, ज्या, योजना तयार करण्यादृष्टीने महत्त्वाचे वळण देतात. या अशा सर्व अपेक्षांना व्यवस्थित समजून घेतल्यास वेगवेगळे मार्ग निश्चितच सुचू शकतात. ज्यात गैरआर्थिक मार्गांचाही अंर्तभाव होतो. जेणेकरुन असंघटित कामांगारांची वर्गवारीही करता येईल व त्यांचे कल्याणही साधता येईल. खालील उल्लेखलेला मार्ग ह्या योजनाबांधणीच्या कामात बरीचशी समाजमूल्य जपणा-या कामांना मान्यता देण्यासाठी चांगली सुरुवात आहे.

**असंघटन आणि लोक धोरणे :**

जर पायाभूत कल्पनांवर आधारित आव्हाने आणि राजकीय पुराणमतवाद हटवता आले तरच, उत्तम धोरण बांधण्याच्या दृष्टीने धोरण प्रक्रियेच्या केंद्रीय स्थानी असंघटित कामागारांना रुजवण्याच्या मार्गातला मोठा अडथळा दूर होईल. त्यांचे स्वत:चे धोरण त्याद्वारे त्यांना निश्चित करता येईल. सध्या सामाजिक संभाषणात कामगार सहभागी असण्याची नितांत गरज आहे. कामांची कर्गवारी आणि कामगारांच्या कामाच्या स्वरुपावरुन हे संभाषण साधले गेले पाहिजे जेणेकरुन यात जास्तीत जास्त कामगार सहभागी होऊ शकतील.

यापुढील आव्हान म्हणजे या कामगारांचा सामाजिक संभाषणातील सहभाग. काम व कामगार यांमधील सूक्ष्म फरक समजून घेण्यासाठी वर्गवारीतील प्रत्येक वर्गाला सुई जेनेरिस प्रमाणे वैशिष्ट्याने जोखण्याची गरज आहे. असंघटीत श्रमाचे वैविध्य पाहता त्याबाबतची धोरणे विकेंद्रीत होत आहेत. जर आपल्या संविधानामध्ये वैधानिक क्षमता स्पष्ट झाली असती तर विकेंद्रीत धोरणाबाबतची कल्पना (वैधानिक किंवा कार्यकारी) ही आपल्या प्रशासनास परकी वाटली नसती.

या लघुनिबंधामध्ये, असंघटन संकल्पना अभ्यासतांना म्हटले आहे की, ही कल्पना कमानीप्रमाणे काम करते जेणेकरुन त्याखाली उभ्या राहणा-या असंख्य कामगारांची स्थिती सुसह्य होते. म्हणूनच गरज आहे ती आपल्याला ही कमान हटवण्याची, व गरज आहे ती त्यांकडे आव्हान म्हणून पाहण्याची. हे करताना या असंघटित कामगारांना या संभाषण प्रक्रियेत सामील करुन घेण्याचीही गरज आहे. ज्यायोगे हे कामगार प्रशासन प्रक्रियेचे भाग होतील. त्यांचे स्वकल्याण साधले जाईल आणि अगदी याच स्वरुपातील प्रशासन आपल्या संविधानास अपेक्षित आहे.

**संदर्भ :**


अलेन सुपिअट, बियाँड एम्प्लॉयमेंट (ऑक्सफर्ड: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस, २००१)

इन्टरनॅशनल लेबर ऑफिस, वीमेन अँड मेन इन द इन्फॉर्मल इकोनॉमी, अ स्टॅटिस्टीकल पिक्चर, दुसरी आवृत्ती (जीनिव्हा:आयएलओ, २००३)

इन्टरनॅशनल लेबर ऑफिस, डिसेंट वर्क अँड द इन्फोर्मल इकोनॉमी, इन्टरनॅशनल लेबर कॉन्फरन्स, ९०वे सत्र, २००२ (जीनिव्हा:आयएलओ, २००२)

इन्टरनॅशनल लेबर ऑफिस, इन्कम्स, एम्प्लॉयमेंट आणि इक्वॅलिटी इन

केनिया (जीनिव्हा:आयएलओ, १९७२)

जोनाथन पॅरी, 'सोशिओलॉजिकल मार्क्सीझम'इन सेंट्रल इंडिया: पोलांयी, ग्राम्स्की अँड द केस ऑफ युनियनस् ' ख्रिस हान अँड केथ हार्ट , मार्केंट अँड सोसायटी -द ग्रेट ट्रान्सफोर्मेशन' (केंब्रिज अँड न्यूयार्क : केंब्रिज विद्यापीठ प्रेस,२००९) १७५- २०२

जोसेफ इ.स्टिगलित्झ, 'फॉरवर्ड' इन पोलांयी, द ग्रेट ट्रान्सफोर्मेशन एँट vii-xvii एँट xv –xvi, तसेच केथ हार्ट अँड ख्रिस हान, ' इन्ट्रोडक्शन लर्निंग
फ्रॉम पोलांयी १' इन हान आणि हार्ट, मार्केट आणि सोसायटी,१-१६

कार्ल पोलांयी , द ग्रेट ट्रान्सफोर्मेशन -द पोलिटिकल अँड इकोनोमिक ओरिजिनस् ऑफ अवर टाईम ( मॅच्युससेट: बिकॉन प्रेस ,२००१)

केथ हार्ट आणि ख्रिस हान केथ हार्ट आणि ख्रिस हान चे इन्ट्रोडक्शन लर्निंग
फ्रॉम पोलांयी १ , मार्केट अँड सोसायटी - द गेट ट्रंस्फोर्मेशन टूडे (केंब्रिज आणि
न्यूयॉर्क:केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, २००९) १-१६, एँट २, ४-५

केथ हार्ट ,' ब्युरोक्रेटिक फोर्म अँड द इन्फोर्मल इकोनॉमी' - बासुदेव गुहा खासनोबिस, रवी कंबूर आणि एलिउर ऑस्ट्रोम , लिंकिंग द फोर्मल आणि एनफोर्मल इकोनॉमी - कन्सेप्टस् आणि पोलिसीज (ऑक्सफर्ड: ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेस, २००६) २१-३५

केथ हार्ट, 'इन्फोर्मल इन्कम
ऑपोर्चुनिटीज आणि अर्बन एम्पोय मेंट इन घाना' ११:१ जर्नल ऑफ मॉर्डन आफ्रिकन स्टडीज (१९७५) ६१-८९

*(**सुप्रिया राऊत-** लेखिका युनिवर्सिटी ऑफ लव्हाल, कॅनडा येथील आंतरविद्यापीठीय संशोधन केंद्रात संशोधिका आहेत. संपर्कासाठी ईमेल-supriyonujs@gmail.com)*

# लेखक / वाचकांसाठी नम्र सूचना

प्रकाशन विभागाच्या 'इंडिया' (इंग्रजी) व 'भारत' (हिंदी) या वार्षिक संदर्भ ग्रंथांच्या प्रती केन्द्रीय सदन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, पिन ४००६१४ येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. या प्रती संग्रही ठेवू इच्छिणाऱ्या लेखक वाचकांनी आपली मागणी myojanadpd@gmail.com या संकेतस्थळावर कृपया नोंदवावी.

# अनौपचारिक क्षेत्राची संकल्पना आणि स्वरूपाचे जागतिक सिंहावलोकन

-अशिमा मुजुमदार



**अनौपचारिक क्षेत्राच्या संकल्पनेचा सैद्धांतिक पाया पन्नास व साठच्या दशकातील अनेक अभ्यासांतून उदयास आला. ज्यामध्ये द्वैत्वाद किंवा दुहेरी अर्थव्यवस्थेचे अस्तित्व हे विकसनशील देशांचे ठळक वैशिष्ट्य असल्याच्या बाबीवर जोर दिला गेला**

**अनौपचारिक क्षेत्राच्या संस्थात्मक इतिहासाचा मागोवा चार टप्प्यांमध्ये घेता येईल. १९७० च्या दशकातील सुरूवातीचा काळ, ज्यात अनौपचारिक क्षेत्राच्या संकल्पनेचा विकास होऊन तिने मूळ धरले, १९८० दशकातील प्रसाराचा काळ ज्यामध्ये या संकल्पनेचा सर्वत्र प्रसार झाला व अनेक कार्यक्रमांमध्ये तिचा समावेश करण्यात आला, १९९० च्या दशकातील अधिकृतीकरणाचा काळ, जेव्हा अनौपचारिक क्षेत्राच्या संकल्पनेला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आणि आंतरराष्ट्रीय अधिकृत योजनेत तिचा समावेश झाला आणि २००० व पुढील विस्ताराचा काळ, ज्यात अनौपचारिक क्षेत्राचा नव्याने अभ्यास करण्यात अर्थतज्ज्ञांचा रस वाढला.**

अनौपचारिक क्षेत्राच्या संकल्पनेचा सैद्धांतिक पाया पन्नास व साठच्या दशकातील अनेक अभ्यासांतून उदयास आला. ज्यामध्ये द्वैत्वाद किंवा दुहेरी अर्थव्यवस्थेचे अस्तित्व हे विकसनशील देशांचे ठळक वैशिष्ट्य असल्याच्या बाबीवर जोर दिला गेला. लुईस, फेई-रॅनिस आणि हॅरिस-टोडॅरो हे त्यातील काही प्रमुख अभ्यासक. त्यातही विकसनशील अर्थव्यवस्थेचे ग्रामीण व नागरी क्षेत्रातील द्विभाजनावर लुईस व फेई-रॅनिस यांनी विचार केला तर हॅरिस-टोडॅरो यांनी नागरी क्षेत्रातच दुभाजनाचा (dichotomisation) विचार केला. १९७० च्या दशकाच्या सुरूवातीला पूर्वीच्या द्वैतवादाच्या सिद्धांताबद्दल नव्याने विचार सुरू झाला. कारण विकसनशील देशांमधील लोकसंख्या वाढ आणि ग्रामीण नागरी विस्थापनामुळे नव्याने येणा-यांना आधुनिक क्षेत्रात सामावून घेणे जड जात असल्याने आधुनिक शहरी अर्थव्यवस्थेसाठीही पूर्वीचा द्वैतवादाचा सिद्धांत विशेषत्वाने लागू करावा, याची तीव्रतेने जाणीव होऊ लागली होती. केनिया, कोलंबिया, श्रीलंका, फिलिपाईन्स आदी देशांमध्ये जागतिक कामगार संघटनेच्या रोजगार मोहीमांमधून बहुसंख्य आर्थिक घडामोडी नियोजित नियामक व्यवस्थेच्या कक्षेबाहेरच होतात, हे समोर आले. केनिया मोहीम ही अशा स्वरूपाची पहिलीच मोहीम होती, ज्यामध्ये पारंपरिक क्षेत्राला चिकाटीने तग धरून राहण्याच्या वैशिष्ट्याला मान्यताच देण्यात आली नाही, तर किफायतशीर व्यापार आणि किरकोळ आर्थिक घडामोडींपर्यंत त्याचा विस्तारही करण्यात आला. (आयएलओ २००२ ए). लहान प्रमाणावरील व अनोंदणीकृत आर्थिक व्यापाराचा पल्ला किती व्यापक आहे, हे दर्शवण्यासाठी मोहीमेने पारंपरिक ऐवजी अनौपचारिक क्षेत्र ही संज्ञा निवडली. एकीकडे कृषी व अन्य आर्थिक व्यापार आणि दुसरीकडे आधुनिक उद्योग व सेवा क्षेत्राची वाढत्या कामगारवर्गाला उत्पन्न व रोजगाराच्या संधी पुरवण्यातील असमर्थता हे अनौपचारिक क्षेत्राच्या अस्तित्वाचे मुख्य कारण मानले गेले. हार्ट यांनी आक्रा, घानामधील शहरी कामगारांसाठी आर्थिक घडामोडींचा अभ्यास करताना दुभाजन सुचवण्याकरिता सर्वप्रथम अनौपचारिक (informal) क्षेत्र ही संज्ञा उपयोगात आणली. हार्ट यांनी 'नियोजित क्षेत्र' (formal sector) ही संज्ञा शहरी आधुनिक क्षेत्रासाठी सदृश्य म्हणून कमीअधिक प्रमाणात वापरली आणि अनौपचारिक क्षेत्र ही शहरी पारंपरिक क्षेत्राच्या कल्पनेचा विस्तार म्हणून समजली गेली. दुभाजनाची ही कल्पना पूर्वीच्या कल्पनेपेक्षा वेगळी या अर्थाने आहे की, दोन्ही क्षेत्रांना आधुनिकतेचा वारसा लाभला असून तिस-या जगातील देशांमधील नागरीकरणाच्या प्रक्रियेचा परिणाम आहे,

जी पारंपरिक ग्रामीण अर्थव्यवस्थेचे आधुनिक औद्योगिक अर्थव्यवस्थेत होणा-या रुपांतराचा निर्देशांक म्हणून भूमिका बजावते. नियोजित आणि अनौपचारिक क्षेत्रातील या द्वैतवादाच्या विश्लेषणावर या अभ्यासांतून प्रकाश टाकला असून विकसनशील देशांमधील नागरी अनौपचारिक क्षेत्राच्या विश्लेषणाने विशेष लक्ष वेधून घेतले आहे. अशा त-हेने अनौपचारिक क्षेत्राच्या संस्थात्मक इतिहासाचा मागोवा चार टप्प्यांमध्ये घेता येईल. १९७० च्या दशकातील सुरूवातीचा काळ, ज्यात अनौपचारिक क्षेत्राच्या संकल्पनेचा विकास होऊन तिने मूळ धरले, १९८० दशकातील प्रसाराचा काळ ज्यामध्ये या संकल्पनेचा सर्वत्र प्रसार झाला व अनेक कार्यक्रमांमध्ये तिचा समावेश करण्यात आला, १९९० च्या दशकातील अधिकृतीकरणाचा काळ, जेव्हा अनौपचारिक क्षेत्राच्या संकल्पनेला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आणि आंतरराष्ट्रीय अधिकृत योजनेत तिचा समावेश झाला आणि २००० व पुढील विस्ताराचा काळ, ज्यात अनौपचारिक क्षेत्राचा नव्याने अभ्यास करण्यात अर्थतज्ज्ञांचा रस वाढला.

विकसनशील व संक्रमणाच्या अवस्थेतील देशांमध्ये अनौपचारिक क्षेत्राची वाढ झपाट्याने झालेली पहायला मिळते. या देशांतील गरीबांसाठी उत्पन्न व रोजगार निर्मितीचे साधन म्हणून या क्षेत्राच्या असलेल्या महत्वाबद्दल फारसे मतभेद नाहीत. अनौपचारिक क्षेत्राच्या अभ्यासाचे वाढते महत्व जागतिक कामगार संघटनेने आपल्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेला सादर केलेल्या अहवालात चांगल्या रीतीने मांडले आहे. त्यात श्रीमती हार्ट म्हणतात की,

*...अलिकडच्या काही वर्षांत, विशेषत: विकसनशील आणि संक्रमणाच्या अवस्थेतील देशांमध्ये रोजगारनिर्मितीचा मोठा वाटा अनौपचारिक क्षेत्राचाच राहिला आहे, कारण बहुतेक लोक नियोजित क्षेत्रात नोकरी मिळवू शकत नाहीत अथवा स्वत:चा व्यवसाय सुरू करू शकण्यास समर्थ नाहीत. (आयएलओ २००२ए)*

या देशांच्या विकास प्रक्रियेत संक्रमणाचा टप्पा म्हणून अनौपचारिक क्षेत्राचे अस्तित्व गृहीत धरले गेले होते, परंतु जशी विकास प्रक्रियेने गती घेतली तसे या क्षेत्राचे अस्तित्व तर राहिलेच पण त्याचा विस्तारही झाल्याचे आढळले. हळूहळू विकसनशील देशांमधील प्रचंड अशा अतिरिक्त मनुष्यबळाच्या साठ्यावर तोडगा म्हणून अनौपचारिक क्षेत्राचा विचार सुरू झाला आहे. त्यातच ''स्ट्रक्चरल ॲडजस्टमेंट प्रोग्राम'' (sap) लागू करण्यात आल्याने या विकसनशील देशांमध्ये रोजगारविरहीत वाढ झाली आहे, कारण सार्वजनिक तसेच खासगी क्षेत्राला आपली स्पर्धात्मकता व किफायतशीरता टिकवून धरण्यासाठी रोजगारक्षमतेचा बळी द्यावा लागतो. याचा परिणाम या अर्थव्यवस्थांमध्ये अनौपचारिक क्षेत्राचे अस्तित्व, विस्तार आणि चिरस्थायित्वामध्ये झाला आहे. यामुळेच, प्रथम अनौपचारिक क्षेत्राचे निरीक्षण व अभ्यास विकसनशील देशांच्या संदर्भात करण्यात आला आणि नंतर विकसित देशांमध्ये या क्षेत्राच्या अभ्यासात रस निर्माण झाला. विकसित देशांमध्येही आज अनौपचारिक क्षेत्राचे अस्तित्व असले तरी त्याच्या दर्जासंदर्भात विकसनशील व विकसित देशांमध्ये मूलभूत मतभेद आहेत. विकसनशील देशांमध्ये अनौपचारिक क्षेत्र हे गरीबांना रोजगार देणारी दुसरी कोणतीही पर्यायी व्यवस्था नसल्याने जिवंत ठेवणारी यंत्रणा म्हणून समजले जाते व विकसित देशामध्ये, संघटित क्षेत्राच्या तुलनेत अधिक स्वायत्तता, लवचिकता व स्वातंत्र्य मिळत असल्याने लोक त्यात प्रवेश करतात. गरीबांचे अस्तित्व टिकवणारे म्हणून कमी विकसित देशांमध्ये अनौपचारिक क्षेत्र विकसित देशांच्या तुलनेत अधिक कामगार केंद्रीत असून कमी उत्पन्न निर्मिती करणारे व कमी भांडवली संचय पुरवणारे आहे. तरीसुद्धा, अलिकडच्या अनौपचारिक क्षेत्रावर झालेल्या काही अभ्यासांमधून असे दिसते की, अनौपचारिक क्षेत्रातील मोठया प्रभावावरील व्यवसाय कार्यक्षम आणि लाभदायी आहेत. अर्थात ही गोष्ट खरी आहे की नाही, हा चर्चेचा विषय होऊ शकतो.(यूएनसीएचएस, २००६) अलिकडच्या काही वर्षांमध्ये, अनौपचारिक क्षेत्राचा एकूण नोक-यांमधील वाटा वाढत आहेच, पण सकल राष्ट्रीय उत्पन्नातही (जीडीपी) या देशांमध्ये त्याचा वाटा वाढतो आहे. उदाहरणासाठी, उत्तर आफ्रिकेत अनौपचारिक क्षेत्रातील व्यवसायांचा अकृषक जीडीपीतील वाटा २७ टक्क्यांवरून सहारा आफ्रिकेत तो ४१ टक्के इतक्या उंचीवर गेला आहे. अनौपचारिक क्षेत्राचे जीडीपीतील योगदान लॅटिन अमेरिकेत २९ टक्के तर आशियात ते ४१ टक्के आहे. कंबोडियात तर जवळपास ८० टक्के

अकृषक जीडीपी अनौपचारिक क्षेत्रातूनच मिळतो . अनौपचारिक क्षेत्राचे अकृषक जीडीपीतील योगदान अत्यंत महत्वाचे आहे, हेच या आकडेवारीवरून दिसते. यामुळे विकसनशील देशांमधील असंघटित क्षेत्राच्या विकासक्षमतेबद्दल अभ्यास करण्यात राज्यकर्ते आणि संशोधकांमध्ये रस निर्माण झाला, कारण हे क्षेत्र अकुशल कामगार आणि स्थानिक उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग करते. रोजगार निर्मिती, उत्पादन आणि उत्पन्न निर्मितीत अनौपचारिक क्षेत्र प्रमुख भूमिका बजावत असल्यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्थेचा महत्वाचा घटक म्हणून ते समजले जाते.

गरीबांना जगवणारा व्यवसाय म्हणून पारंपरिक संकल्पनेपासून आधुनिक काळातील नफा मिळवून देणारा उद्योग म्हणून अनौपचारिक क्षेत्राने केलेल्या प्रवासाने त्याची व्याख्या आणि वैशिष्ट्यांमध्ये विविधता आणली आहे. अनौपचारिक क्षेत्राची व्याख्या, त्याचे व्यावसायिक, स्वरूप आणि आशय यातील विविधतेमुळे ही संज्ञा व तिची मूलगामी कल्पना राज्यकर्ते व संशोधकांनी अशा रीतीने वापरली आहे की, तिचे अनेक अर्थ निर्माण झाले. देश, अर्थव्यवस्था आणि संस्कृती इतकेच नव्हे तर एकाच शहराच्या विविध भागांमध्येही अनौपचारिक क्षेत्रात फरक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक मंडळाने (UNECOSOC) स्वीकारलेल्या आंतरराष्ट्रीय व्याख्येनुसार, अनौपचारिक क्षेत्र ही संज्ञा खालील बाबी सूचित करते. अ) वस्तू आणि सेवांचे उत्पादन व विक्री यांत गुंतलेले सर्व खासगी असमाविष्ट व्यवसाय (असंघटित व्यवसाय) अथवा कुटुंबे पूर्वनिर्धारित किमान मर्यादेपेक्षा कमी रोजगार आकार असलेले व्यवसाय (एनसीईयूएस २००६). ग्रामीण भागात मुख्यत: अनौपचारिक क्षेत्रांत भूमीहीन शेतमजूर, लहान व मध्यम शेतकरी, खंडाने शेती कसणारे, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन व मासेमारीत गुंतलेले व्यावसायिक, ग्रामीण हस्तकलाकार, वनात काम करणारे मजूर, ताडी काढणारे यांचा समावेश होतो तर शहरी भागांत अनौपचारिक क्षेत्र हे मुख्यत: बांधकाम, सुतारकाम, व्यापार, वाहतूक, संदेशवहन तसेच यामध्ये गुंतलेले मजूर तसेच रस्त्यावर माल विकणारे, फेरीवाले, हमाल, कपडे तयार करणारे आदींचे मिळून बनलेले असते. अनौपचारिक क्षेत्र म्हणजे सरकार दरबारी मान्यता अशी व्याख्या आयएलओने केली आहे. या व्यवसायांची वैशिष्ट्ये म्हणजे कुणालाही सहज प्रवेश, देशी साधनसंपत्तीवर अवलंबित्व, व्यवसायाची कुटुंबाकडे मालकी, लहान प्रमाणावरील व्यवसाय, कामगार केंद्रीत आणि तंत्रज्ञानास अनुकूलता, औपचारिक शिक्षण व्यवस्थेच्या बाहेर प्राप्त केलेले कौशल्य आणि कोणतेही नियमन नसलेले व स्पर्धात्मक बाजारपेठ ही सांगता येतील.

(आयएलओ १९७२) अनौपचारिक कामगारांची व्याख्या करतांना त्यात ज्यांचे रोजगारासंदर्भातील मालकाशी नातेसंबंध हे कामगारविषयक कायदे, सामाजिक सुरक्षा आणि नोकरीतून मिळणारे विशिष्ट फायदे यांच्या अधीन नाहीत, त्यांचा समावेश केला जातो. अनौपचारिक अर्थव्यवस्था ही अनौपचारिक कामगार आणि अनौपचारिक क्षेत्र यांची मिळून बनलेली असते. (आयएलओ २००२) डे सोटो (१९८९) यांनी आपल्या द अदर पाथ या ग्रंथात असे म्हटले आहे की, सरकारचा हस्तक्षेप आणि नियमनामुळे नवीन व्यवसायांचा विकास खुंटतो आणि अशा त-हेने वैध आर्थिक ध्येये गाठण्याच्या प्रयत्नात अस्तित्वात असलेल्या कायद्यांचे पालन करण्याची किंमत त्यातून मिळणा-या नफ्यापेक्षा किती तरी जास्त आहे, असे आढळल्यावर भ्रमनिरास झालेल्या व्यावसायिकांचा अखेरचा आसरा अनौपचारिक क्षेत्र ठरते. श्निडर (२००४) यांच्या व्याख्येत अनौपचारिक क्षेत्राबद्दल अधिक वास्तव दृष्टीकोन दिसतो. उत्पन्नकर, मूल्यवर्धित किंवा अन्य कोणत्याही करांची देणी चुकवण्यासाठी, सामाजिक सुरक्षा योगदान टाळण्यासाठी, मजुरीचा दर्जा, किमान वेतन, कामाचे सर्वाधिक तास, सुरक्षा उपाययोजना यांचे मापदंड तसेच विशिष्ट प्रशासकीय प्रक्रियेचे पालन करावे लागू नये, या हेतूने सरकारी अधिकाऱ्यांपासून जाणीवपूर्वक गोपनीय ठेवल्या जाणा-या अशा सर्व बाजारपेठांधारित वस्तू व सेवांच्या कायदेशीर उत्पादनांचे मिळून अनौपचारिक क्षेत्र बनते. या व्याख्येत अनौपचारिक क्षेत्रांतर्गत होणा-या व्यापाराला एकप्रकारे कायदेशीर दर्जा देतांनाच विशिष्ट कामगारविषयक बाजारपेठीय प्रमाणांचे (standard) पालन केले जात नाही, हे ही व्याख्या मान्य करते. या व्यवसायांकडून जी नोंदणी केली जाते, ती मुख्यत: व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक बाबींसंदर्भातच असते, जसे की, व्यवसाय चालवण्याचा परवाना, व्यवसायाचे नाव आणि व्यवसायाच्या ठिकाणाची नोंदणी.

अशा पद्धतीने, हे व्यवसाय अधिकृत नियमांतर्गत चालवण्यात येत असले तरीही ते चालवतांना किंवा उत्पादन प्रक्रियेत लाभाची अधिकृत नोंद करण्यास ते बांधील नसतात.

अनौपचारिक अर्थव्यवस्था ही बारकाईने पाहिली न जाणा-या अर्थव्यवस्थेचा (Non Observed Economy) एक भाग आहे. (ओसीईडी २००२) १९९३ मध्ये एसएनएने (सिस्टीम ऑफ नॅशनल अकाऊंट) एनओईची वर्गवारी भूमीगत, बेकायदा, अनौपचारिक क्षेत्र, स्वत:च्या अंतिम उपभोगासाठी तयार केलेले घरगुती उत्पादन, प्राथमिक आकड़ेवारी गोळा करण्याच्या कार्यक्रमातील उणीवांमुळे नजरेतून निसटलेल्या व्यावसायिक घडामोडी, अशी केली आहे. १५ व्या आंतरराष्ट्रीय कामगार सांख्यिकी परिषदेत (ICLS) केलेल्या ठरावानुसार अनौपचारिक क्षेत्राची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. अनौपचारिक क्षेत्र म्हणजे ज्यातील व्यवसायांत वस्तू व सेवांचे उत्पादन संबंधित लोकांना रोजगार व उत्पन्नाचे साधन मिळवून देण्याच्या प्राथमिक उद्दिष्टाने केले जाणारे क्षेत्र, असे ढोबळमानाने सांगता येईल. कंपनी या नात्याने खालच्या पातळीवर हे व्यवसाय चालतात आणि उत्पादनाचे घटक म्हणून कामगार व भांडवल यांच्यात विभागणी नसते किंवा अगदीच थोडी असून लहान प्रमाणावर असतात. ज्या ठिकाणी कामगार व मालक यांच्यात संबंध असतात, तेथे ते सहजपणे घडून आलेले अथवा वैयक्तिक अथवा सामाजिक नातेसंबंधांवर आधारित असून औपचारिक हमी देणा-या करारांवर स्थापित झालेले नसतात.(ओईसीडी २००२) अनौपचारिक क्षेत्रात समाविष्ट करावयाच्या व्यापारी घडामोडीं, त्यांचे आर्थिक वर्तन आणि विश्लेषणासाठी आवश्यक आकडेवारीत एकजिनसीपणा आणणे हा त्या परिषदेचा उद्देश्य होता. यासाठी आणखी निकष लावण्यात आले, जसे की १) व्यवसायाला काही किमान बाजारपेठीय उत्पादन असावे, अशा त-हेने जे व्यवसाय फक्त स्वत:च्या अंतिम उपभोगासाठी वस्तू व सेवांचे उत्पादन करतात, ते आणि विनावेतन केले जाणारे घरगुती काम त्यातून आपोआपच वगळले गेले (आयएलओ २००२बी) २. व्यवसायाने एक किंवा एकापेक्षा अधिक निकष पूर्ण केले पाहिजे; सातत्याने कामावर असणारे कामगार अथवा नोकरीत असलेल्या कर्मचा-यांच्या निर्दिष्ट संख्येपैकी कमी संख्येने कामगार असले पाहिजेत, फॅक्टरी कायदा, व्यावसायिक कायदे, इतर कर अथवा सामाजिक सुरक्षा कायदे, व्यावसायिक गट नियामक कायदे अथवा राष्ट्रीय वैधानिक संस्थांनी तयार केलेले तत्सम कायदे, नियम अशा कोणत्याही राष्ट्रीय विधेयकाच्या स्वरूपाच्या कायद्यांतर्गत व्यवसायाची नोंदणी झालेली नसावी ३.) रोजगार अथवा शिकाऊ उमेदवारीबाबत करारांच्या संदर्भात, ज्याद्वारे कर्मचाऱ्यांच्या वतीने काही महत्वाचे कर अथवा सामाजिक सुरक्षा योगदान देणे कंपनीला बंधनकारक केले आहे किंवा कंपनी-कामगार संबंध अधीन असलेल्या प्रमाण कामगार कायद्यांतर्गत व्यवसायातील कामगारांची नोंदणी झालेली नसावी. अनियोजित क्षेत्रातील उत्पादन करणा-या कारखान्यांचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे घरगुती व्यवसाय असते, ज्यात संपूर्ण जमाखर्चाची नोंद गायब असते. अचल व इतर मालमत्ता ही कारखान्यांच्या मालकीची नसते तर त्यांच्या मालकांच्या नावे असते. त्यामुळे हे कारखाने स्वत:च्या वतीने अन्य कारखान्यांशी व्यवहार अथवा करार करू शकत नाहीत किंवा कर्ज घेऊ शकत नाहीत. आवश्यक अर्थपुरवठा हा व्यवसायाच्या मालकानेच स्वत:च्या जोखमीवर करायचा असतो आणि उत्पादन प्रक्रियेत ओढवलेले कर्ज अथवा दायित्वासाठी तो व्यक्तिगत जबाबदार असतो. उत्पादनासाठीचा खर्च हा घरगुती खर्चातून वेगळा ओळखता येण्याजोगा नसतो. त्याचप्रमाणे, इमारत अथवा वाहनांचा खर्च हा ही व्यवसायासाठी किंवा घरगुती, असा वेगळा करता येत नाही. शेतीमधील काही कृती या निव्वळ निर्वाहासाठी केल्या जातात तर अन्य कृती या कृषी उत्पादनांच्या बाजारातील विक्रीसाठी केल्या जातात. बहुतांश देशांत मोठे अनौपचारिक क्षेत्र म्हणून कृषी महत्वपूर्ण असले तरी आयसीएलएसने भारतात कृषीला अनौपचारिक क्षेत्राच्या मोजणीच्या कक्षेतून वगळण्याची शिफारस केली आहे. (यूएन-इएससीडब्ल्यूए २००८) कोणत्याही देशात अनौपचारिक क्षेत्राची निश्चित व्याख्येची रचना करण्यासाठी हे निकष एक चौकट पुरवतात. वेगवेगळ्या देशांमध्ये या निकषांतून अनौपचारिक क्षेत्राची अगदी समान व्याख्या निपजेल, असे मात्र स्पष्टपणे सांगता येणार नाही. वरील निकष वेगवेगळ्या संयोगातून लागू करावे लागतील, राष्ट्रीय कायदे, कामगारांच्या किमान संख्येबाबत वेगळे

नियम असतील, त्यांच्या मापनाची पद्धत वेगळी असेल.

१५ व्या कामगार परिषदेच्या ठरावाने देशांना अनौपचारिक क्षेत्राची निश्चिती आणि मापन करतांना लक्षणीय लवचिकता प्रदान केली आहे. (ओईसीडी २००२) मात्र लवचिकतेमुळे आंतरराष्ट्रीय तुलनात्मकता कमी झाली आहे. आंतरराष्ट्रीय तुलनात्मकतेसाठी सध्या उपयोगात असलेल्या राष्ट्रीय व्याख्यांच्या महत्तम साधारण विभाजकावर (common denominator) आधारित अशी संकुचित व्याख्या आवश्यक होती. (यूएनइएससीएपी २००७) या प्रश्नावर विचार करण्यासाठी १९९७ मध्ये सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय तज्ञांचा एक गट, ज्याला साधारणपणे दिल्ली गट म्हणून ओळखले जाते, स्थापन करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सांख्यिकी विभागाला (यूएनएसडी) अहवाल देणा-या अनेक गटांपैकी तो एक होता. तेव्हापासून या गटाने सदस्य देशांमधील अनौपचारिक क्षेत्राचे मापन करतांना आलेल्या अनुभवांची देवाणघेवाण करण्यासाठी, सदस्य देशांनी राबवलेल्या सर्वेक्षण व आकडेवारी गोळा करण्याच्या पद्धतीच्या दस्तऐवजीकरणासाठी, अनौपचारिक क्षेत्राच्या आकडेवारीचा दर्जा व तुलनात्मकतेत सुधारणा करण्याच्या दृष्टीने शिफारसी सुचवण्यासाठी नियमित बैठका घेतल्या आहेत. आंतरराष्ट्रीय व्याख्येने निश्चित केलेल्या चौकटीनुसार अनौपचारिक क्षेत्राच्या विविध व्याख्यांमध्ये मेळ घालण्यासाठी दिल्ली गटाने प्रयत्न केले आहेत. दिल्ली गटाच्या तिस-या बैठकीत या मुद्यावर सखोल चर्चा होऊन खालील शिफारसींना मान्यता देण्यात आली.

विविध देशांमध्ये अनौपचारिक क्षेत्राचे वेगवेगळे आविष्कार असल्याने, अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या व्याख्यांचा संपूर्ण मेळ घालणे सध्या शक्य नाही. देशांच्या राष्ट्रीय व्याख्यांनुसार आंतरराष्ट्रीय संस्थांनी अनौपचारिक अर्थव्यवस्थेची आकडेवारी प्रसारित केली पाहिजे. अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या आकडेवारीची आंतरराष्ट्रीय तौलनिकता वाढवण्यासाठी, अनौपचारिक अर्थव्यवस्थेच्या उपसंचाबाबतही त्यांनी आकडेवारी प्रसारित केली पाहिजे, ज्याची समान रुपात निश्चिती करता येऊ शकेल. तरीसुद्धा, दिल्ली गटाने मंजूर केलेल्या ठरावात ज्या उपसंचाची शिफारस केली आहे, त्यात अनौपचारिक क्षेत्राच्या तुलनेने लहान घटकांचा अंतर्भाव केला असून भविष्यात त्याची व्याप्ती वाढवण्याचे प्रयत्न करण्याची गरज आहे, असेही गटाने मान्य केले आहे. (ओईसीडी २००२) दिल्ली गटाने अनौपचारिक क्षेत्राला लागू करण्यासाठी अतिरिक्त निकषांसह तीन अत्यावश्यक निकष सुचवले आहेत- पाचपेक्षा कमी पगारी कर्मचारी असलेले व्यवसाय, उत्पादक व्यवसायांची नोंदणी नसावी आणि पगारी घरगुती नोकर असलेल्या कुटुंबांना वगळणे, हे ते तीन निकष अनौपचारिक क्षेत्राची सर्वसमावेशक व्याख्या तयार करण्यासाठी आहेत.

अनौपचारिक क्षेत्राची आकडेवारी विकसित करण्यासाठी विविध देशांना मार्गदर्शन करण्यासाठी तांत्रिक नियमावली तयार करण्यातही दिल्ली गट अग्रणी संस्था ठरली आहे. या अगोदर अनौपचारिक क्षेत्राची आकडेवारी गोळा करण्याकडे फारच कमी लक्ष दिले जाई. पण या अनौपचारिक क्षेत्राचे महत्व जसे वाढू लागले तसे, चार दशकांत अनौपचारिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात संशोधन आणि आकडेवारी गोळा करण्यासह त्याच्या संकल्पनेतही सुधारणा झाली. २००५ मध्ये दिल्ली गट आणि आयएलओने अनौपचारिक क्षेत्राच्या बाहेरील अनौपचारिक रोजगारांचा समावेश करण्यासाठी नियमावली तयार करण्यासाठी सहकार्य करण्यास मान्यता दिली आहे. तरीसुद्धा, अनौपचारिक क्षेत्राबाबतची आकडेवारी अजूनही अपुरीच आहे. अंशत: अनौपचारिक क्षेत्राच्या सार्वत्रिक व्याख्येचा अभाव आणि मुळातच अनौपचारिक क्षेत्राची वारसाहक्काने आलेली विविधता, यामुळे हे घडले आहे. विविध प्रकारच्या व्यावसायिक घडामोडी, विविध स्वरूपाचे व्यवसाय आणि त्यातील सहभागाचे वेगवेगळे हेतू त्यात समाविष्ट असल्यामुळे आकडेवारी गोळा करणे आणखीच कठीण होऊन बसते. विकसनशील देशांमध्ये अनौपचारिक क्षेत्र हे नोकरी व उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्यामुळे अनौपचारिक क्षेत्रावरील आकडेवारी विकसित करणे तेथे विशेषत्वाने महत्वाचे आहे. असंघटित व्यवसाय आणि असंघटित कामगार यांबाबत आकडेवारीतील प्रमुख त्रुटी निश्चित करून असंघटित क्षेत्राच्या प्रमाण संकल्पना, व्याख्या, कार्यक्षेत्र आणि तुलनात्मकता यावर सांख्यिकी आकडेवारी विकसित करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाने २०१० मध्ये एक समिती स्थापन केली. (एनएससी २०१२) या समितीने असे नमूद केले आहे की, आयएलओच्या चौकटीनुसार परिणामकारक आकडेवारीची व्यवस्था अंमलात आणण्यासाठीच्या संकल्पना, व्याख्या आणि कार्यकक्षेसंदर्भात, सध्या अस्तित्वात असलेल्या आकडेवारी

जमवण्याच्या यंत्रणेतील तफावतींमुळे मुख्यत: भारतातील अनौपचारिक क्षेत्रातील रोजगार व व्यवसायांवरील माहितीत असंख्य त्रुटी आहेत. अर्थव्यवस्थेच्या या महत्वाच्या विभागाची कामकाज पध्द्ती समजून घेण्यासाठी या उणीवा कमी करून अनौपचारिक क्षेत्राच्या महत्वाच्या पैलूंबाबत पुरेशी, तुलनात्मक आणि त्याच वेळेस विश्वासार्ह आकडेवारी गोळा करणे ही काळाची गरज आहे, ज्याचा फायदा भविष्यात अनौपचारिक क्षेत्राबाबत धोरणे आखून त्यांची अंमलबजावणी करण्यास सहाय्य होईल.

**संदर्भ:**


- डे सोटो (१९८९) द अदर पाथ, आय बी तौरस, लंडन.
- आयएलओ, १९७२ . एम्प्लॉयमेंट, इन्कम्स अँड इक्वॅलिटी: अस्ट्रेजी फॉर इक्रीजिंग प्रॉडक्टिव्ह एम्प्लॉयमेंट इन केनिया. जिनिव्हा: इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन
- आयएलओ (२००२ ए) डिसेंट वर्क अँड इनफॉर्मल इकॉनॉमी रिपोर्ट ६ जिनिव्हा: इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन, ९० वे सत्र
- आयएलओ (२००२ बी) वुमेन अँड मेन इन इनफॉर्मल इकॉनॉमी, अ स्टॅटिस्टिकल पिक्चर, जिनिव्हा: इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन
- एनएससी (२०१२) रिपोर्ट ऑफ द कमिटी ऑन अनऑर्गनाईज्ड सेक्टर स्टॅटिस्टिक्स, भारतीय सांख्यिकी आयोग, भारत सरकार
- एनसीईयूएस (२००६) सोशल सिक्युरिटी फॉर द अनऑ र्गनाईज्ड सेक्टर, रिपोर्ट, नॅशनल कमिशन फॉर एन्टरप्रायझेस इन द अनऑर्गनाईज्ड सेक्टर, नवी दिल्ली.
- ओईसीडी (२००२) मेजरिंग द नॉन ऑब्झर्व्हड इकॉनॉमी - ए हँडबुक. फ्रान्स: ओईसीडी पब्लिकेशन्स
- श्निडर, एफ (२००४) द साईझ ऑफ द शॅडो इकॉनॉमीज ऑफ १४५ कंट्रीज ऑल ओव्हर द वर्ल्ड, फर्स्ट रिझल्ट्स ओव्हर द इयर १९९९ टु २००३. आयझेडए प्रबंध क्र.१४३१. <http://ssrn.com/abstract=636661>.
- यूएनसीएचएस (२००६) सपोर्टिंग द इन्फॉर्मल सेक्टर इन लो इनकम सेटलमेंट्स, यूएनएचएबीआयटीएटी, नैरोबी
- यूएनइएससीडब्ल्यूए (२००६) १९९३ एसएनए अपडेटिंग इश्यू ३२ इन्फॉर्मल सेक्टर, वर्कशॉप ऑन नॅशनल अकाऊंट्स, कायरो
- यूएनइएससीडब्ल्यूए (२००८) मेझरिंग इन्फॉर्मल सेक्टर अँड इन्फॉर्मल एम्प्लॉयमेंट, नॅशनल वर्कशॉप ऑन एम्प्लॉयमेंट अँड इन्फॉर्मल सेक्टर, डेटा कलेक्शन, अम्मान.



*(**अशिमा मजुमदार**- लेखिका नॉर्थ गुवाहाटी कॉलेज, आसाम येथे सहाय्यक प्राध्यापिका आहेत. तसेच असंघटित कामगार, असंघटित व्यापार क्षेत्र व असंघटित क्षेत्राची सामाजिक सुरक्षितता या विषयांवर त्यांनी विशेष संशोधन व लेखन केले आहे. संपर्कासाठी **ईमेल**- Ashimamajumdar011@gmail.com)*



## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. व्हर्ल्ड ऑफ थिन फिल्म कोटिंग्स (इंग्रजी)
₹ ९०/-

२. तिलक का मुकदमा (हिंदी)
₹ ३३५/-

३. राजभाषा (हिंदी)
₹ १००/-

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. एक देश एक हृदय (हिंदी)

२. उपभोक्ता संगरक्षण (हिंदी)

३. परियावरण संगरक्षण : चुनौतिया और समाधान

# असंघटित क्षेत्र आणि असंघटित क्षेत्रातील कामगार एक अध्ययन

-प्रा. नितिन ज्ञानदेव चौधरी




**भारतीय अर्थव्यवस्था जगातील तिस-या क्रमांकाची अर्थव्यवस्था असल्याने विकासाबरोबरचं भारताच्या मूलभूत बाबीं जसे असंघटित क्षेत्र व असंघटित क्षेत्रातील कामगारांवर लक्ष देणे आवश्यक होते. असंघटित क्षेत्राची व्याप्ती, या अतंर्गत येणारे उद्योग, त्यामधिल कामगारांच्या समस्या, त्यांची सुरक्षितता व त्यावरील उपाय, कायद्यांतर्गत देता येणारी तरतूद या सर्व बाबी प्रा. नितिन चौधरी यांनी निदर्शनास आणल्या आहेत.**

एप्रिल २०१४ मध्ये प्रकाशित जागतिक बँकेच्या अहवालानुसार, वर्ष २०११ च्या विश्लेषणाच्या आधारावर, भारतीय अर्थव्यवस्था जगातील तिस-या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था असे निष्कर्षप्रत आहे. १९९१ पासून भारताचा आर्थिक विकास जलद गतीने होऊ लागला. भारताने उदारीकरणे व आर्थिक सुधारणा विषयक धोरण स्विकारल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक पातळीवर एक आर्थिक महासत्ता म्हणून समोर येऊ लागली. परंतु भारताच्या मूलभूत ढाच्यामध्ये अपेक्षित प्रगती न होऊ शकल्यामुळे एक मोठा वर्ग विकासापासून खूप दूर राहिलेला आहे.

भारत आणि विकसनशील देशातील काम करणा-या श्रमिकांपैकी एक मोठा वर्ग असंघटीत अथवा अनौपचारिक क्षेत्रात काम करतो. या क्षेत्राचे अध्ययन अर्थशास्त्रातच नव्हे तर समाजशास्त्र व मानववंशशास्त्रात केले जाते. **सर्व प्रथम 'असंघटीत कामगार असा शब्द प्रयोग' केथ हार्ट यांनी १९७१ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेमार्फत आयोजित केलेल्या परिषदेमध्ये करण्यात आला. घानामधील अनौपचारिक उत्पन्न संधी आणि शहरी रोजगार'' मध्ये प्रकाशित केला.**

'असंघटित क्षेत्र' या संकल्पनेबाबत अनेक तज्ञांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. त्यामुळे या संकल्पनेबाबत अस्पष्टता दिसून येते. एकुण रोजगारापैकी एकुण कामगारांमधून संघटित क्षेत्रातील कामगार वजा केल्यास उर्वारीत कामगारांना असंघटित क्षेत्र कामगार म्हणतात हाच असंघटित रोजगार होय. ही व्याख्या महानिर्देशक रोजगार आणि प्रशिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. तरी खालील विविध संस्थांनी असंघटीत क्षेत्राचा अर्थ पुढील प्रमाणे स्पष्ट केलेला दिसून येतो.

१. **केंद्रिय सांख्यिकीय संघटन:** असंघटित क्षेत्र हा एक असा उद्योग आहे की ज्यामध्ये शक्ती स्त्रोतांचा वापर होत असतांना १० पेक्षा अधिक श्रमिक काम करीत नाहीत. तसेच शक्ती स्त्रोतांचा वापर होत नसतांना २० पेक्षा अधिक श्रमिक काम करीत नाहीत. वरील उद्योगात काम करणारे श्रमिक कोणत्याही कायद्याच्या बंधनात जसे औद्योगिक संघर्ष अधिनियम १९४८, मध्ये येत नाहीत. राष्ट्रीय लेखाकार प्रणाली नुसार हे श्रमिक कुटुंबाधारीत व्यवसाय करणारे असतात.

२. **राष्ट्रीय आयोग:** असंघटित क्षेत्रात खाजगी अनियमित क्षेत्रातील सर्व उद्योगांचा समावेश होतो ज्यांचा मालकी हक्क व्यक्ती किंवा

कुटुंबाकडे असतो. आणि जी एक व्यक्ती मालकी किंवा भागीदारीच्या आधारावर वस्तू व सेवांचे उत्पादन व विक्रीचे कार्य करते आणि यामध्ये १० पेक्षा कमी श्रमिक कार्य करतात.

३. **असंघटित किंवा अनौपचारिक रोजगार - राष्ट्रीय आयोग: असंघटित श्रमिकांमध्ये त्या सर्व श्रमिकांचा समावेश होतो जे असंघटित उद्योगात किंवा कुटुंबात कार्य करतात. यात अशा कामगारांचाही समावेश होतो की, ज्यांना सामाजिक सुरक्षा प्राप्त नाही, आणि यात त्या श्रमिकांचा समावेश होतो ज्यांचा समावेश संघटित क्षेत्रात आहे पण संयोजकाद्वारे त्यांना नियमित वेतन दिले जाते, पण सामाजिक सुरक्षा व सामाजिक कल्याणाचे कोणतेही लाभ त्यांना प्राप्त होत नाहीत त्यापासून त्यांना वंचित राहावे लागते.**

**असंघटित क्षेत्राची व्याप्ती:**

राष्ट्रीय आयोगाद्वारे असंघटित क्षेत्राची व्याप्ती व्यक्त करतांना जानेवारी २००५ मध्ये भारतात एकूण रोजगार हा ४५.८ कोटी होता. यापैकी ३९.५ कोटी रोजगार हा असंघटित क्षेत्रातील होता. जो २००४-०५ मधील एकूण श्रमिकांच्या ८६% होता. तर राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या ६८ व्या फेरीनुसार २०११-१२ मध्ये भारतात एकूण रोजगार ४७.२ कोटी होता यापैकी ९४ % (४४.४ कोटी) रोजगार असंघटित क्षेत्रातील होता. ज्या उद्योगात १० पेक्षा कमी कामगार काम करतात तसेच त्यांना सामाजिक सुरक्षाही प्राप्त होत नाही असे उद्योग असंघटित क्षेत्रात येतात.

**कोष्टक क्र. १- २००४-०५ मधील एकूण रोजगार क्षेत्राअनुसार (कोटी मध्ये)**

| | असंघटित क्षेत्र | संघटित क्षेत्र | एकूण |
|---|---|---|---|
| असंघटित क्षेत्र | ३९.३५ (९९.६) | ०.१४ (०.४) | ३९.४९ (१००) |
| संघटित क्षेत्र | २.९१ (४६.६) | ३.३५ (५३.४) | ६.२६ (१००) |
| एकूण | ४२.२६ (९२.४) | ३.४९ (७.६) | ४५.७५ (१००) |

स्त्रोत: राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००४-०५ रोजगार व बेरोजगारी सर्वेक्षण (कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात)

वरील सारणी वरून असे लक्षात येते की, २००४-०५ मध्ये संघटित क्षेत्रातील एकूण रोजगार ६.२६ कोटी होता. त्यापैकी २.९१ कोटी (४६.६) श्रमिक हे असंघटित क्षेत्रातील होते. सामाजिक सुरक्षेचा विचार केल्यास ३९.५ कोटी असंघटित श्रमिकांपैकी ०.१४ कोटी (०.४) श्रमिकांना सामाजिक सुरक्षा प्राप्त झाली होती. म्हणूनच त्यांना संघटित श्रमिकांमध्ये वगीकृत करण्यात आले आहे.

**असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे वर्गीकरण:**

असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचे वर्गीकरण मजुरी प्राप्त श्रमिक व स्वयंरोजगार प्राप्त श्रमिक असे करण्यात येते.

१. **मजुरी प्राप्त श्रमिक:** असंघटित क्षेत्रातील मजुरी प्राप्त श्रमिकांमध्ये अशा श्रमिकांचा समावेश होतो ज्यामध्ये उद्योजक श्रमिकांना प्रत्यक्ष स्वरूपात ठेकादारांच्या माध्यमां द्वारेकामाच्या मोबदल्यात मजुरी देतात. यात मुख्यत: आकस्मिक किंवा अस्थायी श्रमिकांचा समावेश होतो. जसे घरगुती कामगार, सफाई कामगार इत्यादी. असंघटित श्रमिकांमध्ये नियमित श्रमिकांचाही समावेश होतो.

२. **असंघटित क्षेत्रातील स्वयंरोजगार प्राप्त श्रमिक:** 'हे श्रमिक प्रामुख्याने कृषी किंवा गैर कृषी उद्योगात काम करणारे श्रमिक असतात. तसेच स्वत:चा वैयक्तिक व्यवसाय करुन उत्पादित मालाची विक्री करणाऱ्या श्रमिक वर्गाचा यात समावेश होतो. यात गृहव्यवसाय करणारे श्रमिकही असतात जे कोणत्याही मजुरीविना काम करतात.

या दोन्ही वर्गातील श्रमिकांना समाजातील विविध समस्यांना सामोरे जावे लागते. मजुरीप्राप्त श्रमिक संघटित क्षेत्रातील स्वयंरोजगार प्राप्त श्रमिक यांना प्रामुख्याने दोन प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागते. पहिली नोकरीची किंवा रोजगाराची असुरक्षितता व दुसरी समाजिक असुरक्षितता किंवा दोन्ही. असंघटित क्षेत्रात नियमित श्रमिक ते होत जे दुस-या करिता काम करतात त्यासाठी त्यांना नियमित मजुरी प्राप्त होते. त्यांना

त्यांच्या अडचणी प्रसंगी सामाजिक सुरक्षा प्राप्त होत नाही. तसेच अस्थायी श्रमिकांना असुरक्षित नोकरी व सामाजिक असुरक्षा या दोन्ही अडचणींना सामोरे जावे लागते.

कोष्टक क्र. २- उद्योग व स्थिती नुसार संघटित व असंघटित क्षेत्रातील श्रमिक

| | कृषी | | | गैर कृषी | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संघटित | असंघटित | एकूण | संघटित | असंघटित | एकूण | संघटित | असंघटित | एकूण |
| श्रमिकांची संख्या लाखात | | | | | | | | | |
| स्वयंरोजगार | २३ (३८.१) | १६३९ (६४.८) | १६६२ (६४.२) | २९ (५.१) | ८९२ (६२.८) | ९२१ (४६.४) | ५२ (८.३) | २५३१ (६४.१) | २५८२ (५६.५) |
| नियमित श्रमिक | १३ (२०.१) | १५ (०.६) | २८ (१.१) | ४१९ (७४.३) | २४८ (१७.४) | ६६७ (३३.६) | ४३२ (६९) | २६४ (६.७) | ६९५ (१५.२) |
| आकस्मिक श्रमिक | १५ (४१.८) | ८७४ (३४.६) | ८८९ (३४.७) | ११७ (२०.७) | २८१ (१९.८) | ३९८ (२०) | १४२ (२२.७) | ११५५ (२९.२) | १२९७ (२८.३) |
| एकूण | ६१ (१००) | २५२८ (१००) | २५८९ (१००) | ५६५ (१००) | १४२१ (१००) | १९८५ (१००) | ६२६ (१००) | ३९४९ (१००) | ४५७५ (१००) |
| एकूणचे प्रतिशत | २.४ | ९७.६ | १०० | २८.४ | ७१.६ | १०० | १३.७ | ८६.३ | १०० |

**स्त्रोत**: राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण २००४-०५ रोजगार व बेरोजगारी सर्वेक्षण (कंसातील आकडे प्रतिशत प्रमाण दर्शवितात)

वरील कोष्टकावरून लक्षात येते की, एकूण ४५७५ लाख श्रमिकांमध्ये स्वयंरोजगार प्राप्त श्रमिकांचे प्रमाण ५६.५ प्रतिशत होते. आणि आकस्मिक श्रमिकांचे प्रमाण २८.३ टक्के होते. या दोन्ही दुर्बल वर्गाचे प्रमाण विचारात घेतल्यास ते ८५ टक्के होते. इतर १५ टक्के श्रमिक हे नियमित श्रमिक होते.

असंघटित क्षेत्रातील एकूण ३९४९ श्रमिकांपैकी स्वयंरोजगार प्राप्त श्रमिकांचे प्रमाण ६४ टक्के होते आणि आकस्मिक श्रमिकांचे प्रमाण २९ टक्के होते. वरील दोन्ही दुर्बल घटकांचे प्रमाण सरासरी ९३ टक्के होते तर नियमित श्रमिकांचे प्रमाण फक्त ७ टक्के होते. यावरून असंघटित क्षेत्रातील श्रमिकांची दयनीय अवस्था दिसून येते. याउलट संघटित क्षेत्राची स्थिती चांगली दिसून येते, जेथे ६९ टक्के नियमित श्रमिक आहेत तर ३१ टक्के स्वयंरोजगार प्राप्त व आकस्मिक श्रमिक आहेत व त्यांना सामाजिक सुरक्षा तसेच नोकरीची सुरक्षा प्राप्त आहे.

गैर कृषी उद्योगांपेक्षा कृषी क्षेत्राची स्थिती फार भयावह असलेली दिसून येते. कृषी क्षेत्रात ९९ टक्के श्रमिक स्वयंरोजगार व आकस्मिक होते. आणि फक्त १ टक्का श्रमिक नियमित होते. कृषी मध्ये असंघटित क्षेत्रात ९९.४ टक्के श्रमिक स्वयंरोजगार व आकस्मिक श्रमिक होते ज्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा प्राप्त नव्हती, परंतु गैर कृषी क्षेत्रात हे प्रमाण ८३ टक्के होते. भारतात २००८-०९ मध्ये असंघटित क्षेत्रात कृषी क्षेत्रात ९८ टक्के, सेवा क्षेत्रात ७२ टक्के तर उद्योग क्षेत्रात ७५ टक्के श्रमिक हे असंघटित क्षेत्रात कार्यरत होते.

भारतातील श्रम मंत्रालयाद्वारे असंघटित क्षेत्राचे चार वर्गामध्ये विभाजन करण्यात आले आहे.

१. व्यवसायानुसार विभागणी: यामध्ये लहान मोठे शेतकरी, भूमिहीन मजूर, कोळी व्यवसाय, चर्मकार, बांधकाम आणि निर्माणी कामगार, कलाकार, मीठ कामगार इत्यादी येतात.
२. रोजगाराच्या स्वरूपानुसार: यामध्ये कृषी श्रमिक, करारबध्द श्रमिक, कंत्राटी श्रमिक, स्थानांतरीत श्रमिक, किरकोळ काम करणाध्या श्रमिकांचा समावेश होतो.
३. विशेष श्रेणीनुसार: टॉडी टॅपर्स, रस्ता

साफ करणारे, डोक्यावर ओझे वाहणारे, अवजड वाहन चालक इत्यादी यामध्ये येतात.

४. सेवा श्रेणी: प्रसाविका दाई, घरकाम करणारे, कोळी व कोळणी, न्हावी, फळभाज्या विक्रेते, पेपर विक्रेते इत्यादी.

**असंघटित क्षेत्राची वैशिष्ट्ये :**

औपचारिक क्षेत्रातील उत्पादकतेच्या तुलनेत अनौपचारिक क्षेत्रातील **उत्पादकता ही फार कमी असते**. एकूण श्रमिकांमध्ये यांचा वाटा ९४ टक्के असूनही औपचारिक क्षेत्रापेक्षा यांची उत्पादकता कमी असल्याचे दिसून येते.

**असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांकरिता कोणत्याही प्रकारे वेतन निश्चितीचे धोरण अस्तित्वात नसल्याने त्यांना संघटित क्षेत्रातील कामगारांपेक्षा मिळणारे वेतन नक्कीच कमी असते**. याचा परिणाम त्यांच्या राहणीमान व कार्य कौशल्यावर पडतो.

त्याच प्रकारे **असंघटित क्षेत्रात काम करणा-या कामगारांचे कामाचे क्षेत्र हे मर्यादित स्वरूपाचे असते**. तेथील वातावरणाचा त्यांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. त्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक सुरक्षा मिळत नसल्याने त्याचा त्यांच्यावर विपरित परिणाम होतो.

असंघटित क्षेत्रातील कामगार अनेक उद्योग व्यवसायामध्ये ऋतुमानानुसार त्यांना काम प्राप्त होते मात्र जसे शेतमजूर त्यांना इतर कालावधीमध्ये बेकार रहावे लागते. **म्हणजेच मौसमी बेकारीचा यांना सामना करावा लागतो**.

असंघटित क्षेत्रातील कामगारांना अनेक व्यवसायात शिक्षणाची अट नसते. त्यामुळे त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा होऊ शकत नाही. त्याचा पिढीजात परिणाम होतांना दिसतो. तसेच त्यांना कामाचे कौशल्य व प्रशिक्षण आधुनिक तंत्राच्या वापराबाबत प्रशिक्षण इत्यादी प्राप्त करून दिले जात नाही. **परंपरागत पध्दतीनेच त्यांना कामे करावी लागतात**.

तसेच असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांकरिता कोणत्याही प्रकारच्या कामाची नियमावली नसल्याने कामचुकारपणा केल्यास कोणत्याही प्रकारच्या दंडाची व्यवस्था नसते.

**असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्या :**

भारतात श्रमिकांच्या कल्याणाकरिता अनेक कायदे आहेत परंतु असंघटित क्षेत्रात काम करण्याकरिता या कायद्यांची अंमलबजावणी करणे कठीण जाते. कारण यात घरकाम करणारे, बालमजुर, यांच्या बाबत कायद्यांची अंमलबजावणी सक्तीने केली जात नाही. त्यामुळे **असंघटित क्षेत्रात श्रमिकांच्या हितासाठी कायद्याची चौकट अपुरी पडते**.

श्रमिकांना काम करतांना त्यांच्या सामाजिक सुरक्षा प्राप्त होणे गरजेचे आहे. जेणे करून काम करतांना प्रोत्साहन मिळविण्यासाठी त्यांना सामाजिक सुरक्षा आवश्यक आहे. परंतु **असंघटित क्षेत्रात श्रमिकांना सामाजिक सुरक्षा प्राप्त होत नाही**.

**असंघटित क्षेत्रातील श्रमिकांना न्यूनतम उत्पन्नाची शाश्वती नसते. त्यामुळे त्याचा परिणाम सरळ त्यांच्या कार्यक्षमतेवर पडतो**.

**असंघटित क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बालश्रमिक दिसून येतात**. शेतमजूर, किराणा दुकानात, चहाच्या टपरीवर अशा अनेक व्यवसायात देशाच्या भविष्याचा म्हणजेच बालश्रमिकांचे मोठ्या प्रामाणात शोषण होते. याचा परिणाम नक्कीच देशाच्या विकासावर होतो.

**या क्षेत्रात स्त्रियांना मोठ्या प्रमाणात सामाजिक सुरक्षेच्या अभावाचा सामना करावा लागतो**. स्त्रियांचे होणारे शोषण, कामाचे अधिक तास, न्युन मजुरीदर, अत्याचार इत्यादीसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते.

**निरक्षरता हे असंघटित क्षेत्रातील कामगारांचा अडसर म्हणता येईल, त्यामुळे त्यांच्या कौशल्यात वाढ होतांना अडचणी निर्माण होतांना व त्यांना कमीत कमी वेतनावर मोठ्या प्रमाणात शारीरिक श्रम करावे लागते**.

असंघटित क्षेत्रांतील कामगारांची सामाजिक सुरक्षा आणि कल्याणासाठी, कायदेशीर उपाय आणि कल्याण योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी यांचे अनुकरण करण्यात आले आहे. कायदेशीर उपायांमध्ये किमान मजुरी कायदा १९४८, कामगार नुकसान भरपाई कायदा १९२३, मातृत्व लाभ कायदा १९६१, बंधक मजुर पध्दत (निर्मूलन) कायदा १९७६, कंत्राटी मजूर (नियमन व निर्मूलन) कायदा १९७०, आंतरराज्यीय स्थलांतरित कामगार (रोजगाराचे नियमन व सेवेच्या अटी) कायदा १९७९, इमारत

व इतर बांधकाम मजूर (रोजगार नियमन व सेवेच्या अटी) कायदा १९९६ यांचा समावेश आहे.

असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणाची खात्री करून घेण्यासाठी, इतर बाबींबरोबरच ज्यामध्ये विणकर, हातमाग कामगार, कोळी व कोळणी, टॉडी टॅपर्स, चर्मकार, वृक्षारोपण कामगार, विडी कामगारांचा समावेश आहे, आणि त्यांनी अनऑर्गनाइज वर्कर्स सिक्युरिटी ॲक्ट २००८ संपादन केले आहे. हा कायदा राष्ट्रीय सामाजिक सुरक्षितता मंडळाचे संविधान पुरवितो ज्यायोगे जीवन व अपंगत्व, आरोग्य व मातृत्व लाभ, वृध्दपकाळ संरक्षण आणि सरकारद्वारे असंघटित कामगारांसाठी निर्धारित करण्यात आलेल्या इतर लाभांच्या शिफारशीचे प्रतिपादन करण्यात येतात.

**संदर्भ सूची :**


- दत्त गौरव आणि अश्विनी महाजन, भारतीय अर्थव्यवस्था-दत्त एवं सुन्दरम, एस.चन्द एण्ड कंपनी प्रा. लि. नई दिल्ली, ५२ वी आवृत्ती, २०१४
- भारत २०१३, प्रकाश विभाग सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार, नई दिल्ली.
- देसले डॉ. किरण, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र भाग १ व २, दिपस्तंभ प्रकाशन, जळगांव, २०१३
- डॉ. देसाई आणि डॉ. भालेराव, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, २०१३
- आर्थिक पहाणी २०१३-१४, अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र शासन, मुंबई
- आर्थिक सर्वेक्षण २०१३-१४, भारत सरकार
- राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण ५५४ ६८/१०/१ वी फेरी, भारत में रोजगार एवं बेरोजगार की स्थिती, राष्ट्रीय प्रतिदर्श सर्वेक्षण कार्यालय, सांख्यिकी एवं कार्यक्रम कार्यन्वयन मंत्रालय भारत सरकार, जानेवारी २०१४
- Research Article: Unorganised sector workforce in India, EPW- 27 May 2006
- Report of The National Commission On Labour, Chapter – VII Unorganised Sector
- Research Article : Ajaya Kumar Naik, Informal Sector and Informal Workers in India, IARIW-SAIM Conference on "Measuring the Informal Economy in Developing Countries" Kathmandu, Nepal, September 23-26, 2009
- www.erewise.com



*(**प्रा. नितिन ज्ञानदेव चौधरी,** अर्थशास्त्र विभाग सिताबाई कला महाविद्यालय, अकोला येथे अर्थशास्त्र विषयाचे अध्यापन करतात. संपर्कासाठी **ई-मेल:** ndchaudhari1981@gmail.com)*






विकास समर्पित मासिक

**योजना**

नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. छत्रपती शिवाजी महाराज (हिंदी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. भारतेंदू हरिश्चंद्र (हिंदी) ₹ ११०/-

२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-

# भारतातील असंघटित क्षेत्राचे स्वरुप व उपाय

-डॉ. उमेश घोडेस्वार



**'भागीदारीच्या आधारावर विक्री आणि उत्पादन प्रक्रियेत गुंतलेल्या व्यक्ती किंवा कुटुंबांच्या मालकीचे कमीत कमी १० कामगारांचे मिळून बनलेले क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय.'**

**या क्षेत्रातील लोकांना कौशल्यप्रधान शिक्षणाची आवश्यकता आहे.**

**या क्षेत्रामध्ये अकुशल श्रमिक, स्त्रिया, लहान मुले यांचा समावेश होतो. अत्यंत कमी मोबदल्यामध्ये हे लोक काम करित असतात. संघटन नसल्यामुळेच त्यांच्या कामाचा दर्जा चांगला असूनही त्याप्रमाणात मोबदला मिळत नाही.**

भारतीय अर्थव्यवस्थेतील गंभीर असा भाग म्हणजे असंघटीत क्षेत्र होय. **मानव विकास व कौशल्याची गरज असणारे क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र.** या क्षेत्राला असंघटीत रोजगाराचे क्षेत्र असे देखील म्हटले जाते. **'भागीदारीच्या आधारावर विक्री आणि उत्पादन प्रक्रियेत गुंतलेल्या व्यक्ती किंवा कुटुंबांच्या मालकीचे कमीत कमी १० कामगारांचे मिळून बनलेले क्षेत्र म्हणजे असंघटीत क्षेत्र होय.'**

२००८ मध्ये एकूण ४५० दशलक्ष कामगारांपैकी ४२० दशलक्ष कामगार (९२ टक्के) हे असंघटीत क्षेत्रातील होते. २०१२ पर्यंत हे प्रमाण ९२ ते ९३ टक्केच्या दरम्यान होते. **या क्षेत्रातील लोकांना कौशल्यप्रधान शिक्षणाची आवश्यकता आहे.** राष्ट्रीय असंघटीत क्षेत्र आयोगाने असंघटीत क्षेत्राला असंघटीत बेकारीची फौज म्हटले आहे. भारतात हा अमर्याद श्रम पुरवठा असंघटित क्षेत्र म्हणून ओळखला जातो. किरकोळ व्यापारी, लघु उत्पादक आणि अस्थायी कामाच्या ठिकाणी या असंघटीत क्षेत्राचे मोठया प्रमाणात अस्तित्व आहे. **या क्षेत्रामध्ये अकुशल श्रमिक, स्त्रिया, लहान मुले यांचा समावेश होतो. अत्यंत कमी मोबदल्यामध्ये हे लोक काम करित असतात. संघटन नसल्यामुळेच त्यांच्या कामाचा दर्जा चांगला असूनही त्याप्रमाणात मोबदला मिळत नाही.** वसाहती असणा-या प्रदेशांमध्ये भांडवलशाही व गैरभांडवलशाही अशा दोन्ही ठिकाणी असंघटीत क्षेत्राकडून मोठया प्रमाणात काम करुन घेतल्या जाते. कृषिसारख्या क्षेत्रामध्ये देखील असंघटीत क्षेत्राचा वाटा मोठा दिसून येतो.

भारतात २००२ च्या राष्ट्रीय श्रम आयोगाने असंघटीत क्षेत्रातील कामगारांना न्युनतम स्तराचे संरक्षण उपलब्ध करुन देण्यावर भर दिला आहे. १९९९-२००० मध्ये ३३.७ कोटी एकूण रोजगारामध्ये असंघटीत क्षेत्रातील रोजगारप्राप्त कामगारांची संख्या ही ३०.९ कोटी इतकी होती. म्हणजेच एकूण रोजगारामध्ये त्यांचे प्रमाण हे ९१.७ टक्के होते. असंघटीत क्षेत्राचे क्षेत्रवार कामगारांचा विचार करता कृषिमध्ये ९९.३ टक्के, विनिर्माण क्षेत्रामध्ये ८३.५ टक्के, निर्माण क्षेत्रामध्ये ९२.१ टक्के, व्यापार होटल व्यवसायामध्ये ९८.७ टक्के आणि सामाजिक व वैयक्तिक सेवांमध्ये त्यांचे प्रमाण ६२.७ टक्के होता.

असंघटीत क्षेत्राच्या एकूण रोजगारांमध्ये कृषि श्रमिकांचे प्रमाण हे ६१.४ टक्के होते. व्यापार, हॉटेलमध्ये १२ टक्के आणि विनिर्माण क्षेत्रामध्ये ११ टक्के होते. राष्ट्रीय श्रम आयोगानुसार असंघटीत क्षेत्रातील ६० टक्के श्रमिक हे स्वंयरोजगार प्राप्त आहेत किंवा गृह

आधारित (Home-based) आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार जीडीपीमध्ये असंघटीत क्षेत्राचा वाटा ६१.४ टक्के इतका आहे. २०१२-१३ मध्ये हे प्रमाण ५० टक्केपेक्षा जास्त आहे. त्यामुळे या क्षेत्राचे महत्व लक्षात घेता त्यांना कायद्याचे संरक्षण प्राप्त करुन देणे सरकारची जबाबदारी आहे. अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रामध्ये असंघटीत क्षेत्रातील कामगार काम करतांना दिसून येतात.

असंघटीत क्षेत्रातील एक नवप्रशिक्षित, ठेकेदारीमध्ये गुंतलेला मजूर, गृह आधारित श्रमिक, कोणत्याही उद्योगांमध्ये गुंतलेला स्वनियुक्त व्यक्ती असू शकतो. जो कृषि किंवा कोणत्याही ठेकेदारामार्फत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष काम करण्यात गुंतलेला एक शारीरिक, अकुशल स्वरुपाचा कामगार असू शकतो.

**भारतीय परिस्थितीसंदर्भात असंघटीत क्षेत्राचे स्वरुप :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मोठया प्रमाणात असंघटीत क्षेत्राचे प्राबल्य दिसून येते २०१२ च्या आकडेवारीनुसार एकूण कामगारांपैकी ९२ टक्के कामगार हे असंघटीत क्षेत्रातील आहेत. श्रम मंत्रालयाने असंघटीत क्षेत्राला चार गटांमध्ये विभागले आहे.

**१. व्यवसायाच्या दृष्टीने वर्गीकरण:**

लहान आणि अल्पभूधारक शेतकरी, भूमिहिन श्रम मजुर, ठोक्याची शेती करणारे, मासेमारी करणारे, पशू संवर्धन करणारे, बिडी बनविणारे कामगार, लेबल आणि पॅंकींग करणारे मजूर, बिल्डींग आणि बांधकाम व्यवसायात गुंतलेले कामगार, चामडयाचे व्यवसाय करणारे, विणकाम करणारे, कारागीर, मीठाचा व्यवसाय करणारे, विट उत्पादनात काम करणारे कामगार, दगड खाणीमध्ये काम करणारे, करवत गिरण्यामध्ये काम करणारे तसेच तेल गिरण्यामध्ये काम करणा-या कामगारांचा समावेश या व्यवसाय गटात होतो.

**२. रोजगार स्वरुपाच्या दृष्टीने वर्गीकरण:**

यामध्ये कृषीसंलग्न मजूर, शुल्कबंध मजूर, स्थलांतरित कामगार आणि ठेकेदारी व अस्थायी कामगार असे वर्गीकरण केले जाते.

**३. कामाच्या स्वरुपाच्या दृष्टीने वर्गीकरण:**

यामध्ये ताडी व्यवसाय करणारे, स्वच्छता कर्मी, भारी माल वाहतूक करणारे वाहक, प्राणी वाहून नेणारे वाहनावर काम करणारे वाहक, हमाल या वर्गीकरणामध्ये येतात.

**४. सेवा श्रेणी दृष्टीने वर्गीकरण:**

यामध्ये सूतकाम करणारे कामगार, घरगुती कामगार, मासेमारी करणारे, हजाम काम करणारे, भाजीपाला व फळविक्री करणारे कामगार, वर्तमानपत्र विकणारे कामगार या वर्गीकरणामध्ये येतात. याशिवाय हमाल, हस्तव्यवसायाच्या वस्तू बनवून विकणारे, रिक्शा व ऑटो चालविणारे, स्त्री शिंपी, सुतारकाम करणारे तसेच वीज यंत्राचे काम करणारे कामगार देखील असंघटीत क्षेत्रामध्ये येतात.

**असंघटीत क्षेत्रातील कामगारांची प्रमुख वैशिष्टये:**

१. भारतामध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणा-या कामगारांची संख्या मोठया प्रमाणात असल्यामुळे ते सर्वव्यापी दिसून येते.
२. असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारे श्रमिक हे हंगामी रोजगारामध्ये दिसतात. त्यांना स्थिर रोजगार कधीच मिळत नाही.
३. रस्त्याच्या दुर्तफा भागात हे लोक राहतात. त्यांना स्वत:चे घर नसते.
४. असंघटीत क्षेत्रातील लोक हे कमी मजुरीवर काम करतात, ते छुप्या बेकारीमध्ये असतात. त्यांचे काम हे विखुरलेले व विस्कळीत असते.
५. या क्षेत्रातील नियोक्ता व कामगार यांच्यात कोणत्याही प्रकारचे औपचारिक संबंध नसतात.
६. ग्रामीण क्षेत्रामध्ये असंघटीत कामगार हे विशिष्ट जाती व समुदायाचे असतात. तर शहरी भागात असे दिसून येत नाही. ग्रामीण भागातून शहरी भागात असंघटीत क्षेत्रातील कामगार प्रवसन मोठया प्रमाणात होते.
७. असंघटीत क्षेत्रातील कामगार हे कर्जबाजारीपणा आणि गुलामीच्या विळख्यात सापडलेले असतात. उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांच्या गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत.
८. समाजाच्या बाहेरील लोक या दृष्टीने पाहले जात असल्यामुळे ह्या क्षेत्रातील कामगारांची मोठया प्रमाणात पिळवणूक केल्या जाते. यामध्ये कमी मजुरीवर जास्त काम

करुन घेतल्या जाते. जोखीमेचे काम त्यांच्याकडून केल्या जाते.

९. जुनी उत्पादन तंत्रे आणि संरजामशाहीतील उत्पादन पध्दती यांचा सर्रासपणे उपयोग असंघटीत क्षेत्रामध्ये केला जातो.

१०. असंघटीत क्षेत्रातील कामगारांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी असते, साक्षरतेचा अभाव व गरीबी यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुमार असतो.

११. व्यापारी संघटनांचे या क्षेत्रातील कामगारांकडे पुरेसे लक्ष नसल्यामुळे या क्षेत्रातील कामगारांना पुरेसे सहकार्य लाभत नाही.

१२. या क्षेत्रातील कामगारांना असमान आणि अपरिणामकारक असे कायदे असल्यामुळे त्यांचा दर्जा खालावलेला असतो.

**असंघटीत क्षेत्रासाठी प्रमुख उपाय :**

देशातील कार्यकारी लोकसंख्येमध्ये असंघटीत क्षेत्राचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यामुळे या क्षेत्राला संघटीत क्षेत्राचा दर्जा मिळणे आवश्यक आहे, तसेच त्यांना न्यूनतम मजुरी, सामाजिक सुरक्षा स्वास्थ, सामाजिक कल्याण व मातृत्व आणि बालकांच्या पालनपोषणाची जबाबदारी घेणे आवश्यक आहे. कौशल्य आणि तांत्रिक ज्ञान देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

राष्ट्रीय श्रम आयोगाने या संदर्भात खालील उपायांचा उल्लेख केलेला आहे.

१. सर्वप्रथम असंघटीत क्षेत्रातील कामगारांना स्वीकृती प्रदान करणे आवश्यक आहे आणि औपचारिक सर्वेक्षणांमध्ये त्यांचा समावेश केला जावा.

२. असंघटीत क्षेत्रातील प्रत्येक कामगाराला औपचारिक ओळख पत्र दिले जावे त्याव्दारे निश्चित कायद्यांतर्गत त्यांना संरक्षण दिले जावे.

३. असंघटीत क्षेत्रातील कामगार हा भारतीय नागरिक असल्यामुळे तो संरक्षण आणि कल्याणासाठी पात्र असावा. राष्ट्रीय उत्पन्नामध्ये त्यांचे योगदान अधिक असल्यामुळे त्याला संघटीत क्षेत्रातील श्रमीकांसारखे फायदे मिळणे आवश्यक आहे.

४. कामाच्या अधिकाराला सामाजिक सुरक्षेच्या अधिकाराचे अभिन्न अंग मानावे लागेल, त्यासाठी या कामगारांच्या आरोग्य, महिला कामगारांना संरक्षण, लहान मुलां-मुलींचे व बालकांच्या संगोपनाची जबाबदारी सरकारतर्फे स्वयंसेवी संस्थांना द्यावी. आयोगाने अशी शिफारश केली की, कामाचा अधिकार याअंतर्गत असंघटीत क्षेत्रातील कामगारांना मूलभूत अधिकार प्रदान करण्यात यावे.

५. अर्थव्यवस्थेमध्ये काम करणारे गरीब, स्त्रिया, बाल कामगार यांचा आर्थिक स्तर वाढविण्यासाठी कृतिआराखडा बनवावा. त्याअंतर्गत कायद्यानुसार असंघटीत क्षेत्रातील कामगारांना सुरक्षा देण्यात यावी.

दुस-या राष्ट्रीय श्रम आयोगाच्या शिफारशींचा विचार करता संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने असंघटीत क्षेत्रांचा विकास करण्यासाठी डॉ.अर्जुन सेनगुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आयोग गठीत केला. २००५ मध्ये या आयोगाने आपला अहवाल सादर केला. या आयोगाच्या अहवालानुसार असंघटीत क्षेत्रासाठी सामाजिक सुरक्षा विधेयक पारित करावे असे सुचविले आहे. परंतु, अद्याप त्यावर विचार झालेला नाही. त्यामुळे नव्या सरकारकडून या क्षेत्राच्या विकासासाठी या विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल व भारतातील मोठा कार्यकारी वर्ग कायद्याच्या कक्षेत येईल ही रास्त अपेक्षा आहे.

*(**डॉ. उमेश घोडेस्वार** हे अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय अकोला(महाराष्ट्र) येथे सहा. प्राध्यापक व रिसर्च फेलो आहेत. संपर्कासाठी **ईमेल**-ghodeswar123@gmail.com)*

# असंघटित क्षेत्र-शहरी सामान्यांची भूमिका

-राजेश भट्टाचार्य



**येत्या दोन दशकात भारतातील असंघटित क्षेत्रात दोन महत्वाच्या घडामोडी होणार आहेत त्या म्हणजे- वाढते शहरीकरण व तरूण मनुष्यबळाची वाढती संख्या.**

**एकविसाव्या शतकात जर अनौपचारिक क्षेत्राचा पगडा निरंतरपणे शहरी कामगारांच्या जीवनमानावर राहिला तर धोरणांना अनौपचारिक संपत्ती अधिकारांर्गत घ्यावे लागेल.**

**वाढभिमुख व अस्तित्वाभिमुख असे दोन प्रकार असलेले असंघटित क्षेत्र हे अस्ताव्यस्त आणि विस्कळित आहे. यातील दुसरा प्रकार कमी प्रचलित आहे. असंघटित क्षेत्राचा विस्कळितपणा हा तेव्हाच समजून घेता येईल जेव्हा आपण संघटित क्षेत्रातील वाढता विस्तार, गरजा व अतिरिक्त कामगार यांचा विचार करू.**

भारतातील जीवनमानाचा विचार करायचा म्हटला तर मध्यवर्ती ठिकाणी विशेष करून असंघटित क्षेत्र आहे. बाराव्या पंचवार्षिक योजनेनुसार असंघटित क्षेत्रात ८४ टक्के कामगार आहेत (नियोजन आयोग २०१३), स्वातंत्र्यापासून भारताने अगदी १९८०-मध्या पर्यंत आर्थिक नियंत्रणेच अनुभवली आहेत. त्यानंतर आर्थिक उदारीकरण अनुभवले आहे. असंघटित क्षेत्राच्या बाबतीत आपले जे धोरण आहे त्याबाबत आर्थिक नियंत्रणाचा काळ व उदारीकरणाचा काळ यात काही त्रुटी आहेत किंवा वादाचे मुद्दे आहेत. याबाबत अनेकदा धोरणावर ज्या चर्चा होतात त्यात संघटित क्षेत्राबाबतच्याच प्रश्नांवर चर्चा होते. उदारीकरणाच्या पूर्वीच्या काळात म्हणजे १९६० ते १९७० या काळात काही उत्पादने ही लघुउद्योग क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आली होती, जेणेकरून त्यात काही प्रमाणात रोजगार निर्माण व्हावेत असा विचारच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत पी.सी.महालनोबिस यांनी मांडला होता व त्याला अनुसरूनच धोरण आखण्यात आले होते. १९८० पासून एकूण वाढीचा दर जास्त असतांनाही सर्वसमावेशक वाढीच्या मुद्द्यावर विषयसुची व उद्दिष्टांमध्ये भर दिला गेला. भारतातील आर्थिक उदारीकरणानंतर आर्थिक वाढीचे जे स्वरूप होते त्याचे सर्वसमावेशक वाढ हे एक वैशिष्ट्य मानता येईल. **येत्या दोन दशकात भारतातील असंघटित क्षेत्रात दोन महत्वाच्या घडामोडी होणार आहेत** त्या म्हणजे- वाढते शहरीकरण व तरूण मनुष्यबळाची वाढती संख्या. येत्या तीन दशकात भारताची निम्मी लोकसंख्या शहरी असेल. जगात भारत हा शहरीकरणात सर्वात पुढे आहे. याच तीन दशकात भारतात तरूण मनुष्यबळाची संख्या जास्त असणार आहे. भारतात इ.स. २०३५ मध्ये काम करणारे लोक १५ ते ६४ वयोगटातील असेल. हे लोकसंख्येचे प्रमाण ६८ टक्के असेल (जेम्स २०११). त्याकाळात शहरी भागात असंघटित कामगारांची संख्या वाढणार आहे. असंघटित नागरी क्षेत्र असेच वाढत राहिले तर शहरी दारिद्र्याचे व वंचितांचे प्रमाण वाढत राहणार आहे. अधिकृत व्याख्येनुसार निव्वळ दारिद्र्य कमी झाल्याचे दिसेल पण प्रत्यक्षात स्थिती वेगळी असेल. शहरात संघटित व असंघटित वर्ग जागेवर दावा सांगतील. शहरातील राजकारणात तेथील जमिनींचे हक्क कुणाकडे जातात याला फार महत्व राहील. या शोधनिबंधात शहरी असंघटित क्षेत्रातील लोकांच्या अस्तित्वाचा प्रश्न मांडण्यात आला आहे व त्यातही कमी संघटित असलेल्या वर्गाच्या प्रश्नांवर भर दिलेला आहे. असंघटित क्षेत्रातील उत्पादन व रोजीरोटी टिकवून ठेवणाऱ्या शहरातील सामान्य नागरिकांचे महत्वही यात विचारात घेतले आहे. शहरी भागाच्या असंघटित

क्षेत्रातील उत्पादन हे गरिबांच्या मालमत्ता हक्कांबाबत आपल्याला आमनेसामने यायला भाग पाडणार आहे. **एकविसाव्या शतकात जर अनौपचारिक क्षेत्राचा पगडा निरंतरपणे शहरी कामगारांच्या जीवनमानावर राहिला तर धोरणांना अनौपचारिक संपत्ती अधिकारांर्गत घ्यावे लागेल.**

**घर व कार्यशाळा यातील पुसट सीमारेषा:**

शहरी निमशहरी भागात रेल्वे स्टेशन बाजार व तत्सम ठिकाणी मोठया प्रमाणात झोपडपट्ट्या दिसतात. येणा-या काळात शहरातील असंघटित कामगार व असंघटितांनी केलेल्या उत्पादनाचे सामाजिक क्षेत्र झोपडपट्ट्याच असणार आहे. तिथे उत्पादन करतांना पालिका, पर्यावरण व मालमत्ता कायद्याचे उल्लंघन होणार हे उघड आहे. जगभरातील झोपडपट्ट्यात हेच घडते. झोपडपट्ट्या म्हणजे केवळ निवासाची जागा राहात नाही तर गरीब लोकांची औद्योगिक उत्पादन शहरे असेच या झोपडपट्ट्यांना म्हणावे लागेल. शहरी लोकसंख्येत वाढ होईल तेव्हा ते लोक असंघटित क्षेत्रातील या उत्पादनाच्या कामांवर, झोपडपट्ट्यांमध्ये घरातच केल्या जाणाऱ्या उत्पादनांवर अवलंबून राहतील. राष्ट्रीय असंघटीत क्षेत्र उपक्रम आयोग अर्थात एनसीइयूएस (२००७) च्या अहवालानुसार शहरातील बहुतांश शहरी असंघटित क्षेत्र हे स्वत: एक औद्योगिक आस्थापन बनले आहे. त्या उद्योगात केवळ संबंधित कुटुंबातील व्यक्तीच काम करतात. कुठल्याही कामगारांना न घेता ते घरातील लोकांच्या मदतीने हे उद्योग चालवतात. घर हाच एक कारखाना बनतो. घराच्या रूपाने जी थोडी स्थावर मालमत्ता असेल तेच या उद्योगांचे भांडवल असेल. घरखर्च व उत्पादन खर्च यात भेद करणे कठीण जाईल. घरातच उत्पादन केले जात असल्याने असंघटित उत्पादकांना काहीवेळा घरातील साधने जरी ती अपुरी असली तरी वापरावी लागतील (संन्याल व भट्टाचार्य २००९). घरगुती स्वरूपाचे ठराविक पण कमी भांडवलात केले जाणारे हे उद्योग त्यामुळे टिकून राहतात. उत्पादन क्षेत्रातील उद्योगांच्या बाबतीत हे जास्त खरे ठरते. १९९९ -२००० या काळात उत्पादन क्षेत्रात ७६ टक्के ग्रामीण उद्योग व ६३ टक्के शहरी उद्योग हे कुटीर उद्योगांतर्ग घरातूनच केले जात होते. (एनसीइयूएस २००७. घरगुती उद्योगांना नेहमी पर्यावरण, झोनिंग, महापालिका कायदे यांच्याशी संघर्ष करावा लागतो व त्यावरच त्यांचे अस्तित्व अवलंबून असते. झोपडपट्ट्या किंवा असंघटित ठिकाणच्या गरिबांनी केलेल्या व्यावसायिक उलाढालींना आपण महत्त्व देत नाही केवळ त्यांच्या घराच्या गरजेला मान्यता देतो, हे बरोबर नाही. कारण ते घर नसते तर एक उत्पादन स्थळ किंवा कारखानाही असतो हे आपण विचारात घेत नाही.

**शहरी सार्वजनिक घटक:**

असंघिटत अर्थव्यवस्थेतील संघटित लोकांना पुरवलेल्या सुविधा संधी साधून झोपडपट्ट्यातील लोक अनाधिकाराने वापरू लागतात. जसे विजेच्या तारेवर आकडा टाकून वीज मिळवणे, सामुदायिक मालमत्ता वापरणे (त्यात अतिक्रमण, संघटित क्षेत्राला पुरवठा केलेल्या सेवांमध्ये बेकायदा वाटेकरी होणे.) सह उत्पादकांकडून व्याजमुक्त कर्जे घेणे, बाजारपेठ कौशल्याचे आदान प्रदान करणे, खासगी मालमत्ता हक्कांबाबतच्या सध्याच्या व्यवस्थेला टाळून पुढे जाणे. यात बेकायदेशीरता व असंघटीतता यांची सरमिसळ केली जात असल्याने प्रशासनाच्या दृष्टीने ती चिंतेची बाब ठरते. हा ''सामान्य लोक'' नावाचा वर्ग तयार होतांना बेकायदेशीरपणाची कार्यात्मक भूमिका वठवतो. बेकायदेशीरपणाचे कृत्य हे वरकरणी योग्य वाटू शकते. (भट्टाचार्य, संन्याल २०१३).

''नागरी सार्वजनिक बाबींमध्ये आपण जी मोकळी हवा घेतो, जी उद्याने (बगीचे) पाहतो, सार्वजनिक'' वाहतुकीची व स्वच्छतागृहाची ठिकाणे, सार्वजनिक शाळा, सार्वजनिक पाणीपुरवठा अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो. त्यात महापालिकेचा कचरा ही बाबही समाविष्ट आहे त्यातून गोळा केलेल्या कचऱ्यातून, सार्वजनिक जलसाठ्यांमध्ये केलेल्या मासेमारीतून त्यांना रोजीरोटी मिळते. रस्ते या शहराच्या धमन्याच असतात, तसेच कामाची ठिकाणेही महत्वाची असतात. तेथे आपण राहतो, प्रेम करतो, स्वप्ने पाहतो, विसंवाद व्यक्त करतो. स्थानिक बाजारपेठा या व्यापाराचे ठिकाण आहेत. ती सांस्कृतिक शोध साधनेही आहेत (गिडवानी व बावीस्कर २०११-४३).

''सामायित घटक'' हे असे जीवनाच्या पुनरूत्पादनाच्या धर्तीवर सामान्यांच्या नकळत आक्रमणातून तयार होत असतात (बयात १९९७). नागरी सामान्य लोक म्हणजे असंघटित लोक हे त्याचे अधिकार खासगी व सार्वजनिक

जागा व साधनांवर लादतात त्यामुळे एक प्रकारे साधनांचे फेरवाटप होऊन त्यांनी सुरू केलेल्या आस्थापनांना व व्यावसायिक उद्योगांना पाठबळ मिळते. पार्थसारथी (२०११) यांनी खासगी व सामुदायिक परिसंस्था साधनांचे (उद्याने,जलस्त्रोत, कुरणे) यांच्या सामायिकीकरणाबाबत मुंबईतील काही उदाहरणे दिली आहेत, त्यात काही कारागिरांनी व छोट्या उत्पादकांनी वेगवेगळ्या प्रकारे अशा स्त्रोतांचा वापर केला आहे. कोलकात्याला ज्यांनी भेट दिली असेल ते जुनी दुकाने विसरले नसतील, ''एस्पलानडे जिल्हा'' हा निव्वळ फेरीवाले व विक्रेत्यांनी व्यापला जो पुर्वी जुनी दुकाने करमणूक उद्योग, व्यवसाय, शॉपिंग यांच्यासाठी प्रसिद्ध होता. ओबेरॉय ग्रँड हॉटेलच्या समोरच हे सर्व उद्योग चालू आहेत.

**गरिबांचे मालमत्ता हक्क:**

ऑस्ट्रॉम(१९९०,१९९९)यांनी असा युक्तीवाद केला की, **जेव्हा एखादी मालमत्ता समुदायाकडून सामुदायिक कारणासाठी उपयोगात आणली जाते त्यावेळी तेव्हाच मालमत्तेचे प्रश्न निर्माण होतात**. सामुदायिक घटकांवरील स्थानिक व असंघटित वर्गाचे वर्चस्व पाहिले तर त्यात औपचारिक मालकी हक्क कुठेच नसतात. असंघटित समुदायाकडून नियंत्रित केले जाणारे साधने स्त्रोत व मालमत्तांची एक व्यवस्था लावली जाऊ शकते. शहरी साधनांच्या संदर्भात हीच बाब लागू आहे. न्यायिक मालकी हक्कात तो मिळवण्यात विविधतेचा अभाव, मागे घेण्याचा अभाव व व्यवस्थापनाचा अभाव आहे, समुदाय मग असे मालकी हक्क लादत जातो. कोलकात्याचेच उदाहरण द्यायचे तर कोलकात्यात काही रस्त्यांवर रिक्षा संघटना आहेत. निम्म्याहून अधिक रिक्षा बेकायदा असूनही रिक्षाचालकांच्या समुदायाने हा उद्योग चालवला आहे. यात रिक्षावाल्यांच्या समुदायाला राजकीय छत्राखाली कामगार संघटनेत बांधून अनेक हक्क गाजवता आले. हे हक्क बेकायदेशीर असूनही ते त्यांनी वेगळे हक्क म्हणून मिळवले आहेत. हे रिक्षावाले कुठल्या रस्त्यावर किती रिक्षा असाव्यात, प्रवाशांना योग्य स्थळी न पोहोचवणाऱ्या रिक्षाचालकांना शिक्षा होणार नाही याची काळजी घेतात. झोपडपट्टी व्यवस्थापनात असेच व्यवस्थापन व विशेष अधिकार जागेत गुंतवणूक करून राबवले जातात. गृहनिर्माण प्रकल्पात खासगी गुंतवणूक केली जाते. महापालिकेची सांडपाणी योजना व पथदीप योजनेत गुंतवणूक असते, असे चटर्जी यांनी कोलकात्यातील रेल्वे वसाहतीचा दाखला देऊन म्हटले आहे. मुंबईतल्या धारावी झोपडपट्टीत विशिष्ट वंशाचे व धर्माचे लोक राहतात. तेथेही समुदायाने व्यवस्थापन केलेल्या स्त्रोतांची स्थिती तशीच आहे. तेथे न्यायिक मालमत्ता हक्कांचा अभाव असल्याने झोपडपट्ट्यांतील लोकच स्त्रोतांची व्यवस्थापन हाती घेतात व मालमत्ता हक्कांची व्यवस्था तयार करतात. पण त्यामुळे ते खरे मालक बनत नाहीत तर असंघटित मालमत्ता चालक बनतात. आस्ट्रॉमच्या मते त्यांना विशेषाधिकार व व्यवस्थापन अधिकारही असतात. भारतात शहरी नूतनीकरण धोरणात शहरी असंघटिततेशी मुकाबला करण्यासाठी दोन पर्याय सुचवले आहेत. एक उदाहरण म्हणजे गरिबांच्या वस्त्या असलेल्या झोपडपट्ट्यांचा पुर्नविकास करण्यावर भर आहे पण त्यांच्या व्यावसायिक गरजांवर भर नाही. यात निवास व घरगुती उत्पादने ही दोन्ही उद्दिष्टे एकाच ठिकाणी साध्य केली जातात हे विसरता कामा नये. संपूर्ण झोपडपट्टीचा वापर असा दुहेरी पद्धतीने केला जातो. त्यामुळे झोपडपट्टीतील जागेचा उपयोग उत्पादनाचे ठिकाण व मानवी वस्तीचे ठिकाण अशा दोन्ही पद्धतीने होणार आहे. यात पायवाट, आजूबाजूचा परिसर, छपरावरची जागा, दोन घरांमधील मोकळी जागा यांचा वापर उत्पादन, साठवण व विक्री यासाठी केला जातो. तेथील वाढ समांतर असते. आता शहरी क्षेत्रात जागांची मागणी वाढत आहे. त्यामुळे शहरात बहु मजली उंच इमारती उभ्या करण्यासाठी दडपण वाढत आहे. झोपडपट्टी पुर्नविकासात उंच इमारती उभ्या केल्या जातात व पुनर्वसन केलेल्या लोकांना नाममात्र किंमतीने किंवा मोफत सदनिका दिल्या जातात. धारावी झोपडपट्टीच्या पुर्नविकासाचा आराखडा तसाच आहे पण अशा पुर्नविकसित इमारतींमधील छोटासा फ्लॅट या झोपडपट्टीधारकांना वस्तू उत्पादनासाठी पुरत नाही, हे उत्पादन भागीदारीत जागा घेऊन करण्यावर अवलंबून असेल. जर आपण अस्ताव्यस्त जागेच्या ठिकाणी उंच इमारती उभारल्या तर घरगुती उत्पादनासाठी व निवासासाठी असलेली जागा कमी होत जाते. द सोटो

(२००३) यांच्या मते गरीब असंघटित उत्पादक हे दारिद्र्यातुन सुटू शकत नाहीत. कारण त्यांच्या हातातील मालमत्ता ते हलवू शकत नाहीत. त्यांच्या मालमत्ता या मृत भांडवल म्हणून गोठवल्या जातात त्यामुळे त्या पतपुरवठ्यासाठी उपयोगी नसतात तसेच मालमत्ता बाजारपेठेच्या दृष्टीने त्यांचा काही उपयोग होत नाही त्यामुळे असंघटित लोकांना मालमत्तेवरचा हक्क मिळत नाही, त्यामुळे त्यांना संकुचित जीवनमानातच रहावे लागते. कायदाच त्यांना छोटे उद्योजक म्हणून नावारूपाला येण्यात अडथळे आणतो. डॉ. द सोटो यांचा हा दृष्टिकोन आकर्षक असला तरी त्यातही काही समस्या आहेत कारण नागरी असंघित क्षेत्रात होत असलेल्या उत्पादनाकडे तसेच तेथील कामगारांच्या मानवी पुनर्निमितीकडे व जीवनाकडे त्यांनी दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे त्या दृष्टिकोनात एकजिनसीपणा राहत नाही. तेथे अनेक उत्पादक, भांडवली संस्था स्वयंरोजगार असलेले लोक व नियोक्ते आहेत, व्यावसायिक उलाढाली आहेत. त्यातील काही उलाढाली या नफा मिळवून देणाऱ्या आहेत. व त्या वर्धिष्णु आहेत. काही वेळा या वस्तूंची निर्मिती काही वेळा स्थानिक तर काहीवेळा निर्यात बाजारपेठेसाठीही होते. सरासरी मूल्यवर्धित व स्थावर मालमत्ता यांच्यातील फरक एकजिनसीपणा नसल्याने दिसून येतो. एनएसएसओच्या ६७ व्या फेरीनंतरच्या आकडेवारीनुसार २००९-१० अन्वये मूल्यवर्धित सकल मूल्य सरासरी प्रत्येक उद्योगामागे ३९,२३२ रूपये व स्थावर मालमत्तेमागे ६७२०६ रूपये होती आता ती अनुक्रमे ३५२८७२ व ५४३०८० रूपये आहे.

मालमत्ता हक्कांचे नियमन केले तर असंघटित उद्योजकांना बाजारपेठेत येण्याची संधी मिळेल पण त्यात त्यांना असमान फलप्राप्ती होईल त्यामुळे कमी आर्थिक ताकदीच्या उद्योजकांना वंचितच रहावे लागेल. असंघटित उत्पादकांमध्ये असा भेदभाव निर्माण करणारी खुले सहकार्य न करणारी बाजारपेठ, मालमत्ता बेकायदा असणे या बाबी त्यांच्या प्रगतीत आड येतात. शहरातील सामुदायिकतेचे प्रारूप हे असंघटित क्षेत्रातील पुनरूत्पादनास महत्व देते व त्यांच्या वस्तूंच्या उत्पादनांकडे दुर्लक्ष करते. गरीब लोक खासगीकरणापेक्षा सामुदायिकता पसंत करतात कारण सामुदायिकतेत खपाची शक्यता कमी उत्पादन गटात जास्त असते (बॅलँड व फ्रँकॉइ, २००५). गरीब लोक उत्पादनाच्या प्रक्रियेकडे वळतात व स्वयंरोजगार निर्माण करतात याला कारण त्यांच्या मालाला खपाची हमी ही लोकांच्या गरजांमुळे असते. त्यात संचयाचा हेतू नसतो. किफायतशीर रोजगार मिळत नसल्याने ते स्वंयरोजगाराकडे वळतात. बॅनर्जी व डफलो (२०११) यांच्या मते बहुतेक असंघटित उद्योजक परिस्थितीमुळे उद्योजक बनतात. जर मालकी हक्कांचे औपचारिकीकरण केले तर डे सोटो यांच्या मते अनौपचारिक मालमत्ता हक्कांचे हस्तांतर शक्य होऊन शहरी गरिबांना त्यांची रोजीरोटी आणि जागाही गमवावी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. (पोर्टर २०११)

**निष्कर्ष :**

वाढभिमुख व अस्तित्वाभिमुख असे दोन प्रकार असलेले असंघटित क्षेत्र हे अस्ताव्यस्त आणि विस्कळित आहे. यातील दुसरा प्रकार कमी प्रचलित आहे. असंघटित क्षेत्राचा विस्कळितपणा हा तेव्हाच समजून घेता येईल जेव्हा आपण संघटित क्षेत्रातील वाढता विस्तार, गरजा व अतिरिक्त कामगार यांचा विचार करू. कृषी क्षेत्रातील कामगार हे सुसंघटित आहेत. कारण कृषी क्षेत्र वाढत्या कामगार बळास अनुकूलता निर्माण करू शकतात. अतिरिक्त कामगार व असंघटित उत्पादन यांची मुख्य क्षेत्रे म्हणूनच शहरे उदयास येतात. जोपर्यंत असंघटित क्षेत्र हे सामाजिक अवकाशात बहुतांश कामगारांची निर्मिती करीत राहील तोपर्यत शहरी असंघटित हे शहरी राजकीय अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी राहतील. रोजगाराबाबतची धोरणे, वाढते शहरीकरण यातून अर्थव्यवस्थेत एकजिनसीपणा आला पाहिजे. भारतीय अर्थव्यवस्थेतील संघटित व असंघटित या दुहेरी रचनेला मान्यता दिली पाहिजे, त्यातून शहरी मालमत्तांच्या मालकीच्या बहुविविधतेवर आधारित व्यवस्था अंमलात येईल. कारण प्रत्यक्षात असंघटित व संघटित अशी दोन क्षेत्रे व त्यांच्या मालमत्ता अस्तित्वात आहेतच.

**संदर्भ :**


- बॅलंड, जीन मॅरी अँड पॅट्रिक फ्रँकॉइस २००५, कॉमन्स अॅज इन्शुरन्स अँड वेलफेअर इंपॅक्ट ऑफ प्रायव्हटायझेशन, जर्नल ऑफ पब्लिक इकॉनॉमिक्स ८९(२० २११-२३१.)

- बॅनर्जी अभिजित विनायक अँड इस्टर डुफ्लो. २०११. पुअर इकॉनॉमिक्स - अ रॅडिकल रिथिंकिंग ऑफ द वे टू फाइट ग्लोबल पॉव्हर्टी, पब्लिक अफेअर्स, युएसए.
- बायत असेफ १९९७. अनसिव्हील सोसायटी- द पॉलिटिक्स ऑफ द इनफॉर्मल पीपल, द वर्ल्ड क्वार्टरली १८ (१) ५३-७२.
- भट्टाचार्य, राजेश, स्नेहाशिष भट्टाचार्य, अँड कल्याण के संन्याल २०१३. ''डयुअलिझम इन द इनफ़ॉर्मल इकॉनॉमी- एक्सप्लोरिंग इंडियन इनफॉर्मल मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर,'' इन बॅनर्जी.
- सरमिला अँड अंजन चक्रवर्ती (इडी) डेव्हलपमेंट अँड सस्टेनेबेलिटी - इंडिया इन ग्लोबल परस्पेक्टिव्ह, स्प्रिंगर ३३९-३६२.
- चॅटर्जी पार्थ २००४, द पॉलिटिक्स ऑफ द गव्हर्नन्स - रिफ्लेक्शन्स ऑन पॉप्युलर पॉलिटिक्स इन मोस्ट ऑफ द वर्ल्ड, कोलंबिया युनिव्हर्सिटी प्रेस, युएसए
- डे, सोटो हेरनानडो १९९३, द मिसींग इनग्रेडियंट, द इकॉनॉमिस्ट ३२८ (७८२८) ८-१०.
- डे, सोटो हेरनानडो २००३, मायस्टरी ऑफ कॅपिटल - व्हाय कपिटलायझेशन ट्रायम्फस इन द वेस्ट अँड फेल्स एव्हरीव्हेअर एल्स ( बेसिक बुक्स युएसए).
- गिडवानी विनय अँड अमिता बावीस्कर २०११, अर्बन कॉमन्स, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली ४६ (५०) ४२-४३.
- गिलीस्पी, थॉमस अँटनी २०१३, अॅक्युम्युलेशन बाय अर्बन डिस्पझेशन स्ट्रगल्स ओव्हर अर्बन स्पेस इन अक्रा, घाना, पीएचडी डिझर्टेशन, युनिव्हर्सिटी ऑफ लीडस्
- जेम्स, के.एस २०११, इंडियाज डेमोग्राफिक चेंज अपॉरच्युनिटीज् अँड चॅलेंजेस सायन्स ३३ (६०४२) ५७६-५८०.
- एनसीइयूएस नॅशनल कमिशन फॉर एंटरप्राइजेस इन अनऑरगनाईज्ड सेक्टर. एनसीईयुएस गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.
- ऑस्ट्रॉम इलिनॉर, १९९०, गव्हर्निंग द कॉमन्स- द इव्होल्यूशन ऑफ इन्सिट्यूशन फॉर कलेक्टिव्ह ॲक्शन केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस युएसए.
- ओस्ट्रोम, एलिनॉर, जोना बर्गर, ख्रिस्तोफर बी फील्ड, रिचर्ड बी नोरगार्ड अँड डेव्हीड पोलिकॅन्स्की १९९९, रिव्हीजिटिंग द कॉमन्स- लोकल लेसन्स, ग्लोबल चॅलेंजेस, सायन्स २८४ (५४१२) २७८-२८२
- पार्थसारथी डी. २०११, हंटर्स, गॅदरर्स अँड फोरेजेस इन मेट्रोपोलिस- कॉमनायझिंग द प्रायव्हेट अँड पब्लिक इन मुंबई. इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली ४६ (५०) ४७-५४
- पटेल, शिरीष बी २०१०, धारावी, मेक ओव्हर ऑर टेकओव्हर, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली ४५ (२४) ४७-५४).
- प्लानिंग कमिशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया २०१३, ट्वेल्वथ फाइव्ह इयर प्लान २०१२-१७ सेज पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली.
- पोर्टर, लिबी २०११, इनफॉर्मलिटी, द कॉमन्स अँड द पॅराडॉक्सेस फॉर प्लानिंग- कन्सेप्टस अँड डिबेटस फॉर इनफॉरमेलिटी अँड प्लानिंग, प्लानिंग थिअरी अँड प्रॅक्टिस १२ (१) ११२- १२०
- संन्याल, कल्याण के २००७ रिथिंकिंग कॅपिटॅलिस्ट डेव्हलपमेंट- प्रिमिटीव्ह अक्युम्युलेशन गव्हर्नमेंटॅलिटी अँड द पोस्ट कोलोनियल कपिटॅलिझम. रूटलेज, नवी दिल्ली - यूके
- संन्याल कल्याण के २००७ अँड राजेश भट्टाचार्य २००९, बियाँड द फॅक्टरी- ग्लोबलायझेशन, इनफॉर्मलायझेशन ऑफ प्रॉड्क्शन अँड द न्यू लोकेशन्स ऑफ लेबर, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली ४४-२२) ३५-४४.
- स्वेर्टस एल्फी, डेनीस प्युमेन अँड एरिक डेनिस २०१४. ''द फ्युचर ऑफ इंडियाज् अरबनायझेशन, फ्युचर्स ५६; (४३-५२)

*(**राजेश भट्टाचार्य-** लेखक भारतीय व्यवस्थापन संस्था, कोलकत्ता येथे पब्लिक पॉलिसी एन्ड मॅनेजमेंट या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक आहेत. भारतातील तसेच परदेशातील नामवंत संशोधन मासिकांत यांचे लिखाण प्रसिध्द झाले आहे. संपर्कासाठी **ईमेल-** rb@iimcal.ac.in)*

# भारतातील कॉल सेंटर्स - नोकऱ्यांच्या असुरक्षिततेचे माहेर घर

-बाबू पी रमेश



**कॉल सेंटरचे काम हे आधुनिक सेवा क्षेत्रातील एक उदयोन्मुख क्षेत्रातील काम समजले जाते. प्रथमदर्शनी, कॉल सेंटरमधील काम हे संघटित क्षेत्रात मोडते कारण कामाची ठिकाणे सुसंघटित असतात, तेथे मोठ्या इमारती असतात, अत्याधुनिक सुविधा असतात. या संस्था काही नियमावलीनुसार काम करत असतात. तेथे चांगले वेतन दिले जाते, इतर सोयीसवलती भरपूर असतात, आर्थिक पॅकेजेस मोठी असतात. कामाची ठिकाणे लवचिक असतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण होते. पण जर आपण अगदी जवळून या उद्योगाचे निरीक्षण केले तर असे दिसून येते की, वरील सर्व वर्णन हे सूक्ष्म-मूर्त अभ्यासात टिकत नाही कारण या उद्योगातील कर्मचाऱ्यांना असुरक्षितता अनुभवावी लागते व तेथुनच असंघटित क्षेत्राचा समावेश होतो. आर्थिक वाढ, प्रगती, आउटसोर्सिंग, व भारतातील कॉल सेंटर्स अशा अनेक विषयांवर यात प्रकाश टाकण्यात आला आहे.**

असंघटित कामगारांच्या वाईट स्थितीचे दर्शन जसे कमी संघटित क्षेत्रात दिसते तसेच ते असंघटित क्षेत्रात घेतल्या जाणाऱ्या कंत्राटी कामांमध्येही दिसते याचे कारण म्हणजे त्यात नियोक्ता व कर्मचारी असे निश्चित संबंध नसतात, वेतन अगदी कमी दिले जाते. कामाचे अधिक तास, सामाजिक सुरक्षिततेचा अभाव, सुरक्षात्मक व कल्याणकारी योजना कमी असतात. कामगारांना त्यांचे मूलभूत हक्कच दिले जात नाहीत. त्याचप्रमाणे प्रचंड कामाच्या ओझ्याखाली काम करावे लागते. तेथील कामाच्या अटीही अतिशय वाईट असतात. जादा तास काम, पिळवणूक हे ठरलेले असते. वरील सर्व गोष्टी ज्यांच्या वाट्याला आलेल्या असतात ते असंघटित क्षेत्रातील कामगार असतात व ज्यांच्या वाट्याला या गोष्टी नाहीत त्याला संघटित क्षेत्र असे म्हणतात. असे असले तरी संघटित क्षेत्र व असंघटित क्षेत्र असे वर्गीकरण करणे खूपच कठीण काम असते कारण प्रत्येक क्षेत्रात या बाबी काही ना काही प्रमाणात घडत असतात.

राष्ट्रीय उद्योजकता आयोगाने उल्लेख केल्याप्रमाणे काही वेळा असंघटित उद्योगातही संघटित उद्योगाप्रमाणे स्थिती असते, त्याला संघटित क्षेत्रातील असंघटित क्षेत्र असे म्हणता येईल (एनसीयूएस २००९). संघटित क्षेत्रातील काही उद्योग किंवा नियुक्तीची पदे अशी आहेत जिथे संघटित क्षेत्रात असूनही कर्मचाऱ्यांना असंघटित क्षेत्रातील गुणधर्मांचा अनुभव येतो. काहीवेळा हे उलटही घडू शकते. त्यामुळे संघटिततेचे प्रमाण ओळखणे हे अवघड असते. संघटित व असंघटित क्षेत्रांचे गुणधर्म प्रत्येक व्यवसाय किंवा नोकरीसाठी सांगणे अवघड असते.

या सगळ्या पार्श्वभूमीवर औपचारिक व संघटित व्यवसायांमधील असंघटिततेच्या खूणा किंवा काही उदाहरणे दाखवून देणे आवश्यक आहे. याचे उदाहरणच घ्यायचे झाले तर भारतील कॉल सेंटरमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे घेता येईल.

कॉल सेंटरचे काम हे आधुनिक सेवा क्षेत्रातील एक उदयोन्मुख क्षेत्रातील काम समजले जाते. प्रथमदर्शनी, कॉल सेंटरमधील काम हे संघटित क्षेत्रात मोडते कारण कामाची ठिकाणे सुसंघटित असतात, तेथे मोठ्या इमारती असतात, अत्याधुनिक सुविधा असतात. या संस्था काही नियमावलीनुसार काम करत असतात. तेथे चांगले वेतन दिले जाते, इतर सोयीसवलती भरपूर असतात, आर्थिक पॅकेजेस मोठी असतात. कामाची ठिकाणे लवचिक असतात, त्यामुळे कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण होते. पण जर आपण अगदी जवळून या उद्योगाचे निरीक्षण केले तर असे दिसून येते की, वरील सर्व वर्णन हे

सूक्ष्म-मूर्त अभ्यासात टिकत नाही कारण या उद्योगातील कर्मचाऱ्यांना असुरक्षितता अनुभवावी लागते व तेथूनच असंघटित क्षेत्राचा समावेश होतो. आर्थिक वाढ, प्रगती, आउटसोर्सिंग, व भारतातील कॉल सेंटर्स अशा अनेक विषयांवर यात प्रकाश टाकण्यात आला आहे.

**भारतात आऊटसोर्सिंगची सुरूवात, वाढ व प्रगती:**

''भारतात बिझीनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग'' म्हणजे बीपीओ हा आता कॉल सेंटर्सचा मध्यवर्ती भाग बनला आहे. या प्रारूपानुसार मुख्य उद्योग संस्थेतील काही कामे ही एखाद्या चांगल्या उपकंपनीकडे सोपवली जातात त्यामुळे कर्मचाऱ्यांसाठी लागणारा खर्च कमी होतो. आऊट सोर्सिंगची ही संकल्पना या तार्किक मुद्यावर आधारित आहे. असे असले तरी आऊटसोर्सिंग हा प्रकार आपल्याकडे येण्यापूर्वी जगात अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. **१९८० पासून अशा बीपीओंवरचे वाढणारे अवलंबित्व पाश्चिमात्य जगातील विकसित देशांमध्ये असलेल्या उद्योगांमधील तीव्र स्पर्धेचा तो परिणाम होता.**

खर्च कमी करण्याच्या नावाखाली अनेक आस्थापने त्यांची कमी महत्वाची कामे ही पूरक आस्थापनांकडे सोपवतात. ही पूरक आस्थापने जिथे मनुष्यबळ स्वस्त आहे अशा ठिकाणी असतात, त्यात मुख्यसंस्थेशी त्यांचे काम एकात्म होणारे असते किंवा मुख्य कंपन्यांच्या गरजा पूर्ण करतील अशाच उप-कंपन्यांना बीपीओचे काम दिले जाते. असे अनुकूल वातावरण असलेल्या परदेशी उप-कंपन्यांनाही मग बीपीओची कामे मिळू लागली. पहिल्यांदा विकसित देशातच छोटी शहरे व ग्रामीण भागात बीपीओ आस्थापनांची सुरूवात झाली. शहरात जास्त वेतन द्यावे लागते त्या मानाने ग्रामीण भागात ते कमी द्यावे लागते इतर खर्चही तुलनेने कमी असतो त्यामुळे असे करण्यात आले. पाश्चिमात्य जगातील आउटसोर्सिंग म्हणजे बाहेरून कामे करून घेण्याचा प्रकार म्हणजे देशातल्या देशातले आऊससोर्सिंग होते, केवळ किरकोळ कामे या शहरे व गावांमधील कंपन्यांकडून करून घेतली जाऊ लागली होती.

**त्यापाठोपाठ १९९० च्या मध्यावधीत आउटसोर्सिंग हा पर्याय पाश्चिमात्य देशात दुसऱ्या टप्प्यात पोहोचला. ही कामे परदेशात दिली जाऊ लागली बीपीओने सीमोल्लंघन केले होते.** भारत, फिलीपीन्स सारख्या दक्षिण जगातील देशांमध्ये कमी पैशात ही कामे करून मिळू लागली. त्यामुळे **परदेशांमध्ये म्हणजे विकसनशील व जेथे मनुष्यबळ स्वस्त आहे अशा ठिकाणी बीपीओ व्यवसायाने या काळात चांगलेच बाळसे धरले. माहिती व तंत्रज्ञानाच्या जगाने टाइम झोन, कुशल व स्वस्त कामगार या दोन्ही बाबींची पूर्तता केली.**

१९९० च्या मध्यावधीत भारतातील नवीन पिढीला विशेष करून माहिती तंत्रज्ञान उद्योग सेवा व बीपीओ क्षेत्रातील या कामाने आकर्षिक केले. या काळात भारतात बीपीओ व आयटी आऊटसोर्सिंगची एक लाटच आली. **आज जागतिक आऊटसोर्सिंगमध्ये भारत हा आता महत्वाचा भागीदार बनला आहे. त्यामुळे आयटी, आयटीइस, बीपीओ ही क्षेत्रे भारतीय अर्थव्यवस्थेतील फार वेगाने वाढणारी क्षेत्रे आहेत.** नॅशनल असोसिएशन ऑफ सॉफ्टवेअर अँड सर्व्हिसेस कंपनीजच्या (नासकॉम) च्या अंदाजानुसार माहिती तंत्रज्ञान उद्योग व बीपीओ (बिझेनेस प्रोसेस आऊटसोर्सिंग) हे भारतातील दोन उद्योगांचा आपल्या एकूण देशांतर्गत उत्पादनातील वाटा १९९८ मध्ये १.२ टक्के होता तो २०१२ मध्ये ७.५ टक्के झाला. २०१३-१४ मधील आर्थिक सर्वेक्षणानुसार, भारतात जगातील आऊटसोर्सिंगची ५५ टक्के बाजारपेठ आहे त्यात आपण अभियांत्रिकी व पायाभूत उद्योग सोडून ही आकडेवारी धरलेली आहे. २०१२ मध्ये ही बाजारपेठ ५२ टक्के होती. एका पाहणीनुसार २०१३-१४ या वर्षात माहिती तंत्रज्ञान व बीपीओ क्षेत्राने (हार्डवेअर वगळता) १०.३ टक्के इतकी म्हणजे १०५ अब्ज डॉलरची वाढ नोंदवली आहे. राष्ट्रीय माहिती तंत्रज्ञान धोरणानुसार आयटी व आयटीईएस उद्योगातील विस्तार मोठा असून २०११-१२ मध्ये तो १०० अब्ज डॉलरचा होता. तो २०२० पर्यंत ३०० अब्ज डॉलरपर्यंत जाईल व निर्यात २०११-१२ मध्ये ६९ अब्ज डॉलरची होती ती २०२० पर्यंत २०० अब्ज डॉलर होईल, असा अंदाज आहे. **रोजगाराच्या बाबतीत सांगायचे तर या क्षेत्राची कामगिरी नेत्रदीपक आहे त्यात**

**२०१३-१४ या वर्षात ३१ लाख लोकांना थेट रोजगार मिळालेला आहे. अप्रत्यक्ष रोजगार १ कोटी लोकांना मिळालेला आहे.**

आयटी- आयटीइएस व बीपीओ उद्योगांची भारतातील वाढ दोन टप्प्यात विभागता येईल. पहिल्या टप्प्यात म्हणजे १९९० ते २००५ या काळात आंतरराष्ट्रीय क्षेत्रात रोजगार वाढला. या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर आऊटसोर्सिंग करण्यात आलेल्या उद्योगांमध्ये लोकांना कामे मिळाली. त्यानंतर म्हणजे २००५ नंतरच्या टप्प्यात आयटी, आयटीइएस व बीपीओ यांचा स्थिर गतीने विस्तार चालू राहिला. २००९ मध्ये देशांतर्गत क्षेत्रात रोजगार वाढला व साडेचारलाख लोकांना काम मिळाले (रमेश, २००९) व एकूण वाढीचा कल हा रोजगार संधींच्या वाढीकडे होता. नासकॉमच्या अंदाजानुसार आयटी-बीपीओची बाजारपेठ देशात वर्ष २०१२ मध्ये २०.७ टक्के दराने वाढली.

**कॉल सेंटरच्या कामाची संकल्पना:**

भारतात आयटी व आयटीइएस तसेच बीपीओ क्षेत्रे यात कॉल सेंटर हा महत्वाचा भाग होता, यात वेगवेगळ्या प्रकारची कामे व पदे होती. सॉफ्टवेअर व हार्डवेअर विकास, मेडिकल ट्रान्सक्रिप्शन, वर्ड प्रोसेसिंग व डेस्कटॉप प्रिंटिंग, विधी व आर्थिक प्रक्रिया, कार्यालयातील इतर कामे, डिझाइन व ग्राफिक तयार करणे अशा अनेक कामांचा त्यात समावेश होता. कॉल सेंटर्सनी केवळ देशांतर्गत उत्पन्नाला हातभार लावला असे नाही तर या आस्थापनांनी मोठ्या प्रमाणावर रोजगारही दिला.

कॉल सेंटर या शब्दावरूनच लक्षात येते यात बरेच काम फोनशी निगडित आहे, त्यात दूरध्वनी विक्री, विपणन, ग्राहक मार्गदर्शन व काळजी हे तर होतेच शिवाय काही कॉल सेंटर ही बिलिंग, वेतन व ग्राहकांना मदत( माहिती संग्रहित करणे) अशी कामे करीत होती. जागतिक पातळीवर व भारतात अनेक कॉल सेंटर्सही आवाजाशी संबंधित कामावर आधारित होती पण याचा अर्थ ती केवळ दूरध्वनीद्वारेच चालत होती असेही नाही. त्याशिवाय चालणारी कॉल सेंटर्सही होती, ती इंटरनेटवरील आंतरक्रिया म्हणजे इमेल संदेशवहनावर आधारित होती. ग्राहकांच्या दूरध्वनी यादीच्या आधारे भारतात बंदिस्त (कॅप्टिव्ह) व त्रयस्थ (नॉन कॅप्टिव्ह) अशी दोन प्रकारची कॉल सेंटर्स होती. कॅप्टिव्ह सेंटर्समधून केवळ एकाच ग्राहकाच्या गरजा पूर्ण होत असत नंतर अनेक ग्राहकांच्या गरजा पूर्ण करणारी आस्थापने आली. भारतात सुरूवातीची सर्व कॉल सेंटर्सही कॅप्टिव्ह स्वरूपाची होती आता त्यातील बरीच त्रयस्थ स्वरूपाची म्हणजे नॉन कॅप्टिव्ह झाली आहेत. त्यांचे काम व कर्मचारी समूह हे कामाच्या स्वरूपानुसार तयार केले जातात, विविध प्रक्रिया असलेल्या उद्योगात हे कर्मचारी एकसंघ नसतात, त्रयस्थ म्हणजे थर्ड पार्टी कॉल सेंटरमध्ये ते एकत्र असतात पण त्यांची कामे वेगवेगळी असतात. कॉल सेंटर्स ही एकसंध नसतात. त्यांचा आकार, स्वरूप, प्रक्रिया, कामाच्या वेळा, वेतन, कामाच्या अटी, ग्राहक, कामगारांचा सामाजिक-आर्थिक स्तर वेगवेगळा असतो.

**आंतरराष्ट्रीय व देशी कॉल सेंटर्स:**

आयटी, आयटीइएस व बीपीओ क्षेत्रात भारतामध्ये कॉल सेंटर्सचा प्रसार दोन टप्प्यात झाला. पहिला टप्पा हा १९९० च्या मध्यावधीत सुरू झाला व त्यात या उद्योगाचा प्रवेश व आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर्सचा प्रसार ही वैशिष्ट्ये होती. त्यातील बरेचसे काम परदेशातून आपल्याकडे पाठवले जात होते त्यात फोन द्वारे किंवा इंटरनेटद्वारे कामे केली जात असत, ती कामे करण्यासाठी व तिकडच्या ग्राहकांना त्याची माहिती देण्यासाठी इंग्रजी भाषा येणे आवश्यक होते. पण कालांतराने म्हणजे एकविसाव्या शतकाच्या मध्यावधीत या उद्योगाची मोठी वाढ झाली व देशी कॉल सेंटर्सही सुरू झाली तेथे देशातील ग्राहकांनाच माहिती देण्याचे काम करावे लागत असे मग त्यात इंग्रजी, हिंदी इतर प्रादेशिक भाषा वेगवेगळ्या प्रमाणात आत्मसात करणे आवश्यक होते. आंतरराष्ट्रीय व देशी कॉल सेंटरमध्ये फरक असा होता की, त्यांची भाषा वेगळी होती त्याचबरोबर इतर काही बाबींत फरक होते. काही अभ्यास अहवालानुसार आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरमध्ये कर्मचारी सुशिक्षित व उत्तम इंग्रजी येणारे होते व आर्थिकदृष्ट्याही संपन्न होते. ते शहरी श्रीमंत वर्गातील होते. देशी कॉल सेंटर्समधील लोक हे ग्रामीण व शहरी असा दोन्ही भागातील होते व सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास वर्गातील होते.

शैक्षणिक व कौशल्य पातळीही कमी होती. या फरकामुळे अर्थातच त्यांच्या कामातही फरक होता हे उघड आहे. तेथील काम व असुरक्षितता यावर चर्चा करणेही आवश्यक ठरणार आहे.

**कॉल सेंटरमधील असुरक्षित रोजगार व कामगार :**

कॉल सेंटर्सबाबत जे सुरूवातीचे अभ्यास झाले त्यानुसार कॉल सेंटर्सची सुरूवातीची वाढ ही कमी कामगारांच्या आधारे झाली ( रमेश २००४- टेलर अँड बेन, २००५, उपाध्याय अँड वसावी, २००६). या अभ्यासातील विश्लेषणानुसार, जरी कॉल सेंटरमध्ये लठ्ठ पगार व इतर क्षेत्रापेक्षा चांगले वातावरण होते तरी तेथे रोजगाराची सुरक्षितता नव्हती, लवचिक रोजगार प्रणालींचा परिणाम होत असे, अयोग्य सामाजिक सुरक्षा उपाययोजना होत्या, कामही अतिशय कडक नियंत्रण प्रणालीनुसार चालत होते, त्यात करियर व कौशल्य विकासाला वाव नव्हता. कर्मचाऱ्यांची सामूहिकता नव्हती, सामाजिक संवाद नव्हता. या क्षेत्रातील रोजगार असुरक्षितता ही गंभीर होती. कंत्राटे व प्रकल्प या आधारे रोजगार दिले जात होते. बीपीओ कंपन्यांना कंत्राटी कामे मिळत होती त्याचा हा परिणाम होता. कर्मचाऱ्यांची स्थिती निर्माण होत नसे तर ती केली जात असे, कायमचा रोजगार व सुरक्षा यांची संगती नव्हती. जागतिक साखळी उद्योगांच्या अनुषंगाने किंमत कमी करणे हा एकच उद्देश त्यात होता त्यामुळे कामाचे सुसूत्रीकरण करताना कामगारही भरडले जात असत. तेथील कामाची कडक पद्धती, निगराणी व नियंत्रण (टेलर अँड बेन २००५) यामुळे हे सर्व शक्य झाले होते. टेलरिस्टिक निकष हा नवीन अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा घटक असून त्यानुसार हे कॉल सेंटरमधील कर्मचारी म्हणजे कामाचे ओझे वाहणारे सायबर हमाल ठरले (रमेश २०१४). विचित्र वेळा, कर्मचाऱ्यांची खरी नावे लपवून टोपण नावे ठेवणे, विचित्र निकष, ग्राहकाभिमुख सेवा यामुळे या कर्मचा-यांना समाजबाह्यतेचा व तेथील परिस्थतीला काही अर्थ नसल्याचा अनुभव येत होता. कामगार कायद्यानुसार तिथे संघटना व प्रतिनिधीत्व किंवा असुरक्षिततेविरोधात बोलण्याची मुभा नव्हती (रमेश २००७). व्यवस्थापन धोरणे अशी होती कामगाराला एकटे पाडले जाईल, त्याचे सामाजिकीकरण हे एका मर्यादेत राहील, त्यामुळे मनुष्यबळ विकासाची परिमाणे बदलली, संघटित होण्यापासून कर्मचाऱ्यांना रोखले जाऊ लागले, त्यामुळे पारंपरिक संघटना व सामूहिकतेच्या मुद्द्यांना दूर ठेवण्यात आले (नरोन्हा व डिक्रूझ २००६). एकूणच पहिला टप्पा हा या कॉल सेंटरच्या भारतातील प्रवेशाचा होता. (१९९० चा मध्यावधी ते २००५), यावरील संशोधनाचा टप्पा हा रोजगाराचा दर्जा व जागतिक आऊटसोर्सिंग उद्योगातील इतर धोके समजून घेणे हा होता. त्यात असे दिसून आले की, नव्या पिढीला या उद्योगांमध्ये सुरक्षितता मिळाली नाही, धोके वाढले, विशिष्ट दर्जाचे काम मिळू शकले नाही.

**कॉल सेंटरमधील वाढती असुरक्षितता :**

कॉल सेंटरमधील रोजगाराचा दर्जा दुसऱ्या आउटसोर्सिंग क्रांतीच्या टप्प्यात म्हणजे सध्याच्या टप्प्यात घसरला. देशी क्षेत्रात आउटसोर्सिंग काही प्रमाणात वाढले. देशी कॉल सेंटरबाबतच्या पहिल्या काही अभ्यासात देशी कॉल सेंटर ही आंतरराष्ट्रीय कॉल सेंटरपेक्षा भिन्न असल्याचे दिसून आले. (रमेश २०१०) हा फरक तेथील कर्मचाऱ्यांच्या स्वरूपातील होता, संघटनात्मक, कामाच्या अटी, कर्मचारी संबंध यातील होता. कामाच्या वेळात बदल होत होते. ग्राहकांच्या गरजा बदलत होत्या. देशी क्षेत्रात कमालीची रोजगार असुरक्षितता होती, कामाचे वातावरणही चांगले नव्हते, वेतन कमी होते, कौशल्याच्या गरजा कमी होत्या व नियंत्रण व्यवस्था फार लवचिक नव्हत्या. आंतरराष्ट्रीय कॉल सेंटर तुलनेत अनेक देशी कॉल सेंटर हे किमान पायाभूत सुविधा, कमी दर्जाचे तंत्रज्ञान व कामाच्या ठिकाणी अपुऱ्या सुविधा असताना चालवले जात होते. कामाच्या जागा प्रशस्त नव्हत्या बंदिस्त होत्या. तेथे कामावर लक्ष ठेवून घाम गाळून काम करून घेण्याची व्यवस्था मात्र होती. कर्मचाऱ्यांवर कडक नियंत्रणे होती. कामाचे तास जास्त होते, व्यवस्थापन हुकूमशाही पद्धतीने वागत होते. अशा देशी कॉल सेंटर्समध्ये पिळवणूक होत होती. कौशल्ये सुधारण्यास फारसा वाव नव्हता, कामगारांची एकजूट तर नव्हतीच. कमी दर्जाचे काम, रोजगाराची असुरक्षितता होती. सामाजिक सुरक्षितता व कामगार कल्याण उपायांचा अभाव होता. दुसऱ्या

एका अभ्यासानुसार (टेलर २०१३) असे सांगण्यात आले की, या टप्प्यात आयटी व आयटीईएस बीपीओ क्षेत्रात आंतरराष्ट्रीय तुलनेत फारशी रोजगार आकर्षकता राहिलेली नाही.

**निष्कर्ष :**

आतापर्यंतच्या चर्चेनुसार, जरी कॉल सेंटरमधील रोजगार हा संघटित स्वरूपाचा वाटत असला तरी तो तसा नाही. वरकरणी त्यात संघटित कामाची ठिकाणे, नियमांचे पालन, तुलनेने ठोस अटी, कामाच्या ठिकाणी चांगली स्थिती असल्याचे वाटत होते पण त्यात अशा अनेक गोष्टी आहेत की, ज्यामुळे ही कॉल सेंटर्स किंवा बीपीओ हे असंघटित क्षेत्राकडे झुकतात. **रोजगाराची असुरक्षितता व इतर समस्या लक्षात घेता कॉल सेंटर व बीपीओ उद्योगात काही धोरणे, कायदेशीरपणा, नियमावली, कामगार कल्याण अशा उपाययोजनांची गरज आहे. इतर काही व्यवसायांप्रमाणे यात माहिती तंत्रज्ञान अर्थव्यवस्थेत योगदान देणाऱ्या या क्षेत्रातील रोजगार असुरक्षिततेचे आणखी सखोल विश्लेषण करणे गरजेचे आहे**

**संदर्भ :**


- एनसीयूएस (२००९)- द चॅलेंज ऑफ एम्प्लॉयमेंट इन इंडिया- अन इनफॉर्मल इकॉनॉमी परस्पेक्टिव्ह, फायनल रिपोर्ट ऑफ द नॅशनल कमिशन फॉर एंटरप्राइजेस इन अनऑरगनाइज्ड सेक्टर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली
- नरोन्हा, अर्नेस्टो अँड डिक्रूझ प्रेमिला (२००६)- ऑरगनायझिंग कॉल सेंटर एजंटस- इमर्जिंग इश्यूज, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली, व्हॉल्यूम ४१, मे २७.
- रमेश, बाबू पी (२००४) सायबर कुलीज इन बीपीओ, इनसिक्युरिटीज अँड व्हलनरेबीलिटीज ऑफ नॉन स्टँडर्ड वर्क, इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली, व्हॉल्यूम ३९, नंबर ५, जानेवारी ३१ ते फेब्रुवारी ६.
- रमेश बाबू पी (२००७), मोबिलायझेशन अँड ऑरगनायझेशन ऑफ आयटीइएस -बीपीओ सेक्टर लेबर इन इंडिया स्टेटस, कन्स्ट्रेन्टस अँड इमर्जिंग ट्रेन्डस, पेपर प्रेझेंटेड इन द इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन लेबर अँड चॅलेंजेस ऑफ डेव्हलपमेंट, ग्लोबल लेबर युनिव्हर्सिटी, युनिव्हर्सिटी ऑफ विटवॉटर्सँड, जोहान्सबर्ग, साऊथ आफ्रिका, १-३ एप्रिल.
- रमेश बाबू पी (२००९), डिसेंट वर्क इन ग्लोबल प्रॉडक्शन सिस्टीम्स- अ स्टडी ऑफ इंडियाज आयटी सर्व्हिसेस अँड आयटीइएस- बीपीओ सेक्टर, रिपोर्ट सबमिटेड टू आयएलओ - जेआयएलपीटी फिफ्थ राउंट जॉईंट इनव्हेस्टिगेटिव्ह स्टडीज, इंटरनॅशनल लेबर ऑरगनायझेशन, बँकॉक.
- रमेश बाबू पी (२०१०)- चेंजिंग प्रोफाइल्स ऑफ वर्क ऑर्गनायझेशन इन इंडियाज सर्व्हिस सेक्टर- अ केस स्टडी ऑफ डोमेस्टिक काल सेंटर्स, लेबर अँड डेव्हलपमेंट व्हॉल्यूम १७.
- टेलर पी अँड बेन पी.एम (२००५) इंडिया कॉलिंग टू द फार अवे टाऊन्स- द कॉल सेंटर लेबर प्रोसेस अँड ग्लोबलायझेशन, वर्क , एम्प्लॉयमेंट अँड सोसायटी, व्हॉल्यूम १९, नंबर २
- टेलर पी (२०१३)- द एक्सपिरियन्स ऑफ द वर्क इन इंडियाज डोमेस्टिक कॉल सेंटर इंडस्ट्री, द इंटरनॅशनल जर्नल ऑफ ह्यूमन रिसोर्स मॅनेजमेंट, व्हॉल्यूम २४ नंबर २
- उपाध्या, कॅरोल अँड वसावी ए.आर. (२००६), वर्क, कल्चर अँड सोसायटी इन इंडियन आयटी इंडस्ट्री- अ सोशॉलॉजिकल स्टडी, फायनल रिपोर्ट सबमिटेड टू आयडीपीएडी, स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अडव्हान्सड स्टडीज, बंगलोर.



*(**बाबू पी. रमेश-** लेखक इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंटरडिसीप्लिनरी एन्ड ट्रान्सडिसीप्लिनरी स्टडिज् या विभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत. संपर्कासाठी **ईमेल-** babu@ignou.ac.in)*

# स्वच्छ भारत - आव्हाने आणि पुढील वाटचाल

*स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षाही महत्वाची आहे*

**- महात्मा गांधी**



**एकदा का उद्दिष्टये ठरविले की, उद्दिष्टपुर्तीसाठी यंत्रणा कार्यरत होते. कार्यरत यंत्रणेला बऱ्याचशा अडीअडचणींना, तांत्रिक, सामाजिक आणि आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागते. परंतु सामाजिक, आर्थिक उद्दिष्टये ही न थांबणारी असतात.**

**'स्वच्छ भारत' हे स्वप्न, हे उद्दिष्ट असेच धावते राहणार जोपर्यत प्रत्येक नागरिकाला स्वच्छतेचे बाळकडु पचविण्याची सवय जडत नाही. या लेखात स्वच्छतेची आव्हाने आणि उपाय योजनांवर जोर देण्यात आला आहे. महात्मा गांधीनी त्यांच्या संपूर्ण कारकीर्दीत स्वच्छते संबंधि लोकांमध्ये जनजागृतीचे कार्य केले. त्यांच्या शिकवणीच्या आधारावर उद्दिष्टये ठरविले गेलीत, राबविण्यात आला, काही आव्हानांना हवे सामर्थ्य पुढे जाण्यासाठी आणि पिढयानुपिढया सर्वकष स्वछता तत्व अवलंबिण्यासाठी, आवश्यकता आहे सखोल अभ्यासाची**

स्वच्छ भारत अभियानात २०१९ पर्यंत व्यक्तिगत, सामूहिक आणि समुदायांसाठी शौचालये बांधून देशाला उघड्यावरील शौचापासून मुक्त करणारा (Open Defecation Free) भारत बनवण्याची योजना असून ग्रामपंचायतीही घन व द्रवरुप कचरा व्यवस्थापन उपक्रम राबवून त्याद्वारे गावे स्वच्छ ठेवतील. २०१९ पर्यंत सर्व गावांमध्ये पाईपलाईन्स टाकण्यात येतील, ज्यामुळे मागणीनुसार प्रत्येक कुटुंबात नळ जोडणी देणे शक्य होईल. केंद्र व राज्य सरकारची सर्व मंत्रालये, कंपन्यांवरील सामाजिक जबाबदारी (CSR) निधी आणि द्विपक्षीय तसेच बहुपक्षीय अर्थसाह्य त्याबरोबरच असे सहाय्य मिळवण्यासाठीचे नाविन्यपूर्ण मार्ग शोधण्यातूनच हे साध्य करायचे आहे. जगाच्या लोकसंख्येपैकी एक षष्ठमांश म्हणजे एक अब्ज २१ कोटी लोक भारतात राहतात. १९८० च्या दशकाच्या सुरूवातीला ग्रामीण लोकसंख्येपैकी फक्त एक टक्का लोकसंख्येचा अंतर्भाव स्वच्छतेच्या सुविधांमध्ये झाला होता. २०११ च्या जनगणनेनुसार, भारतीय लोकसंख्येच्या ७२.२ टक्के लोकसंख्या म्हणजे १६ कोटी ७८ लाख कुटुंबे ६ लाख ३८ हजार गावांमध्ये राहतात. त्यापैकी फक्त पाच लाख ४८ हजार (३२.७ टक्के ) घरांमध्ये शौचालयाच्या सोयी उपलब्ध आहेत. याचा अर्थ असा की, आजही ग्रामीण भागातील ६७.३ टक्के घरे स्वच्छतेच्या सुविधांपासून वंचित आहेत.नंतर २०१२-१३ मध्ये पेयजल व स्वच्छता मंत्रालयातर्फे करण्यात आलेल्या आधारभूत सर्वेक्षणानुसार, ४०.३५ टक्के ग्रामीण घरांमध्ये शौचालयाच्या सोयी उपलब्ध झाल्याचे आढळले.

### आव्हाने

ग्रामीण भागातील ५९ कोटी लोक आजही उघड्यावर शौचाला बसतात. लोकसंख्येच्या मोठ्या हिश्शाची उघड्यावर शौच करण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. त्यापैकी अनेकांकडे शौचालय असुनही ते उघड्यावर शौचाला जाणे पसंत करतात. त्यामुळे शौचालय वापरण्याच्या गरजेबाबत मोठया प्रमाणावरील ग्रामीण लोकांच्या वर्तनात बदल घडवून आणणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. त्याशिवाय मनरेगा आणि निर्मल भारत अभियान (NBA) यांच्यात समन्वय साधणे, शौचालयाचा वापर करण्यासाठी पाण्याची गरज भागवणे, बांधलेली परंतु वापरात नसलेल्या किंवा बंद पडलेल्या शौचालयांचा प्रश्न, ग्रामीण भागात स्वच्छता व्यवस्था पाहण्यासाठी पुरेशा समर्पित कर्मचाऱ्यांची कमतरता हे अन्य प्रश्नही सोडवावे लागतील.

## पुढील वाटचाल

मानसिकता बदलणे हे अत्यंत महत्वाचे आहे. आयईसीचा (माहिती, शिक्षण आणि दळणवळण) बहुतांश निधी हा राज्य सरकारांकडे असल्याने, त्यांनी विद्यार्थी, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, डॉक्टर्स, शिक्षक, गट समन्वयक यांच्या माध्यमातून घरोघरी भेटी देऊन व्यक्तीव्यक्तीमध्ये सुसंवाद साधण्यावर भर दिला पाहिजे. तसेच लघुचित्रपटांच्या सीडीज, दूरदर्शन, रेडिओ, अंकीय (Digital) चित्रपट, पत्रके याद्वारे माहितीचे वितरण केले जाईल. सुरक्षित स्वच्छतेच्या सवयींचा प्रसार करून लोकांची मानसिकता बदलण्याचा संदेश देण्यासाठी स्थानिक तसेच राष्ट्रीय क्रीडा/चित्रपटातील लोकप्रिय खेळाडू, अभिनेत्यांचे सहकार्य याकामी राज्यांनी निर्णय घेतले पाहिजे. पाईपने पाणीपुरवठा व घरातील शौचालयांचा उपक्रम हा जिल्हा पातळीवरील संयुक्त डीपीआरद्वारे (विस्तृत प्रकल्प अहवाल) राबवला जाईल, ज्यात पाणी व स्वच्छतेच्या सोयींचे खालून वरपर्यंत नियोजन करून राज्य पातळीवरील योजना मंजुरी समितीची त्यास मंजुरी घेतली जाईल. अशी शौचालये आणि दारिद्र्यरेषेच्या वरील कुटुंबांसाठीची शौचालयेही सूक्ष्म अर्थसाह्य आणि बँकांच्या प्राधान्यक्षेत्रातील कर्जाद्वारे पुन्हा बांधता येतील. राज्य पातळीवरील प्रशासकीय पायाभूत रचना मजबूत करण्यासाठी व अनावश्यक दुपटीने काम तसेच सध्याचा संभ्रम टाळण्यासाठी पेयजल पुरवठा आणि स्वच्छता विभागांच्या एकत्रीकरणाचा प्रस्ताव आहे. गट समन्वयक आणि स्वच्छतादूतांना आता कंत्राटी पद्धतीवर नेमले जात आहे. माहितीचे प्रसारण आणि लोकांना प्रेरित करण्यासाठी अशासकीय संस्था (एनजीओ), स्वयंसहाय्यता गट, शालेय विद्यार्थी, स्थानिक महिला गट यांच्याद्वारे व्यक्तीव्यक्तींमध्ये संवाद साधण्याची शक्यताही पडताळून पाहिली जाईल. याच कार्यक्रमांतर्गत, कंपनी कायद्यांतर्गत कंपनी म्हणून एक विशिष्ट उद्देश्य माध्यम (SPV) स्थापन करण्याचाही प्रस्ताव आहे.कंपन्याचा सीएसआर सह सरकारी व बिगरसरकारी निधीच्या वितरणाबरोबर सीएसआरच्या प्रकल्पांची अंमलबजावणीही ती करेल. केंद्र व राज्य सरकारांनी सोपवलेल्या जल व स्वच्छता जबाबदारीसाठी विशेष प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणूनही ती काम करणार आहे.तसेच महसुलाचा ओघ असलेले सार्वजनिक शौचालये, सार्वजनिक जल शुद्धीकरण प्रकल्प यांसारखी प्रकरणेही कंपनी हाताळणार आहे. राज्यांना गरज भासल्यास, पीएमसी जिल्हा पातळीवरील पाणीपुरवठा व स्वच्छतेसाठी डीपीआर तयार करणे, विविध जिल्ह्यांमधून जाणाऱ्या गावागावांमधील पाईपलाईन प्रकल्पांचे कामही हाती घेईल, तसेच केंद्र व राज्य सरकारांकडून आर्थिक मोबदल्याच्या आधारावर आयईसी/आयपीसीची कामेही करेल.

२०१३ मध्ये केलेल्या आधारभूत सर्वेक्षणात, राज्यांनी देशात खालील स्वच्छतेच्या सोयी पुरवणे आवश्यक असल्याचा अहवाल दिला आहे.

| घटक | संख्या | |
|---|---|---|
| **भारतातील एकूण घरे** | **१७ कोटी १३ लाख** | |
| १ | आयएचएचएल | ११ कोटी ११ लाख |
| २ | शाळांमधील शौचालये | ५६,९२८ |
| ३ | अंगणवाडी शौचालये | १,०७,६९५ |
| ४ | सामूहिक स्वच्छता संकुले | १,१४,३१५ |

**योजनेत समावेश नसलेली घरे**

| | |
|---|---|
| आधारभूत सर्वेक्षणात शौचालयांची आवश्यकता असलेली एकूण घरे | ११ कोटी ११ लाख |
| लाभार्थी नसलेले दारिद्र्यरेषेवरील घरे | ०.८८ कोटी |
| बंद पडलेली शौचालये | १ कोटी ३९ लाख |
| दारिद्र्यरेषेखालील व वरील पात्र घरे | ८ कोटी ८४ लाख |

अशा तऱ्हेने, स्वच्छ भारत अभियान/एनबीए अंतर्गत, पुढील पाच वर्षांत २०१९ पर्यंत प्रतिवर्षी १७७ लाख याप्रमाणे ८ कोटी ८४ लाख घरांमध्ये स्वतंत्र शौचालये पुरवावी लागणार आहेत. स्वच्छ भारत अभियान साध्य करण्यासाठी, २०१९ पर्यंत शौचालये असलेल्या घरांच्या संख्येतील सध्याची तीन टक्के वाढ तिपटीने म्हणजे १० टक्के केली जाईल. सध्या दररोज १४,००० शौचालये बांधली जात असून या कृती योजनेत दररोज ४८,००० शौचालये बांधण्याचा प्रस्ताव आहे. तसेच आणखी २ कोटी २७ लाख शौचालये बांधण्यासाठी (दारिद्र्यरेषेवरील अपात्र, बंद पडलेल्या शौचालयांसह) पाठपुरावा, सहकाऱ्यांचा दबाव यासह चालना देणारी यंत्रणा राबवणे, माहिती, शिक्षण आणि संदेशवहन व आंतरव्यक्ती संवाद पद्धती वापरून त्याचबरोबर नाबार्ड/सिडबीची मदतही घेण्यात येणार असून ती सूक्ष्म अर्थसाह्य आणि प्राधान्य क्षेत्रातील उसनवारीसह कर्जाची व्यवस्था करेल. प्रतिलाभार्थी ९०० रुपये जन भागीदारी योजनाही चालू राहील. अधिक चांगले शौचालय हवे असल्यास लाभार्थी यापेक्षा जास्तही योगदान केव्हाही देऊ शकतो.

**वितरण यंत्रणा**

ग्रामीण भागात स्वच्छता सोयींची वितरण यंत्रणा मजबूत करण्यासाठी खालील बाबींची अंमलबजावणी केली जाईल.

जल व स्वच्छता सुविधांबाबत राज्यांशी एक सामंजस्य करार केला जाईल, ज्यात राज्ये २०१९ पर्यंत स्वच्छ भारत अभियानास वचनबद्ध राहतील व २०१५ पर्यंत, जल योजना आणि स्वच्छता सुविधांच्या अंमलबजावणी करण्यास राज्य पातळीवरील एकीकृत रचना तयार करतील, ज्यात जलयोजना व स्वच्छताविषयक सुविधांसाठीच्या निधींमध्ये आंतरिक विनिमय करता येईल. केंद्र सरकारला निधीची अतिरिक्त किंमत मोजावी लागू नये म्हणून राज्य सरकारांना अगदी योग्य वेळेत निधी जारी करण्याची कल्पना केंद्राने स्वीकारली पाहिजे. जल आणि स्वच्छता या दोन्हीसाठी एखाद्या जिह्याचा प्रत्यक्ष कार्यक्षेत्र अहवाल/जिल्हा प्रकल्प अहवालावर आधारित निधी जारी करण्यात यावा. केंद्रीय स्तरावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून काम करणारी एसपीव्ही (स्थापन करण्यात येणार असलेली) सीएसआरचा निधीचा ओघ वळवेल तसेच सार्वजनिक शौचालये, जलशुद्धीकरण प्रकल्प राबवेल. एसपीव्ही माहिती, शिक्षण आणि संदेशवहन (आयईसी) व आंतरव्यक्ती संवाद पद्धती (आयपीसी) हे उपक्रमही परिणामकारकरित्या राबवेल. शौचालयांच्या बांधकामांसाठी अनुदानास जी कुटुंबे पात्र नाहीत अथवा स्नानासाठी भरपूर जागा असलेल्या उत्तम शौचालये बांधण्यासाठी ज्यांना निधीची गरज आहे, अशा कुटुंबांना नाबार्ड/सिडबी यांसारख्या संस्थांकडून अथवा तारणाशिवाय प्राधान्य क्षेत्राचे कर्ज देणाऱ्या बँकांच्या माध्यमातून लहान कर्जे मिळण्याची व्यवस्था शक्य होईल. तालुका स्तरावर स्वच्छता समन्वयकांची एक मजबूत फळी उभारली जाईल, जी स्वच्छता उपक्रम राबवण्याची क्षमता मजबूत करण्यासह माहितीचा प्रसार करण्याचे काम करेल व ग्रामपंचायतींचा मुख्य आधार राहील. देशातील प्रत्येक ग्रामपंचायतीत, सफाईचे कौशल्य धारण करणारा स्वच्छतादूत नेमून त्याला कामगिरीनुसार प्रोत्साहन भत्ता दिला जाईल. प्रत्येक घरावर संबंधित मंत्रालयाची देखरेख राहील. शिवाय, केंद्रीय व राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी गावांच्या सरपंचांशी थेट चर्चा करून माहिती घेऊ शकतील. बांधलेल्या शौचालयांच्या प्रत्यक्ष वापरासंबंधीच्या आकडेवारीवर भर देणारा वार्षिक स्वच्छताविषयक सर्वेक्षण हाती घेतले जाईल.

निर्मल ग्राम पुरस्कार बंद करण्यात येऊन त्याऐवजी पंचायत राज संस्था, ग्रामपंचायती, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा) तसेच इतर संस्था, व्यक्ती, अधिकारी, एनजीओज यांना पुरस्कार देण्याच्या व्यापक उद्दिष्टासाठी स्वच्छ भारत पुरस्कार सुरू करण्यात येईल.

**एकीकरण**

वैयक्तिक घरांमधील शौचालये (IHHL) बांधण्यासाठी मनरेगा आणि आयएवाय, सार्वजनिक स्वच्छता संकुल बांधण्यासाठी मागास प्रदेश मंजूर निधी (BGRF) तसेच शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये शौचालये बांधण्यासाठी मनुष्यबळ विकास मंत्रालय व महिला व बालविकास मंत्रालयांचे कार्यक्रम यांच्या

एकीकरणाची शक्यता पडताळून पाहिली जाईल. राष्ट्रीय पेय जल कार्यक्रमांतर्गत एकाच वेळेस वैयक्तिक घरांमधील शौचालये, शाळा व अंगणवाड्यांची शौचालये आणि सार्वजनिक स्वच्छता संकुलांसाठी पाणीपुरवठा केला जाईल. (गरज भासल्यास दोन्ही विभागांतील निधी आणि अधिकाऱ्यांची अदलाबदलही केली जाईल.) पंचायत राज मंत्रालय राजीव गांधी सशक्तीकरण योजनेंतर्गत स्वच्छतेला आपल्या उपक्रमात प्राथमिकता देत असून ग्रामपंचायतींसाठी ते उच्च प्राधान्याचे असेल. विशेषत: शाळा, अंगणवाड्यांमध्ये स्वच्छतागृहे बांधण्यास आणि सार्वजनिक शौचालये व घन आणि द्रव कचरा व्यवस्थापन प्रकल्पांसाठी त्याचबरोबर पाणी योजनांनाही खासदार/आमदार विकास निधीतून लाभ मिळवता येईल. केंद्र सरकारचे सार्वजनिक उद्योग तसेच अन्य कंपन्यांचा सीएसआर निधी मिळवण्यासाठी संपर्क वाढवायला हवा. आणखी पुढे, राज्य स्तरावरील जल आणि स्वच्छता मोहीम व जिल्हा पातळीवरील जल व स्वच्छता मोहीमेंतर्गत सीएसआर निधीचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. केवळ महिलांसाठी एकात्मिक स्वच्छता संकुले तसेच सर्व अंगणवाड्यांमध्ये शौचालये व पिण्याच्या पाणी पुरवण्यासाठी महिला व बाल विकास मंत्रालयाशी एकीकरण करावे लागेल.

सामुदायिक प्रणित संपूर्ण स्वच्छता (सीएलटीएस) - सामुदायिक प्रणित संपूर्ण स्वच्छता ही उघड्यावर विधी उरकण्याच्या सवयीचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी समुदायांमध्ये जागृती करण्याची नाविन्यपूर्ण पद्धती आहे. समुदायांना उघड्यावर विधी करण्याच्या सवयीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार करून त्यांचे विश्लेषण करणे व आपला विभाग उघड्यावर विधी करण्यापासून संपूर्ण मुक्त करणे शक्य व्हावे, यासाठी हा कार्यक्रम आहे.केवळ शौचालयाची सुविधा पुरवल्याने त्यांच्या वापराची हमी अथवा त्यातून उच्च दर्जाच्या स्वच्छता सुविधा व आरोग्य साध्य होत नाही, याची जाणीव सीएलटीएस कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी आहे. खऱ्या आणि शाश्वत सुधारणेसाठी लोकांच्या वर्तनात बदल करण्यावर सीएलटीएसमध्ये भर देण्यात आला आहे - भौतिक सुविधा देण्याऐवजी समुदायांना प्रेरित करणे व वैयक्तिक घरांमध्ये शौचालये बांधण्यावर असलेला भर वळवून उघड्यावरील विधीमुक्त क्षेत्र तयार करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा त्यात समावेश आहे. अगदी अल्पसंख्येनेही लोक उघड्यावर विधी करत असतील तर प्रत्येक जण रोगराईला बळी पडण्याचा धोका आहे, याबद्दल जागृती वाढवली पाहिजे. समुदायांच्या बदल घडवण्याच्या प्रवृत्तीला सीएलटीएस खतपाणी घालते, त्यांना प्रत्यक्ष कृती करण्यास प्रोत्साहित करते आणि नाविन्यपूर्ण उपक्रम, परस्पर सहकार्य व स्थानिक पातळीवर योग्य तोडगे काढण्यास उत्तेजन देऊन अधिकाधिक मालकीहक्काची जाणीव व शाश्वततेच्या जाणीवेने समुदायांना समृद्ध करते.यात वैयक्तिक लाभ देण्याची गरज नाही आणि राज्यांशी अधिक सखोल चर्चा करण्याची आवश्यकता आहे.तरीसुद्धा, सुरूवातीला काही एक रक्कम अनुदान म्हणून ग्रामपंचायतींना देण्याचा विचार करता येईल आणि नंतर एकदा संपूर्ण गाव उघड्यावरील विधीमुक्त झाले की पुरस्कारही प्रदान करता येईल.

**विचारा तर खरं ?**

१. गोफेन २ नावाचा उपग्रह कोणत्या देशाने सोडला ?
२. नुकतेच निवर्तलेले बी. के. एस. अय्यंगार हे कोणत्या क्षेत्राशी संबंधित होते ?
३. बरदारबुंगा ज्वालामुखी कोणत्या देशात आहे ?
४. देशातील कोणत्या अणुऊर्जा प्रकल्पातील युनिटने नुकताच सलग ७४० तास वीजनिर्मिती करण्याचा विक्रम केला ?
५. इंडियन सुपर लीग कोणत्या खेळाशी संबंधित आहे ?
६. अर्जुन पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष कोण ?
७. जागतिक हत्ती दिन कधी असतो ?
८. नुकताच निधन झालेला हॉलिवूड अभिनेता रॉबिन विल्यम्स याला कोणत्या चित्रपटासाठी ऑस्कर पुरस्कार मिळाला होता ?
९. आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्ती घेतलेला मिरास्लाव्ह क्लोज हा कोणत्या देशाचा खेळाडू होता ?
१०. नुकत्याच निवर्तलेल्या दारोजी एरम्मा या आंध्र प्रदेशातील कोणत्या लोककलाप्रकाराशी संबंधित होत्या ?

उत्तरे : (१ ते १०)

**१. चीन, २. योग, ३. आइसलँड,**
**४. राजस्थान अणुऊर्जा प्रकल्प,**
**५. फुटबॉल, ६. कपिल देव,**
**७. ऑगस्ट २०१२, ८. गुड विल हंटिंग,**
**९. जर्मनी, १०. बुराकथा**

# आपल्याला माहित आहे का?

**ब्रिक्स राष्ट्रे-नव्या युगात प्रवेशासाठी सहकार्य**

**सहकार्यावर आधारित भारत चीन व्यापार वृद्धिंगत करार - महाराष्ट्र प्रकाश झोतात**

ब्रिक्स देशांमधील सदस्य देशांनी घेतलेल्या खंबीर निर्णयामुळे इतर विकसत देशांच्या स्पर्धेत प्रवेश करण्याकडेच या देशांची केवळ वाटचालच सुरू झालेली नाही तर नवी विकास बँक स्थापन करण्याच्या निर्णयासारख्या निर्णयांमुळे सदस्य देशांसाठी अधिक मुक्त, मार्गदर्शक आणि विधायक धोरणे आखणे शक्य होणार आहे. या आंतरराष्ट्रीय संस्थेसाठी सुरुवातीला प्रत्येक देशामागे १०० अब्ज डॉलर रक्कम निश्चित करण्यात आली आहे.

या संघटनेतील विकसनशील देश संपूर्ण विकासाचा खऱ्या अर्थाने विचार करत आहेत. विशेषत: देशामध्ये विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी अर्थपुरवठाविषयक शिक्षण, अर्थपुरवठाविषयक सुधारणा आणि सामाजिक-आर्थिक कामांच्या क्षेत्रातील विकासाबाबत त्यांचा विचार सुरु आहे आणि जगभरातील ज्या देशांकडून ब्रिक्स देश व त्यांच्या कामांबाबत नेहमीच टीका केली जाते त्यांना या माध्यमातून उत्तर दिले जात आहे. ब्राझिल, रशिया, भारत, चीन व दक्षिण अफ्रिका हे पाच देश सहकार्याच्या आधारे देशाच्या अंतर्गत विकासासाठी पुढे सरसावले आहेत.

**'सहकार्याशिवाय विकास नाही'**

सुमारे १०० अब्ज डॉलरच्या निर्धारित भांडवलाच्या आधारे स्थापन झालेली ही बँक म्हणजे जागतिक बँक. बँकेला व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला एक पर्याय म्हणून पाहिले जात आहे. ब्रिक्स देशांची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्के आहे आणि जागतिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या या देशांचे एकूण उत्पन्न २१ टक्के आहे. गेल्या १० वर्षात विकसित अर्थव्यवस्था असलेल्या देशांचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्न ६० टक्क्यांनी वाढले आहे तर ब्रिक्स देशांच्या उत्पन्नात चार पटीनी वाढ झाल्याची माहिती, रशियाचे पंतप्रधान पुतीन यांनी ब्रिक्स परिषदेचे उद्घाटन केल्यानंतर दिली.

विविध क्षेत्रातील विकासविषयक आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये वाढ होण्यासाठी देखील ब्रिक्स देशांनी घेतलेले निर्णय फलदायी ठरले आहेत. अलीकडेच चीनच्या राष्ट्रध्यक्षांनी भारत भेट दिली. हि त्यांची भेट दोन्हीं देशामंधील बळकट होणाऱ्या व्यापारविषयक संबंधांचे अतिशय उत्तम उदाहरण आहे.

चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भारत भेटीमध्ये स्वाक्षऱ्या झालेल्या करारांमुळे दोन्हीदेशांमधील व्यापार आणि गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. या करारांमधील काही महत्वाचे करार आणि त्यांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे.

**भारतीय यात्रेकरूंना (कैलास मानसरोवर यात्रेसाठी) चीन-तिबेटकडे जाणारा एक नवा मार्ग खुला करण्यासाठी भारताचे परराष्ट्र मंत्रालयाच्या दरम्यान झालेला सामंजस्य करार.**

वैशिष्ट्य : भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री श्रीमती सुषमा स्वराज आणि चीनचे परराष्ट्र मंत्री श्री. वँग यी यांच्यात झालेल्या या करारानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या उत्तराखंडमधील लिपुलेख पास व्यतिरिक्त सिक्कीममधील नाथुला पास हा नवा मार्ग वार्षिक मानसरोवर यात्रेसाठी उपलब्ध करून दिला जात आहे. नाथुलामधून जाणाऱ्या मार्गामुळे प्रवासी वाहतुकीची क्षमता वाढणार असून यात्रेकरूंचे कष्ट विशेषत: वृद्ध यात्रेकरूंचे कष्ट आणि प्रवासाचा वेळ कमी होणार आहे.

**भारताचे रेल्वे मंत्रालय आणि चीन सरकार यांच्यात रेल्वेविषयक सहकार्यामध्ये वाढ करण्यासाठी झालेला सामंजस्य करार**

**वैशिष्ट्य** : भारत सरकारच्या रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष श्री अरुणेंद्र कुमार आणि चीन सरकारच्या राष्ट्रीय रेल्वे प्रशासनाचे प्रशासक श्री लू डाँगफू यांच्यात झालेल्या या सामंजस्य करारानुसार दोन्ही बाजूंनी रेल्वे क्षेत्रातील खालील विभागांमध्ये सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. १) रेल्वेची गती वाढवणे २) हायस्पीड रेल्वेच्या व्यवहार्यतेचा अभ्यास करणे ३) भारतीय रेल्वे कर्मचाऱ्यांचे अवजड रेल्वे वाहतुकी संदर्भात प्रशिक्षण ४) रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास ५) भारतामध्ये रेल्वे विद्यापीठाची स्थापना आदी बाबींचा यात समावेश आहे.

**भारत सरकारचे उद्योग आणि वाणिज्य मंत्रालय आणि चीन सरकारचे वाणिज्य मंत्रालय यांच्या दरम्यान व्यापार आणि आर्थिक विकासाची पंचवार्षिक योजना**

**वैशिष्ट्य**: भारत सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री (आय/सी) निर्मला सीतारामन आणि चीन सरकारचे वाणिज्य मंत्री श्री गाओ ह्युशेंग यांच्या दरम्यान झालेल्या या योजनेच्या करारानुसार समानता व परस्पर सहकार्याच्या सिद्धांतावर आधारित भारत आणि चीन यांच्यातील आर्थिक आणि व्यापार संबंधांच्या संतुलित व शाश्वत विकासाला चालना देणारे मध्यम कालावधीचे मानचित्र यामुळे निर्माण होत आहे. या योजनेची मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत १) द्विपक्षीय व्यापारातील असमतोल दूर करणे २) पाच वर्षात चीनकडून २० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होण्यासाठी गुंतवणूकविषयक सहकार्य बळकट करणे ३) पारदर्शक, स्थिर व गुंतवणुकीला अनुकूल वातावरण निर्माण करणे ४) चेंबर ऑफ कॉमर्स आणि आर्थिक क्षेत्रांमध्ये सहकार्य वृद्धिंगत करणे या महत्वाच्या करारांमध्ये मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्राला फायदेशीर असणाऱ्या करारांचाही समावेश आहे. हे करार पुढीलप्रमाणे

**मुंबई आणि शांघाय या दोन श्हरामंमध्ये दोन बहिणीप्रमाणे संबंध स्थापन करणारा 'सिस्टर सिटी रिलेशनशीप' करार**

**वैशिष्ट्य** : मुंबई शहराच्या महापौर स्नेहल आंबेकर आणि शांघायचे कार्यकारी उपमहापौर तू ग्वांगशाओ यांच्या दरम्यान झालेल्या या करारामुळे मुंबई आणि शांघाय या दोन श्हरांदरम्यान अतिशय जिव्हाळयाचे (सिस्टर सिटी रिलेशनशिप) संबंध प्रस्थापित होणार आहेत आणि त्यामुळे या दोन श्हरातील नागरिकांमध्ये परस्पर सामंजस्याने देवाणघेवाण होणार आहे.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि बेकी फोटॉन मोटर्स कं. लि. यांच्या दरम्यान महाराष्ट्रात इंडस्ट्रियल पार्क उभारण्यासाठी झालेल्या सामंजस्य करार**

**वैशिष्ट्य** : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भूषण गगराणी आणि चीनमधील बेकी फोटॉन मोटर कं. लिं. चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री वँग जिनयू यांच्या दरम्यान झालेल्या या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्रात पुण्याजवळ १२५० एकरचे औद्योगिक पार्क उभारण्यात येणार आहे. त्यामुळे क्लस्टर डेव्हलपमेंट आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार संधी उपलब्ध होण्यास मदत मिळणार आहे.